



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ मंगळवार ८ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







# उर्मिलाच्या अंत्यसंस्कारापूर्वीच 'त्या' नरभक्षक वाघिणीचा चौथा बळी



## पुण्यासह वनविभागाच्या पथकाकडून वाघीण जेरबंद





वाघिणीच्या हल्ल्यात मृत शेतकरी

### अमरावती जिल्ह्यात थरकाप!

**अमरावती /प्रतिनिधीः- चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा परिसरात वाघिणीची दहशत पुन्हा एकदा दिसून आली. वाघिणीच्या हल्ल्यात सोमवारी दुपारी शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. पावर हाऊस जवळ शेतात काम करीत असणारे दिनेश आवारे ( वय,४५) यांच्यावर वाघिणीनं अचानक हल्ला केला. त्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली असून शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.**

शिरजगाव कसबा परिसरात यापूर्वी ही वाघिणीच्या हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. या वाघिणींना यापूर्वी दोन जणांचा बळी घेतला आहे. मोर्शी तालुक्यातील भांबोरा येथे २७ ऑगस्ट रोजी चरणदास इखे या शेतकऱ्यावर वाघिणींना हल्ला करून त्यांना ठार मारलं होतं. ही वाघीण आता मोर्शी जिल्ह्यातून चांदूरबाजार तालुक्यात दाखल झाली. रविवारी सोनोरी येथील शेत शिवारात

### मृत युवतीच्या कुटुंबीयाची बच्चू कडू , नवनीत राणांनी घेतली भेट

- वाघिणीच्या आल्यात ठार झालेल्या उर्मिला इवने हिच्या कुटुंबीयाची आमदार बच्चू कडू यांनी भेट घेतली. जिल्ह्याच्या माजी खासदार नवनीत राणा आज सोनोरी परिसरात पोहोचल्या त्यांनीदेखील उर्मिलाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन कुटुंबीयांचे सांत्वन करून त्यांच्या दुःखात सहभागी होत परिस्थितीची माहिती घेतली. अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे हे देखील दोन दिवसांपासून परिसरात उपस्थित असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.



### जेरबंद केलेली वाघीण

वाघिणीला जेरबंद करण्याच्या हालचाली - गेल्या तीन दिवसांपासून या वाघिणीला पकडण्यासाठी वन विभागाकडून प्रयत्न करण्यात आले. मात्र, तिला पकडण्यात यश मिळालं नव्हतं. त्र वनविभागाच्या वतीनं प्रचंड खबरदारी घेत वाघिणीला जेरबंद करण्यासाठी वनविभागाकडून कारवाई सुरू करण्यात आली होती.

दोन बकऱ्या या वाघिणीनं खाल्ल्या आहेत. सोमवारी दुपारी उर्मिला इवने ( वय १८)

### वाघिणीच्या मृत्यूबाबत गंभीर प्रश्नचिन्ह!

**वाघिणीचा मृत्यू नेमका कशामुळे झाला?**

**दोन डार्टची मात्रा कारणीभूत ठरली का?**

**उपचार आणि वाहतुकीत हलगर्जीपणा झाला का?**

वाघिणीच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी, तिच्या उपचार आणि प्रवासादरम्यान वनविभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वाघिणीला नागपूर येथे उपचारासाठी नेण्यात येत होते. मात्र, याच उपचारासाठी परतवाडा येथेही सुविधा उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. नागपूरला नेत असताना मोर्शी येथील झेनित स्कूलमध्ये वाघिणीवर उपचार करण्यात आले. याच उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

वाघिणीला दोन डार्ट मारण्यात आले होते. या दोन्ही डार्टच्या औषधांच्या मात्रा आणि त्याचा वाघिणीच्या मृत्यूशी काही संबंध आहे का, याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टता झालेली नाही. तसेच, वाघिणीला योग्य उपचारानंतर निरीक्षणाखाली ठेवण्याऐवजी तिचा प्रवास करण्यात आला, असा आरोप होत आहे. शिवाय, वाघिणीसाठी योग्य आकाराचा पिंजरा उपलब्ध होता का, यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. वापरण्यात आलेला पिंजरा हा बिबट्यासाठीचा असल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे वनविभागाच्या अधिकृत चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहेत.

### अखेर शेतकऱ्यांना दिलासा

- सलग तीन मानवी बळी आणि जनावरांवरील हल्ल्यांमुळे शिरजगाव कसबा, सोनोरी आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीच वातावरण होतं. शेतात ज्ञाना, गुरे ढोरे चारण्यासाठी नेणं आणि रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणंही धोकादायक बनलं होतं. अखेर आज नरभक्षक वाघीण जेरबंद झाल्यानं या परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निस्वास सोडला.

या युवतीवर वाघिणींना हल्ला करून तिला ठार मारलं. या घटनेमुळे सोनोरी गावात वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्याविरोधात प्रचंड रोष निर्माण झाला होता. आज सकाळी ही वाघीण परिसरातून मध्यप्रदेशच्या (पान २ वर)

## अरवली समितीस नाकारली मुदतवाढ; सुप्रीम कोर्टाचा दणका

### ३० नोव्हेंबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली; वृत्तसंस्था :** अरवली पर्वतरांगांची व्याख्या, सीमांकन आणि पर्यावरणीय संरक्षणासंदर्भात नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी मोठा धक्का दिला. समितीने अंतिम अहवाल सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत ३० नोव्हेंबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. निर्धारित मुदतीत अहवाल सादर करण्यात अपयश आल्यास समितीच पुनर्गठित केली जाईल, असा स्पष्ट इशाराही न्यायालयाने दिला.



सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. समितीने सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. त्यावर न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. समितीने अहवाल तयार करण्यासाठी उपलब्ध वेळेत वेगाने काम करावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच अंतिम अहवाल तयार होण्यास विलंब होत असल्यास संबंधित विषयांवर स्वतंत्र अंतरिम अहवाल सादर करण्याची मुभाही समितीला दिली. या (पान २ वर)

## भीषण अपघात ३ प्रवाशी ठार तर ५ गंभीर जखमी!

**आडगाव रंजे :** औंढा नागनाथ ते परभणी मार्गावर कळंबा पाटीजवळ भीषण अपघात झाला. एका भरधाव वाहनाने ऑटोला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन जण ठार तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातातील मयत व जखमींची ओळख पटविण्याचे काम सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

औंढा नागनाकडून काही प्रवासी एमएच-२२-एपी-२१४९ या क्रमांकाच्या ?टोने परभणीकडे निघाले होते. त्यांचा ?टो औंढा नागनाथ ते परभणी मार्गावर कळंबा



पाटीजवळ आल्यानंतर समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप वाहने त्यांच्या ?टोला धडक दिली. या अपघातानंतर ?टो चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले अन ?टो रस्त्याच्या (पान २ वर)

## उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला धक्का, विशाखा राऊत यांचे नगरसेवक पद रद्द

### महापौर रितू तावडे यांच्याकडून घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका विशाखा राऊत यांचे नगरसेवक पद रद्द झालं आहे. जात पडताळणीत त्यांच्या जात प्रमाणपत्र अवैध ठरवण्यात आलं होतं. त्यानंतर त्याचं पद धोक्यात आलं होतं. विशाखा राऊत यांनी कोर्टात धाव घेतली होती. मात्र त्यांना तिथं दिलासा मिळाला नाही. त्यानंतर त्याचं नगरसेवक पद जाणार, हे स्पष्ट झालं होतं. आता अखेर आज सोमवारी (७ सप्टेंबर) महापौर रितू तावडे यांनी विशाखा राऊत यांचे नगसेवकपद रद्द




झाल्याची घोषणा केली आहे.

महापौर रितू तावडे यांनी घोषणा केली : मुंबई महानगरपालिकेतील अनुभवी नगरसेविका म्हणून ओळखल्या जातात. पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवलं होतं. या निर्णयाच्या आधारे मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी राज्य सरकारशी पत्रव्यवहार करून राऊत यांच्याविरोधात अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी केली होती. या कारवाईला विशाखा राऊत यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. मात्र, (पान २ वर)

## यंदा बाप्पाचा लाडू महाग; मिठाईच्या किमतीत किलोमागे ४० ते ४५ रुपयांनी वाढ

**नाशिक /वृत्तसंस्था-** आगामी गणेशोत्सवाच्या तोंडावर मिठाईच्या दारात वाढ झाल्यानं बाप्पाचा लाडू महागला आहे. साखर, दूध, तूप बेसन,मैदा आणि सुकामेवा या कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यानं शहरातील मिठाईच्या दरात सुमारे १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे गणरायाला नैवेद्य दाखवण्यापासून पाहुण्यांना मिठाई देण्यापर्यंतचा खर्च वाढणार आहे.



गणेशोत्सव, गौरीपूजन आणि त्यानंतर येणाऱ्या सणांमध्ये मिठाईला मोठी मागणी असते. मात्र, मिठाईला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतीमुळे मिठाई विक्रेत्यांसमोर दरवाढीशिवाय पर्याय उरलेला नाही. अशात ग्राहकांना गोड पदार्थांचे प्रमाण कमी करून खरेदी करावी लागण्याची शक्यता आहे. साखर, दूध, तूप, मैदा, बेसन आणि सुकामेवा या कच्च्या मालाच्या किमती वाढल्यानं शहरातील मिठाईच्या दरात किलोमागे (पान २ वर)

## वृद्ध महिलेची 'डिजिटल अरेस्ट'द्वारे १.२० कोटींची फसवणूक

**डेहराडून /वृत्तसंस्था-** गेल्या काही महिन्यांपासून डिजिटल अटक प्रकरणे उघडकीस येत आहेत. याच प्रकरणात उत्तराखंड विशेष कृती दलानं (एसटीएफ) पश्चिम बंगालमधील मालदा इथं एका संशयिताला अटक केली आहे. या संशयितानं डिजिटल अटकेच्या माध्यमातून एका वृद्ध महिलेची १ कोटी २० लाख १८ हजार रुपयांची सायबर फसवणूक केल्याचा आरोप आहे. दूरसंचार नियामक विभागाचे अधिकारी असल्याचं भासवून, या सायबर गुन्हेगारांनी पीडितेला व्हॉट्सॲप कॉलद्वारे जवळपास १२ दिवस डिजिटल अटकेत ठेवलं होतं. या काळात, कायदेशीर कारवाईची धमकी देऊन आरोपींनी महिलेला विविध बँक खात्यांमध्ये कोट्यवधी रुपये ट्रान्सफर करण्यास भाग पाडले.

डिजिटल अटकेची धमकी : दरम्यान, अटक आणि कायदेशीर कारवाईच्या (पान २ वर)

## उद्योगमंत्र्यांच्या आश्वासनानंतर भूमिपुत्रांचा महामोर्चा स्थगित!

**चंद्रपूर /वृत्तसंस्था-:** स्थानिक भूमिपुत्रांना रोजगारात प्राधान्य मिळावे, या मागणीसाठी स्थानिक लोकअधिकार सेना व शिवसेनेच्या वतीने सोमवारी आयोजित करण्यात आलेला महामोर्चा उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आला. गांधी चौकात जिल्हाभरातून शेकडो कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर उद्योग व खाण प्रकल्प असूनही स्थानिक युवकांना रोजगाराच्या पुरेशा संधी मिळत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. जमीन संपादन, प्रदूषण आणि विस्थापनाचा फटका स्थानिकांना सहन करावा लागत असताना रोजगारासाठी बाहेरील कामगारांना प्राधान्य दिले जात असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात



आला. शासनाच्या स्थानिक रोजगार धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

दरम्यान, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी चंद्रपुरात उपस्थित राहून आंदोलकांच्या मागण्यांची दखल घेतली. या प्रश्नावर सात दिवसांत मंत्रालयात बैठक घेण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. तसेच एमआयडीसी परिसरात स्थानिक बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असून, जिल्ह्यातील स्थानिकांना (पान २ वर)



## १ व १० वरील उर्वरित

### उर्मिलाच्या अंत्यसंस्कारापूर्वीच

सीमेवर गेल्याचं सांगितलं जात होतं. मात्र, दुपारी शिरजगाव कसबा येथे दिनेश आवारे या शेतकऱ्यावर हल्ला करून त्यांना ठार मारल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

पुण्यासह वनविभागाच्या पथकाकडून वाघीण जेरबंद

शिकार केल्यानंतरही वाघीण घटनास्थळी - दिनेश आवारे यांच्यावर हल्ला केल्यानंतर वाघिणीने त्याचे शरीर सोडलं नसल्याची माहिती आहे. बराच वेळपर्यंत मृतदेहाजवळ ठाण मांडून बसल्यानं परिस्थिती अधिकच गंभीर बनली. वाघिणीच्या उपस्थितीमुळे घटनास्थळी जाण्यासही धोका निर्माण झाला.

चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा परिसरात सोमवारी शेतकरी दिनेश आवारे यांच्यावर हल्ला करून त्यांचा बळी घेतल्यानंतर घटनास्थळीच ठाण मांडून बसलेल्या वाघिणीला रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट पुणे येथील मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. हेमराज यांनी यशस्वीपणे डार्क करून बेशुद्ध केलं. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने वाघिणीला सुरक्षितपणे ताब्यात घेण्याची कार्यवाही पूर्ण केली. या कार्यवाहीमुळे गेल्या काही दिवसांपासून भयभीत झालेल्या शिरसगाव कसबा, सोनोरी आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दिनेश आवारे यांच्यावर हल्ला केल्यानंतर वाघीण घटनास्थळ सोडण्यास तयार नव्हती. मृतदेहाजवळच ती बराच वेळ ठाण मांडून बसल्यामुळे वनविभागासमोर मोठा आव्हान उभा राहिलं होता. परिसरात मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आणि वाघिणीच्या आक्रमक वर्तनामुळं बचाव कार्य अत्यंत सावधगिरीने करावं लागत होतं. दरम्यान अमरावती सह पुणे येथील रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झालं. त्यांच्यासोबत वर्धा जिल्ह्यातील वनविभागाचे रेस्क्यू पथकही बचाव कार्यात सहभागी झालं. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर पुणे येथील रेस्क्यूचारी टेबल ट्रस्टचे मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी ?डॉ. हेमराज यांनी योग्य संधी साधत वाघिणीवर डार्टचा मारा केला. डार्ट लागल्यानंतरही काही वेळातच वाघीण बेशुद्ध झाली. त्यानंतर वनविभागाच्या पथकानं वाघिणीला ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली.

### अरवली समितीस नाकारली

प्रकरणाची पुढील सुनावणी २ डिसेंबरला आहे. अरवलीविषयक उच्चाधिकार समितीची स्थापना २५ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केली होती. अंतिम अहवाल सादर करण्याची मूळ मुदत ३१ ऑगस्ट होती. मात्र, अनुपालन अहवालात समितीने अधिक वेळ आवश्यक असल्याचे सांगितले.

### भीषण अपघात ३ प्रवाशी

खाली जाऊन उलटला. या अपघाताची माहिती मिळताच परिसरातील गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन १०८ रुग्णवाहिका बोलावली. या रुग्णवाहिकेद्वारे सहा जणांना उपचारासाठी परभणी येथे हलविण्यात आले. मात्र त्यापैकी एका महिलेचा रस्त्यातच मृत्यू झाला तर पाच जखमींना उपचारासाठी परभणीच्या शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी दोन जखमी अत्यवस्थ असून इतर तीघे बोलण्याच्या मनःस्थितीत नाहीत.

या शिवाय घटनास्थळावर दोन बालकांचा मृ??त्यू झाला असून त्यापैकी तीन वर्षाची मुलगी व एक बारा वर्षाचा मुलगा आहे. दोघांचीही मृतदेह हट्टा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आल्याचे वैद्यकिय अधिकारी डॉ. सिद्दीकी यांनी सांगितले. हट्टा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप बोरकर, उपनिरीक्षक संजय केंद्रे, जमादार हिरामण चव्हाण, कृष्णा चव्हाण यांच्या पथकाने भेट देऊन पाहणी केली. या अपघाताची मयतांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला धक्का,

न्यायालयानं त्यांना दिलासा देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांचे नगरसेवक पद रद्द होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. या कारवाईची केवळ औपचारिक घोषणा बाकी होती.

आज मुंबई महानगरपालिकेच्या महासभेत महापौर रितू तावडे यांनी विशाखा राऊत यांचे नगरसेवक पद रद्द झाल्याची औपचारिक घोषणा केली. महानगरपालिकेच्या चिटणीस विभागाकडून यासंदर्भातील प्रस्ताव महापौरांसमोर मांडण्यात आला होता. यापूर्वी मुंबई महानगरपालिकेतील चार नगरसेवकांचं पद रद्द करण्यात आलं आहे. आता विशाखा राऊत यांच्या पदाच्या रद्दबातल घोषणेनंतर ही संख्या पाचवर पोहोचली आहे.

### यंदा बाप्पाचा लाडू महाग; मिठाईच्या

सुमारे ४० ते ४५ रुपयांची वाढ झाली आहे. विशेषतः लाडू जिलेबी, पेढा, बर्फी,गुलाबजाम या मिठाईच्या दरात मोठी वाढ झाल्यानं ग्राहकांना खरेदी करतांना बजेटचा विचार करावा लागणार आहे. पूर्वी सणासुदीला सर्वसामान्य कुटुंबाकडून एक किलो, दोन किलो मिठाई सहज खरेदी केली जात होती. मात्र, दर वाढीमुळे आता ग्राहकांकडून अर्धा किलो किंवा ठराविक रकमेत मिठाई घेण्यास पसंती मिळत आहे.

### वृद्ध महिलेची 'डिजिटल

धमकीखाली महिलेला व्हॉट्सॲप कॉलवर राहण्यास भाग पाडलं. सायबर गुन्हेगारांनी पीडित महिलेला इतर कोणाशीही संपर्क न साधण्याची सूचना दिली. तसंच बँक खात्यांची पडताळणी करण्याच्या नावाखाली, संपूर्ण प्रक्रिया व्हॉट्सॲप कॉलद्वारे पार पाडण्यात आली. महिलेला घरातच नजरकैदेची आणि डिजिटल अटकेची धमकी देऊन, त्यांनी तिला विविध बँक खात्यांमध्ये एकूण १ कोटी २० लाख १८ हजार रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितलं.

### उद्योगमंत्र्यांच्या आश्वासनानंतर भूमिपुत्रांचा

रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कंपन्यांमध्ये पक्षाच्या नावाचा गैरवापर करून वसुली किंवा अन्य गैरप्रकार करणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका सामंत यांनी मांडली. पदाधिकारी अथवा कार्यकर्त्यांकडून गैरप्रकार झाल्यास त्याची गय केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

मंत्र्यांच्या आश्वासनानंतर गांधी चौकातील मोर्चाचे सभेत रूपांतर झाले आणि आंदोलन स्थगित करण्यात आले. स्थानिक लोकअधिकार सेनेच्या जिल्हाध्यक्ष गोमती पाचभाई यांच्या नेतृत्वाखाली हा महामोर्चा काढण्यात आला. यावेळी अध्यक्ष-महासंघ गजानन कीर्तिकर, शिवसेना नेते व माजी खासदार, महासंघाचे कार्याध्यक्ष डॉ. श्रीकांत शिंदे, सरचिटणीस अरुण मोरे यांच्यासह जिल्हाधिकारी वसुमना पंत आणि जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी उपस्थित होते. आता सामंत यांच्या आश्वासनांची अंमलबजावणी आणि स्थानिक युवकांना प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी कधी मिळतात, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### शहरात पुन्हा रक्तरंजित रात्र

वादातून झालेला हल्ला की अन्य कोणत्या कारणातून ही हत्या झाली, याचा तपास पोलीस करीत आहेत. घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पोलिसांकडून तपासले जात असून, प्रत्यक्षदर्शींकडूनही माहिती घेतली जात आहे. हल्लेखोरांची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत. आरोपींच्या शोधासाठी विविध पथके कामाला लागल्याची माहिती आहे. अवघ्या २२ वर्षीय तरुणाची हत्या झाल्याने शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रात्रीच्या वेळी शहरातील संवेदनशील भागात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पोलिसांचा तपास सुरू असून हत्येचे नेमके कारण आणि आरोपींबाबत अधिकृत माहिती तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. नागरिकांनी अपुऱ्या माहितीवर आधारित अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### जिल्ह्यातील २,३९९ मंडळांमध्ये

आले आहे.

**ऑनलाइन परवानगी प्रक्रिया सुरू**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पोलिस विभागाची परवानगी घेणे अनिवार्य असून, आज ७ सप्टेंबरपासून ऑनलाइन परवानगीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. मंडळांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**३८७ गावामध्ये एक गाव, एक गणपती'**

जिल्ह्यातील ३८७ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविली जात असून या उपक्रमाला खास महत्त्व प्राप्त झाले आहे. एकाच ठिकाणी सार्वजनिक गणेशाची स्थापना करून गावातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन उत्सव साजरा करावा, यामुळे अनावश्यक खर्च, स्पर्धा आणि वाद कमी होऊन गावाची सामाजिक एकता अधिक मजबूत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### अवैध रेतीसाठ्याला कारवाई ऐवजी

चोरी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून वाहने जप्त करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा रेती चोरी, पुरावे नष्ट होणे अथवा कमी दंड आकारल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही बोरेले यांनी दिला आहे.

### आयएनएसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर

दशकांहून अधिक प्रदीर्घ कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत आयएनएसच्या कार्यकारिणीवर त्यांची निवड करण्यात आली आहे. देशातील वृत्तपत्रसृष्टीसमोरील विविध प्रश्न, प्रकाशन व्यवसायातील बदल, तंत्रज्ञानाचे आव्हान, जाहिरात धोरण आणि प्रादेशिक वृत्तपत्रांच्या हिताच्या दृष्टीने आयएनएसची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. अशा राष्ट्रीय संस्थेच्या कार्यकारिणीवर मराठे यांना मिळालेले प्रतिनिधित्व विशेष महत्त्वाचे ठरले आहे.

दैनिक 'हिंदुस्थान'च्या संपादकीय गुणवत्तेबरोबरच व्यवस्थापन, प्रसार, जाहिरात, अत्याधुनिक मुद्रण तंत्रज्ञान आणि सामाजिक बांधिलकी अधिक सक्षम करण्यात विलास अरुण मराठे यांनी मोलाचे योगदान दिले आहे. बदलत्या काळानुसार वृत्तपत्र क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच विश्वासार्ह, लोकाभिमुख आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेची परंपरा कायम ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. अमरावतीसह पश्चिम विदर्भातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी आणि विकासविषयक प्रश्नांना दैनिक 'हिंदुस्थान'च्या माध्यमातून प्रभावी व्यासपीठ मिळवून देण्यातही त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. पत्रकारिता आणि वृत्तपत्र व्यवस्थापनातील अनुभवामुळे प्रादेशिक वृत्तपत्रांच्या समस्या राष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे मांडण्यास त्यांच्या निवडीमुळे बळ मिळणार आहे.

**दिग्गजांसोबत राष्ट्रीय कार्यकारिणीत सहभाग**

आयएनएसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत देशातील प्रमुख वृत्तपत्र समूहांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये 'दैनिक थांती'चे एस. बालसुब्रमण्यम आदित्यन, 'दैनिक भास्कर'चे गिरीश अग्रवाल, 'बॉम्बे समाचार'चे होर्मुसजी एन. कामा, 'पंजाब केसरी'चे विजयकुमार चोप्रा, 'लोकमत'चे डॉ. विजय जवाहरलाल दर्डा, 'इंडियन एक्स्प्रेस'चे विवेक गोएंका आणि 'दैनिक जागरण'चे महेंद्र मोहन गुप्ता यांचा समावेश आहे. तसेच 'पुढारी'चे योगेश पी. जाधव, 'आनंदबाजार पत्रिका'चे ध्रुब मुखर्जी, 'सकाळ'च्या जान्हवी अभिजित पवार, 'द टेलिग्राफ'चे अतिदेब सरकार आणि 'तरुण भारत'चे डॉ. किरण डी. ठाकूर यांच्यासह विविध प्रतिष्ठित वृत्तपत्रे व प्रकाशन संस्थांच्या प्रतिनिधींना राष्ट्रीय कार्यकारिणीत स्थान देण्यात आले आहे. या दिग्गज प्रतिनिधींसोबत विलास अरुण मराठे काम करणार आहेत.

**प्रादेशिक वृत्तपत्रांचा आवाज अधिक बुलंद होणार**

डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, वृत्तपत्र निर्मितीच्या खर्चात झालेली वाढ, कागदाचे वाढते दर, जाहिरात क्षेत्रातील बदल, वितरण व्यवस्थेतील अडचणी आणि लहान-मध्यम वृत्तपत्रांसमोरील आर्थिक आव्हाने या पार्श्वभूमीवर आयएनएसचे कार्य विशेष महत्त्वाचे आहे. विलास अरुण मराठे यांच्या निवडीमुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील प्रादेशिक वृत्तपत्रांचे प्रश्न आणि अपेक्षा राष्ट्रीय व्यासपीठावर अधिक प्रभावीपणे मांडल्या जातील, अशी अपेक्षा वृत्तपत्र क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

**सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव**

विलास अरुण मराठे यांच्या बिनविरोध निवडीचे वृत्त समजताच पत्रकारिता, मुद्रण, प्रकाशन, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. दैनिक 'हिंदुस्थान'च्या प्रदीर्घ आणि गौरवशाली वाटचालीला मिळालेली ही राष्ट्रीय मान्यता असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. अमरावतीतील एका प्रादेशिक वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला देशातील वृत्तपत्र प्रकाशकांच्या सर्वोच्च संस्थेच्या कार्यकारिणीत स्थान मिळणे ही संपूर्ण विदर्भासाठी गौरवास्पद बाब आहे. विलास अरुण मराठे यांच्या अनुभवाचा आयएनएसच्या कामकाजाला निश्चितच लाभ होईल आणि वृत्तपत्रसृष्टीच्या हितासाठी त्यांच्या माध्यमातून प्रभावी योगदान मिळेल, असा विश्वास पत्रकारिता व प्रकाशन क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

**सलग २४ व्यांदा विलास मराठे कार्यकारिणीवर**

दैनिक 'हिंदुस्थान'चे प्रबंध संपादक व महाव्यवस्थापक विलास अरुण मराठे यांची द इंडियन न्यूजपेपर सोसायटीच्या (आयएनएस) राष्ट्रीय कार्यकारिणीवर सदस्य म्हणून सलग २४ व्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या पत्रकारिता आणि वृत्तपत्र व्यवस्थापन क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाची ही राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल मानली जात आहे. यापूर्वी त्यांनी राज्य शासनाच्या अधिस्वीकृती समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. ते विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेचे माजी अध्यक्ष तसेच विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी संस्थानचे कोषाध्यक्ष, सातुर्णा औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेचे संचालक, शासकीय आयटीआय (मुलींची) संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य आणि 'जोग चॅरिटेबल ट्रस्ट'चे सचिव म्हणूनही ते कार्यरत आहेत. केंद्र सरकारच्या माहिती व जनसंपर्क मंत्रालयांतर्गत कार्यरत डीएव्हीपी सध्याच्या केंद्रीय संचार ब्युरोच्या जाहिरात वितरणविषयक समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे. विलास अरुण मराठे हे दैनिक 'हिंदुस्थान'चे संस्थापक संपादक तथा स्वातंत्र्यसैनिक पत्रमहर्षी स्व. बाळासाहेब मराठे यांचे नातू, दैनिक 'हिंदुस्थान'चे दिवंगत मुख्य संपादक डॉ. अरुण मराठे आणि दिवंगत प्रभा अरुण मराठे यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या सलग २४ व्या निवडीबद्दल पश्चिम विदर्भातील पत्रकारसृष्टीसह समाजातील सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### चिमुकल्या बहीण-भावाला

घरात एकच खळबळ उडाली. कुटुंबीयांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारीही धावून आले. यावेळी काहींनी धाडस करून सापाला ठार केले.

दरम्यान, सर्पदंश झालेल्या आराध्या आणि पवनला मध्यरात्री सुमारे एक वाजता जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. दोघांची प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी त्यांना आयसीयूमध्ये दाखल करून तातडीने उपचार सुरू केले.

उपचारानंतर पवनच्या प्रकृतीत काहीशी सुधारणा होत असल्याचे सांगण्यात आले. मात्र, आराध्या उपचारांना अपेक्षित प्रतिसाद देत नसून, वृत्त लिहितेवेळीही ती शुद्धीवर आली नव्हती. त्यामुळे तिच्या प्रकृतीबाबत कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. आराध्याचे काका गणेश चव्हाण यांच्यासह कुटुंबीय, नातेवाईक आणि शेजारी दिवसभर रुग्णालयात उपस्थित होते. दोन्ही मुलांना दंश करणारा साप मण्यार प्रजातीचा असल्याचा अंदाज कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. त्यांनी सापाचे छायाचित्रही डॉक्टरांना दाखविले. सर्पमित्र सचिन कातोरे यांनी छायाचित्र पाहून हा साप मण्यार असल्याचे सांगितले.

### तीन दिवसांच्या शोधानंतर

शोध घेऊनही त्याचा ठावठिकाणा लागत नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली होती. दरम्यान, कान्होजी महाराज देवस्थानाच्या मागील बाजूस असलेल्या शेतातील विहिरीत तरुणाचा मृतदेह असल्याची माहिती मिळाली. मृतदेहाची पाहणी केल्यानंतर तो आकाश सहारे याचा असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी धामणगाव रेल्वे येथील रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास कुऱ्हा पोलीस करीत आहेत. उत्तरीय तपासणीचा अहवाल आणि पोलिसांच्या तपासातूनच आकाशच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. अवघ्या १८व्या वर्षी तरुणाचा मृत्यू झाल्याने सहारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या घटनेमुळे अंजनसिंगी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### ट्रान्सफॉर्मर चोरीचा छडा नेवाशात

आधारे पोलिसांनी जितेंद्रसिंग टाक याच्यावर संशय बळकट केला. त्याचा माग काढत तपास पथक नेवासा येथे पोहोचले आणि त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने साथीदारांसह चोरीचा कट रचल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. स्वतःच्या मालकीच्या मारुती सुझुकी बलेनो (एमएच २१ बीएफ ७१९५) कारने घटनास्थळी पोहोचण्यापूर्वी परिसराची पाहणी करण्यात आली. त्यानंतर ट्रान्सफॉर्मर फोडून कॉपर कॉईल काढण्यात आली आणि चोरीचा माल कारमधून घेऊन आरोपी पसार झाल्याचे तपासात समोर आले.

आरोपीच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्याच्या राहत्या गावातील परिसरात शोधमोहीम राबविली. यावेळी चोरीच्या मालापैकी ५० किलो वजनाची कॉपर कॉईल पोलिसांच्या हाती लागली. जप्त केलेल्या मालाची अंदाजे किंमत ७५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

या प्रकरणातील इतर साथीदारांचा सहभाग तसेच चोरीच्या मालाची विल्हेवाट लावण्यात आली का, याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि चांदूर रेल्वे उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीष ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक किरण औटे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील रणखांब, पोहेकॉ युवराज मानमोठे, विनोद राठोड तसेच पोलीस कर्मचारी संदेश चव्हाण, प्रीतम यादव आणि यशवंत काळे यांच्या पथकाने आरोपीचा माग काढत ही कारवाई केली.

### पिता-पुत्राने तरूणावर केला

रोखले आणि समजावण्याचा प्रयत्न केला. याच कारणा वरून आदित्यचा त्यांच्याशी वाद झाला.वादाचे रुपांतर हाणामारीत झाले असता, आदित्य आणि त्याचे वडील गणेश ताथोड यांनी मिळून विजय यांच्यावर लाठी आणि लोखंडी पाईपने हल्ला केला आणि त्यांच्या डोक्यावर गंभीर वार लागल्याने विजय जागीच खाली कोसळले आणि गंभीर जखमी झाले. घटने नंतर परिसरातील लोकांनी तिथे गर्दी केली. विजय यांना पत्नी संगीता यांनी जखमी अवस्थेत तात्काळ इर्विन रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. विजय यांनी गाडगे नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीच्या आधारावर पोलिसांनी आरोपी पिता-पुत्र गणेश ताथोड आणि आदित्य गणेश ताथोड यांच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे.

### राष्ट्रीय स्वच्छ हवा पुरस्कारात

आले. अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी आणि आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

**नाशिकच्या वॉर्ड क्रमांक ७ चा राष्ट्रीय गौरव**

वॉर्डस्तरीय स्वच्छ वायू सर्वेक्षणात ३० हजारांहून अधिक लोकसंख्या गटात नाशिक महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ७ ने राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वॉर्डला ३० लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. नाशिकच्या महापौर हिमगौरी अडके, उपमहापौर विलास शिंदे, अमित रंजन यांच्यासह प्रतिनिधींनी पुरस्कार स्वीकारला. 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६' मधील राज्यस्तरीय कामगिरीसाठी महाराष्ट्रातील पुणे येथील वॉर्ड क्रमांक ४ व ७ आणि अमरावती येथील वॉर्ड क्रमांक १२ यांची निवड करण्यात आली आहे. या वॉर्डमध्ये हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यासाठी राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, या वॉर्डना विशेष सन्मानित करण्यात येणार आहे.

**देशातील उत्कृष्ट शहरांचाही गौरव**

१० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटात उत्तर प्रदेशातील लखनौने प्रथम, मध्य प्रदेशातील इंदूरने द्वितीय, तर जबलपूरने तृतीय क्रमांक मिळविला. ३ ते १० लाख लोकसंख्या गटात ओडिशातील राऊरकेला प्रथम, तर फिरोजाबाद आणि गुंटूर यांनी संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळविला. तीन लाखांपेक्षा कमी लोकसंख्या गटात कलिंग नगर, अंगुल आणि तालचेर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांना एकूण ५ कोटी २५ लाख रुपये, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वॉर्डना २ कोटी ७० लाख रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात आली. ही पारितोषिकाची रक्कम संबंधित शहरांमध्ये वायू प्रदूषण नियंत्रण, हवेची गुणवत्ता सुधारणा आणि स्वच्छ वायूसाठीच्या विविध उपाययोजनांसाठी वापरण्यात येणार आहे.

### 'पैसे पडले'चा बनाव करून

लवनकर यांनी स्पष्ट सांगितले की ही रक्कम त्यांची नाही. लवणकर यांच्या लक्षात येण्याच्या पूर्वीच चोरट्यांनी त्यांचे लक्ष विचलित करण्याचा फायदा घेतला आणि त्यांच्याजवळ असलेली १ लाख २० हजार रुपयांची संपूर्ण रोकड लंपास केली.गुन्हा करून आरोपी अतिशय वेगाने घटना स्थळावरून फरार होण्यात यशस्वी झाले. काही वेळानंतर जेव्हा लवनकर यांना आपली रक्कम गायब झाल्याचे लक्षात आले, तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी तात्काळ घटनेची माहिती गाडगे नगर पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळ आणि आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.शातिर ठगांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार केले असून नागरिकांना अशा भामट्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

### अखेर त्या अज्ञात वाहन चालकाविरुद्ध

त्यांचेवर अमरावती येथे खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. अखेर दुसऱ्या दिवशी अपघातग्रस्त महिलेचे भाऊ अशोक तुकाराम इंगळे रा.तिवसा यांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध तिवसा पोलीसात रितसर तक्रार दाखल केली.त्याअनुषंगाने तिवसा पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास तिवसा पोलिस करीत आहे.

### जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना फायर,

यासाठी प्रत्येक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयात नियमितपणे 'मॉक ड्रिल' आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. वीज यंत्रणेतील बिघाडामुळे होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी इलेक्ट्रिकल ऑडिटला विशेष प्राधान्य देण्याचे सांगण्यात आले आहे. मुदतीत काम पूर्ण केले नसल्यास प्रशासनाकडून कारवाईचा इशाराही देण्यात आला. सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ही मोहीम गांभीर्याने राबवून रुग्णालयांची सुरक्षा यंत्रणा चोख ठेवावी, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### मलशुद्धीकरण केंद्रातून चोरी करणारा

घेऊन केंद्रातून वीसीबी पॅनल किं २० हजार,सरफेस एरीएटर - किं. ५० हजार,गिअरबॉक्स - किं. ३५ हजार, कॉपर केबल - किं. २० हजार असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी गेला होता. यावरून डीबी पथकाला मिळालेल्या गुप्त माहिती वरून एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेऊन विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली.त्याच्या कडून चोरी गेलेले वीसीबी पॅनल सुट्या भागामध्ये तुटलेल्या अवस्थेत - १० हजार, सरफेस एरीएटर तुटलेल्या दोन भागांमध्ये - ३० हजार, गिअरबॉक्स सुट्या अवस्थेत चार भागांमध्ये ३० हजार,

कॉपर केबल जळालेल्या ५ हजाराचा असा एकूण ७५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला,उपायुक्त यशवंत सोळंके, सहायक पोलीस आयुक्त निलेश बाम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेटचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, डी.बी. पथकाचे इंचार्ज पोउपनि विकास मनपिया, सा. पोहेकॉ इरफान रायलीवाले, प्रविण ढेंगकार, पोकॉ इम्राण खान, मनीष यादव, मोहन चौहान, शेखर गायकवाड यांनी कारवाई मध्ये सहभाग केला.


**CHANGE OF NAME**

I, PAWANKUMAR RAMESHCHANDRA GUPTA (Old Name), (SSC Marklist) Residing at Nanda Market, Chobal Plot, Rajapeth, Amravati- 444606 (MH), hereby declare that I have changed My Name as PAWAN RAMESHCHANDRA GUPTA (New Name, Aadhar Card, Pan Card,)
S/o. RAMESHCHANDAR Babulal Gupta

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **नंदकिशोर दामोधर घोगरे** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन - मौजे - पेठ अमरावती, प्रगणे-बडनेरा, शेत सर्वे क्र.72/1 , 72/2 पैकी आणि (संगणीकीय सात बारा नुसार-72/1/72/2/73/1), मधील लेआऊट प्लॉट क्र.28 याचे एकूण क्षेत्रफळ 1452.60 चौ. फुट, ता.आणि जिल्हा अमरावती .**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **नंदकिशोर दामोधर घोगरे** यांच्या मालकीची आहे. तद्नंतर त्यांनी **ADITYA BIRLA HOUSING FINANCE LIMITED** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि.15/03/2022 रोजीचे दस्त क्र.1593** हे दोन्ही मूळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **7 दिवसांच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर दोन्ही मालमत्ता हया **ADITYA BIRLA HOUSING FINANCE LIMITED** येथे गहाण करण्यात येईल करीता ही जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण- अमरावती**
**दि.07/09/2026**

आपला,
***ADVOCATE***
रवींद्र रु.वाटाणे,
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो.नं. 9823698745

शिक्का

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.१३.०७.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत **ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी,** येथे हजर झालो. जन्म/**मृत्यू** नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **महेश विठ्ठलराव बेहरे** अर्जात नमूद मृत्यू दिनांक २४.०९.२०२३ च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण -- हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) -----------------------------------------------------------

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर | सौ.पद्माताई सं.मेसकर |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार | इजाजोद्दीन मो.इनामदार |
| ४) श्री क्रांतीकुमार रा.काळे | क्रांतीकुमार रा.काळे |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## PUBLIC NOTICE

**जमिनीच्या प्रस्तावित विक्री/हस्तांतरणाबाबत दावा व आक्षेप आमंत्रित**

सर्वसामान्य जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, मौजे चिरोडी, तालुका चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती, महाराष्ट्र येथील खालील नमूद शेतजमिनीच्या प्रस्तावित विक्री/हस्तांतरणासाठी संबंधित पक्षांकडून आवश्यक कागदपत्रांची व कायदेशिर कार्यवाही केली जात आहे.

**मालमत्तेचा तपशील**
गाव : चिरोडी, तालुका : चांदूर रेल्वे, जिल्हा : अमरावती, महाराष्ट्र
गट/सर्व्हे नंबर : ५४/१, क्षेत्रफळ : १ हेक्टर ९१ आर, ७/१२ खाता नंबर : ४८

**जमिनीच्या सीमा (चतुःसीमा)**
**पुर्व** - मधुकर कोडाओपे यांचे शेत, **पश्चिम** - कासमदास ठौराव जाधव यांचे शेत
**उत्तर** - मोरेश्वर विठ्ठलराव अहाके, **दक्षिण** - रामसिंह राठोड यांचे शेत

**मूळ महसूल हक्कदारांबाबत विशेष सूचना**
उपलब्ध महसूल नोंदीनुसार सदर जमिनीशी संबंधित मूळ ५ (पाच) हक्कदारांपैकी २ (दोन) व्यक्ती सध्या हयात आहेत व ३ (तीन) व्यक्तीचे निधन झाले आहे. ज्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेः
**१) पांडूरंग दौलत कंगाले** - निधन झाले आहे
**२) गंगाबाई उईके** - निधन झाले आहे.
**३) पार्वतीबाई मनिराम सालामे (सलाम)** - हयात
**४) गुंफा दौलत कंगाले** - निधन झाले आहे
**५) आशा दौलत कंगाले**- हयात
वरील नावे व तपशील संबंधित अद्ययावत ७/१२ व महसूल नोंदीवरुन पडताळून घ्यायचा आहे

**कायदेशिर वारसांसाठी विशेष सूचना**
वरील दिवंगत ३(तीन) हक्कदारांपैकी कोणचाही कोणता कायदेशिर वारस (Legal Heir),वारसदार,वारस प्रतिनिधी, सह-मालक किंवा इतर वैध हितकारक असेल आणि सदर जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर त्यांचा कोणताही वैध हक्क, हिस्सा,मालकी, हितसंबंध,ताबा,दावा किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी या जाहीर सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून २१(एकवीस) दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या/आक्षेपाच्या पुष्ठयर्थ कागदपत्रांच्या प्रतींसह खाली दिलेल्या पत्यावर लेखी स्वरुपात सादर करावे.
**विशेषतः संबंधि व्यक्तीने आपल्या दाव्याच्या पुष्टयर्थ (उपलब्ध असल्यास) :**
मृत्यू प्रमाणपत्र, वंशावळ/ Family Tree, Legal Heir documents, महसूल नोंदी, पूर्वीचे title documents, इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर कराव्यात.

**हयात हक्कदार/विक्रेते**
**श्रीमती पार्वताबाई मनिराम सालामे (सलाम)**
**श्रीमती आशा दौलत कंगाले**
दोन्ही हयात हक्कदारांद्वारे त्यांच्या माहितीच्या व उपलब्ध नोंदीच्या आधारे संबंधित कागदपत्रांची व कायदेशिर कार्यवाही केली जात आहे.

**प्रस्तावित खरेदीदार**
**श्रीमती वर्षा हरजीतसिंह मोंग्गा**
**पत्ता** : गोविंद नगर, राजापेठ, अमरावती, महाराष्ट्र

**इतर संभाव्य दावेदारांसाठी सूचना**
जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, बॅक, वित्तीय संस्था,सह-मालक,कायदेशिर वारस किंवा इतर पक्षाचा सदर जमिनीवर खालीलपैकी कोणताही वैध हक्क किंवा हितसंबंध असल्यास :
मालकी किंवा सह-मालकी : वारसा हक्क,गहाण किंवा कर्ज, बोजा (Encumbrance), ताबा, भाडेपटटा/लीज,पुर्व विक्री किंवा विक्री करार, Power of Attorney वर आधारित कोणताही पूर्व हक्क, न्यायालयीन हक्क/आदेश, महसुली दावा, किंवा इतर कोणताही वैध हक्क/हितसंबंध, त्यांनी सुध्दा या सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून २१ (एकवीस) दिवसांच्या आंत आपल्या दाव्याच्या/आक्षेपाच्या पुष्टयर्थ उपलब्ध कागदपत्रांसह लेखी स्वरुपात कळवावे.

**दावा/आक्षेप सादर करण्याचा पत्ता**
**नाव** : **श्रीमती वर्षा हरजीतसिंह मोंग्गा**
**पत्ता** : गोविंद नगर, राजापेठ, अमरावती, महाराष्ट्र
**मोबाईल** : ९९२३७९८८१३
**ई-मेल** : -ajitpalmongga@gmail.com

**महत्वाची कायदेशिर सूचना**
मुदतीच्या २१(एकवीस) दिवसांच्या कालावधीत कोणताही दावा किंवा आक्षेप न आल्यास, संबंधित पक्ष उपलब्ध महसूल व कायदेशिर नोंदीच्या आधारे तसेच लागू कायदा व आवश्यक कायदेशिर परवानग्यांच्या अधीन राहून पुढील कायदेशिर कार्यवाही करण्यास मोकळे राहतील.
ही जाहीर सूचना कोणत्याही Collector ची परवानगी, महसूल मंजुरी, नोंदणी, न्यायालयीन आदेश किंवा इतर कायदेशिर परवानगीचा पर्याय नाही.
जिथे लागू कायद्यानुसार कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची पूर्व परवानगी/मंजूरी आवश्यक असेल, तिथे अशी परवानगी/मंजुरी मिळवणे अनिवार्य राहील.
विशेषतः जर सदर जमीन अनुसुचित जमाती/आदिवासी जमीन नोंदवलेली असेल, तर तिच्या प्रस्तावित हस्तांतरणावर लागू होणा-या सर्व कायदेशिर निर्बंधाचे व सक्षम प्राधिकरणाच्या आवश्यक पूर्व परवानगीचें /मंजुरीचे पालन केले जाईल.
ही सूचना अशा कोणत्याही व्यक्तीचा वैध हक्क समाप्त करत नाही, जो केवळ या जाहीर सुचनेच्या प्रसिध्दीच्या किंवा त्यावर आक्षेप न घेतल्याने लागू कायद्यानुसार समाप्त होऊ शकत नाही.
प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्याचे किंवा आक्षेपाचे परीक्षण संबंधित कागदपत्रे व लागू कायद्यानुसार केले जाईल.

दिनांक : ०४/०९/२०२६
स्थान :- अमरावती, महाराष्ट्र
**प्रस्तावित खरेदीदार/ अधिकृत संपर्ककर्त्याच्या वतीने**
**नाव : श्रीमती वर्षा हरजीतसिंह मोंग्गा**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# तात्पुरते अपंग प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांगांना एप्रिलपासून थांबलेले मानधन लवकरच मिळणार!

## आ. भावना गवळी पाटील यांची माहिती



■ प्रतिनिधी | वाशिम ■

पूर्वी तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्र असल्यामुळे अनेक दिव्यांग लाभार्थ्यांचे मासिक मानधन आणि इतर लाभ बंद करण्यात आले होते. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील अनेक अपंग नागरिकांनी शुक्रवारी आ.भावना गवळी पाटील यांच्या जनता दरबाबरात आपल्या समस्या मांडल्या. यावेळी आ.भावना गवळी पाटील यांनी दिव्यांग सक्षमिकरण विभागाचे सचिव व वाशिमचे उपजिल्हाधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क साधुन अपंगाच्या थांबलेल्या मानधनाबाबत चर्चा केली. तेव्हा तात्पुरते अपंग प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांगांना तात्काळ मानधन देण्याची मागणी केली. त्यावर संबधित अधिकाऱ्यांनी अपंगाच्या थांबलेल्या मानधनाबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

सामाजिक न्याय विभागाकडून सर्व दिव्यांग लाभार्थ्यांचा डेटा आता स्वतंत्र दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या नवीन डिजिटल प्रणालीवर वर्ग केला जात आहे. या तांत्रिक बदलांमुळे अनेक महिने मानधनाची प्रणाली जनरेट होण्यास विलंब झाला.तसेच तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्र असलेल्या किंवा ज्यांचे युडीआयडी कार्डची मुदत संपल्यामुळे ब्लॉक झाले होते, अशा लाभार्थ्यांची नावे पडताळणीसाठी तात्पुरती थांबवली गेली होती. परिणामी दिव्यांगाचे मानधन गेल्या काही महीन्यापासून बंद होते. हे बंद झालेले मानधन सुरु करण्यासंदर्भात शिवसेनेचे आ. बच्चुभाऊ कडु यांनी पाठपुरावा केला.मात्र, तरी देखील ऑगस्ट अखेर पर्यंत वाशिम जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांचे मानधन पुर्वरत सुरु झाले नाही. आ. भावनाताई गवळी पाटील यांनी वाशिम येथे ४ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या जनता दरबारात दिव्यांग बांधवांनी मानधन बंद असल्यामुळे येत असलेल्या अडीअडचणी मांडल्या. यावेळी आ.भावना गवळी पाटील यांनी दिव्यांग सक्षमिकरण विभागाचे सचिव व वाशिमचे उपजिल्हाधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क साधुन अपंगाच्या थांबलेल्या मानधनाबाबत चर्चा केली. दिव्यांगांच्या सर्व समस्या लक्षात घेवून त्यांना तात्काळ मानधन देण्याचे निर्देश दिले. तेव्हा संबधित अधिकाऱ्यांनी या संदर्भात तात्पुरते अपंग प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांगांच्या याद्या तयार करुन मानधन वितरीत करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील दिव्यांगांच्या संघटनांनी मानधन थांबलेल्या लाभार्थ्यांच्या याद्या प्रशासकिय यंत्रणेकडे लवकरात लवकर सादर कराव्यात असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

### मुदत संपलेल्या तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्राचे नूतनीकरण आवश्यक!

महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाने जारी केलेल्या निर्णयानुसार, जर आपल्याकडे सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने दिलेले वैध तात्पुरते अपंगत्व प्रमाणपत्र किंवा युडीआयडी कार्ड असेल, तर विशेष सहाय्य योजनांचे लाभ आणि मानधन अडवले जाणार नाही, ते सुरूच राहील. मात्र, जर तुमच्या तात्पुरत्या प्रमाणपत्राची मुदत संपली तर तुमचे मानधन बंद होऊ शकते अशा वेळी तुम्हाला मुदत संपण्यापूर्वी स्वावलंबन कार्ड पोर्टल वर जाऊन किंवा सरकारी रुग्णालयात प्रमाणपत्राचे नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

# सोशल मीडिया पोस्टवर समाज बांधवांची तक्रार

## ॲड. निळकंठ देशमुख यांच्यावर कठोर कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड शहरातील सोशल मीडियाच्या एका व्हाट्सअप ग्रुपवर करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह पोस्टवरून एका समाज बांधवांनी ॲड. निळकंठ विनायकराव देशमुख यांच्याविरोधात लेखी तक्रार अर्ज साद केला आहे. संबंधित पोस्टमुळे संबंधित अनुयायांच्या भावना दुखावल्या असून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.तक्रार अर्जानुसार, गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी रिसोड शहरातील एका व्हाट्सअप ग्रुपवर ॲड. निळकंठ देशमुख यांनी समाजाबाबत तसेच मनुस्मृती आणि संविधानासंदर्भात आक्षेपार्ह स्वरूपाचे वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथित पोस्टमुळे अनुयायांच्या भावना दुखावल्या असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.



### कायदेशीर ज्ञान असतानाही वक्तव्य केल्याचा आरोप

ॲड. निळकंठ देशमुख हे व्यवसायाने वकील असून त्यांना कायद्याचे ज्ञान असतानाही अशा प्रकारचे वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप तक्रार अर्जात करण्यात आला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजाच्या भावना दुखावणाऱ्या या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

### कारवाई न झाल्यास पुढील पावले उचलण्याचा इशारा

सदर प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्तीवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अर्जाद्वारे करण्यात आली आहे. तसेच तक्रारीची दखल घेऊन योग्य ती कारवाई न झाल्यास नाईलाजास्तव पुढील योग्य ती पावले उचलावी लागतील, असा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे.

यावेळी निवेदन देताना धीरज जुमडे, बंडू शेजुळ, अश्विन तुरुकमाने,अमर पोहरे,शुभम सावंत,बबलू तायडे माया मोरे, रत्नमाला सा जुमडे शुभम मोरे,अनिल अशोक जुमडे आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाडू मातीच्या गणरायाला चिमुकल्यांचा आकार!

## ईकोफ्रेंडली गणपती कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा सहभाग



■ प्रतिनिधी | वाशिम ■

गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा संदेश देत एस.एम.सी. इंग्लिश स्कूल, वाशिमच्या राष्ट्रीय हरित सेनेतर्फे 'ईकोफ्रेंडली गणपती कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले. सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून सुबक गणेशमूर्ती साकारल्या.

कला शिक्षिका भारती गटलेवार यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. पीओपीच्या मूर्तीमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंग तसेच प्लास्टिक व थर्माकोलऐवजी पर्यावरणपूरक सजावटीचा वापर करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. प्राचार्य मीना उबगडे, कला शिक्षिका भारती गटलेवार, राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी आणि शिक्षिका अश्विनी रायपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. 'निर्माल्य कलश' उपक्रम राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी 'निर्माल्य कलश' तयार केला असून गणेशोत्सवादरम्यान संकलित होणाऱ्या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करून त्याचा वापर शाळेच्या रोपवाटिकेसाठी करण्यात येणार आहे.

# कारंज्यात 'तिज' उत्सवाची भव्य शोभायात्रा!

## पारंपरिक नृत्य व वेशभूषेने वेधले लक्ष

■ प्रतिनिधी | कारंजा ■

बंजारा समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा, रूढी आणि लोककलेचे दर्शन घडविणारा पारंपरिक 'तिज' उत्सव रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी कारंजा शहरात मोठ्या उत्साहात आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. तिज विसर्जनानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने कारंजेकरांचे लक्ष वेधून घेतले. सद्यस्थितीत मोहिनी घातलेल्या डि. जे व बँडबाजाविना पारंपारिक वाद्य डफड्याच्या तालावर बंजारा नृत्य सादर करणाऱ्या महिला व युवतींनी संपूर्ण वातावरणात उत्साह आणि चैतन्य निर्माण केले.

तिज हा बंजारा समाजाच्या सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाचा पारंपरिक उत्सव मानला जातो. हिरवळ, निसर्ग, शेती आणि



धनधान्याच्या समृद्धीचे प्रतीक म्हणून तिजकडे पाहिले जाते. पूर्वी बंजारा समाज रानोमाळ वस्ती करून राहत असताना महिला व मुलींना एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा करता यावा, तसेच निसर्ग व शेतीच्या समृद्धीसाठी प्रार्थना करता यावी, या भावनेतून तिज उत्सवाची परंपरा रूढ झाल्याचे समाजातील ज्येष्ठ जाणकार सांगतात.

७ ते ९ दिवस चालतो तिज उत्सव रक्षाबंधनाच्या दिवशी तिजची पेरणी करण्याची परंपरा असून, त्यानंतर साधारण ७ ते ९ दिवस तिज उत्सव साजरा केला जातो. या कालावधीत महिला व युवती दररोज सकाळ-संध्याकाळ तिजची पूजा करतात. ज्वारीच्या हिरव्यागार रोपांची पारंपरिक पद्धतीने पूजा करून धनधान्याची भरभराट, हिरवळ नांदावी आणि कुटुंबात सुख-समृद्धी राहावी.


# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्य शासनाच्या वतीने सन २०२५ पासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' साठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली आहे.

यावर्षीपासून देशभरातील आणि देशाबाहेरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठीही स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली असून जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, या उद्देशाने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

# विद्याभारती शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत ५ सप्टेंबर म्हणजेच भारताचे माजी राष्ट्रपती तसेच थोर विचारवंत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती म्हणजेच शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

गुरुविण न मिळे ज्ञान ज्ञानाविण न होई जगी सन्मान जीवन भवसागर तराया चला वंदु गुरुराया या आपल्या संस्कृती प्रमाणे गुरुवंदन करणे हे आपले संस्कार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमित मिटकरी मुख्याध्यापक नितेश मिटकरी पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर मान्यवरांचा सत्कार समारंभ पार पडला. शाळेतील शिक्षक प्रियंका विभुते, कांचन कापसे, माधुरी मिटकरी, संगीता डहाळे, प्रतिभा पऱ्हाते, वृषाली नवलकार, भारती तांबेकर, ज्योती शिरसाट, कीर्ती कुलकर्णी, पद्मिनी खराटे, सुमित्रा ठाकरे, निकिता हिरवे, रूपाली अवगण, धनंजय आंबटवार, मयूर वाडेकर, महेश लावरवार, पवन निमके, अनिल भिसडे, श्रीकृष्ण गोरे, अमोल इंगळे, अर्जुन मुंढे सर्व शिक्षक व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आदींचा सत्कार करण्यात आला.

# गणेशोत्सव व दुर्गोत्सव डीजेमुक्त करा

## ध्वनीप्रदूषणावर प्रभावी नियंत्रण ठेवा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

गणेशोत्सव आणि दुर्गोत्सव हे भारतीय संस्कृतीतील भक्ती, श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक एकात्मतेचे पर्व आहे. मात्र, उत्सवाच्या नावाखाली होणारा कर्णकर्कश डीजेचा वापर, ध्वनीप्रदूषण आणि फटाक्यांचा अतिरेक यामुळे नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी गणेशोत्सव व दुर्गोत्सव डीजेमुक्त व ध्वनीप्रदूषणमुक्त वातावरणात साजरा करावा, अशी ठाम मागणी विश्वमांगल्य सभा, शाखा कारंजा यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

मागील वर्षी गणेशोत्सव व दुर्गोत्सवादरम्यान काही मंडळांकडून मोठ्या आवाजात डीजे वाजविण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागल्याचे विश्वमांगल्य सभेने निवेदनातून निदर्शनास आणून दिले. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुले तसेच परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांना कर्णकर्कश आवाजाचा त्रास सहन करावा लागतो.

याशिवाय काही ठिकाणी फटाक्यांचा अतिरेक झाल्याने फटाके नागरिकांच्या घरांमध्ये जाऊन फुटल्याच्या घटना घडल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथिल श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, वनोजा येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शिक्षकांच्या भूमिकांचा अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत शैक्षणिक कामकाजाचा अनुभव घेतला.

# तीजोत्सवाने तालुक्यात संचारले चैतन्य; तांड्यांवर उत्साहाचे वातावरण

■ प्रतिनिधी | मानोरा ■

श्रावण महिन्याच्या सुरुवातीला बंजारा समाजाचा सर्वात मोठा आणि पवित्र समजला जाणारा तीज उत्सव मानोरा तालुक्यातील तांड्या-तांड्यावर मोठ्या उत्साहात आणि पारंपारिक पद्धतीने साजरा होत असून, या तीजोत्सवाने तालुक्यात चैतन्याची निर्मिती झाली आहे.

बंजारा समाजात अविवाहित कुमारिका नऊ दिवस उपवास करून टोपलीमध्ये गहू, ज्वारीचे दाणे पेरतात. त्याला रोज पाणी देऊन त्यातून येणाऱ्या अंकुरांची मनोभावे पूजा केली जाते. हा अंकूर म्हणजे समृद्धीचे, सृजनाचे प्रतीक मानले जाते. नऊ दिवसानंतर या अंकुरांना



'तीज' असे म्हटले जाते.

तालुक्यातील विविध तांड्यांमध्ये आज या तीजेचे विसर्जन करण्यात आले. रंगीबेरंगी पारंपारिक वेशभूषा परिधान केलेल्या महिला व कुमारिकांनी डोक्यावर तीजेच्या टोपल्या घेऊन आणि हातात तीजेचे रोपटे घेऊन गावातून मिरवणूक काढली. यावेळी बंजारा पारंपारिक गीत म्हणत, नाचत हा सोहळा पार पडला.

या उत्सवात तांड्यातील कुमारिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. तांड्यातील नायक, कारभारी, डायसन व कुटुंबातील ज्येष्ठांचे आशीर्वाद या निमित्याने कुमारीकांना देण्यात आले.तीज निमित्ताने तांड्यावर एक प्रकारचा उत्साह, एकोपा आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. निसर्गाशी असलेले नाते आणि बंजारा संस्कृतीचे जतन करणारा हा उत्सव नवीन पिढीला आपल्या परंपरेची ओळख करून देत आहे. रुसलेल्या वरून राजाने जलधारांची बरसात करून तप्त जमिनीला, पिकांना, शेतकऱ्यांना, जीव जणगाणींना तृप्त करण्याची प्रार्थना तिजोत्सवाच्या निमित्ता करण्यात आली.

# शिक्षक दिनानिमित्त भारत कन्या शाळेत गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार



**रिसोड :** रिसोड तालुक्यातील एकमेव मुलींची भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन व गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. 'शिक्षक हाच खरा राष्ट्रनिर्माता' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थिनींसह ज्येष्ठ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत मराठी प्राथमिक शाळा, रिसोडच्या अध्यक्षा जयश्रीताई देशमुख होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून गटविकास अधिकारी पल्लवीताई लांडे, गटशिक्षणाधिकारी बद्रीनाथ कोकाटे, जलसंपदा अधिकारी हिंगोली येथील पूजा उदावंत, भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या मंजुषा सु. देशमुख, भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य संजय भांडेकर, सनराईज इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका रोज मेरी जोस तसेच मुख्याध्यापिका किरण दुबे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्राचार्या मंजुषा सु. देशमुख यांनी प्रास्ताविकातून वर्षभरातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक व विविध क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला.

# कारंज्यात 'तिज' उत्सव निमित्त शोभायात्रा!!

## बंजारा समाजाचे पारंपरिक नृत्य व पारंपरिक वेशभूषा ठरली आकर्षण

■ प्रतिनिधी | कारंजा ■

बंजारा समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा 'तिज' उत्सव रविवार, ६ सप्टेंबर रोजी कारंजा शहरात मोठ्या उत्साहात आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. तिज विसर्जनानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. डफड्याच्या तालावर पारंपरिक बंजारा नृत्य सादर करत महिला व तरुणींनी संपूर्ण वातावरणात उत्साह आणि चैतन्य निर्माण केले.

बंजारा समाजाच्या परंपरेत 'तिज'ला हिरवळीचे आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. पूर्वी बंजारा समाज रानोमाळ वस्ती करून राहत असताना महिला व मुलींना एकत्र येऊन आनंदोत्सव साजरा करता यावा, तसेच निसर्ग, शेती आणि धनधान्याच्या समृद्धीसाठी प्रार्थना करता यावी,या उद्देशाने तिजची परंपरा सुरू झाल्याचे समाजातील ज्येष्ठ जाणकार सांगतात.



रक्षाबंधनाच्या दिवशी तिजची पेरणी करण्याची परंपरा असून, त्यानंतर साधारण ७ ते ९ दिवस हा उत्सव उत्साहात साजरा केला जातो. या कालावधीत तरुणी व महिला दररोज सकाळ-संध्याकाळ तिजची पूजा करतात. ज्वारीच्या हिरव्यागार रोपांची पारंपरिक पद्धतीने पूजा करून 'धनधान्य पिकू दे, हिरवळ सदैव नांदू दे, कुटुंबात सुख-समृद्धी राहू दे', अशी मनोभावे आराधना केली जाते.

### पारंपरिक वेशभूषेने वेधले लक्ष

शोभायात्रेत बंजारा समाजातील महिला व तरुणींनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. रंगीबेरंगी पोशाख, पारंपरिक दागिने आणि डफड्याच्या तालावर सादर करण्यात आलेल्या नृत्यामुळे शोभायात्रेला विशेष रंगत आली. महिला व युवतींच्या पारंपरिक नृत्याने उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

### समाजबांधवांचा मोठा सहभाग

या शोभायात्रेत बंजारा समाजातील नायक, कारभारी, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवती तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. समाजातील पारंपरिक रूढी-परंपरा आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेशही या उत्सवातून देण्यात आला. वसंतराव नाईक सभागृह बंजारा कॉलनी या ठिकाणावरून सदर शोभा यात्रेला सुरुवात झाली.शोभा यात्रेच्या सुरुवातीला बंजारा समाजाचे धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज,महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री मा.ना.संजय राठोड यांच्या धर्मपत्नी शितल राठोड,कारंजा मानोरा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८२ ■ मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# खड्ड्यांत रस्ता, ‘कमिशन’च्या चर्चेत विकास!

## आमदार बकाने यांच्या मतदारसंघात जनतेचा उद्रेक

### डागडुजी नको, नवीन रस्ता हवा’चा ग्रामस्थांचा आवाज

**नाचनगाव जनमाध्यम :** पुलगाव-शिरपूर रस्त्याची चाळणी होऊनही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह कायम असताना सोमवारी नाचनगाव चौफुलीवर शेकडो नागरिकांनी जोरदार रस्ता रोको आंदोलन केले. सुमारे २० ते २५ गावांतील नागरिकांनी पुलगाव-शिरपूर रोड कृती समिती’च्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. आम्हाला आता डागडुजी नको, नवीन रस्ताच हवा अशी ठाम भूमिका घेत नागरिकांनी घोषणाबाजी केली.

तब्बल ६० ते ७० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या या रस्त्याची अवस्था आज जीवघेणी झाली आहे. जागोजागी पडलेले मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबर आणि तात्पुरत्या डागडुजीच्या नावाखाली सुरू असलेला कारभार यामुळे दररोज हजारो वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यावर यापूर्वी अनेक अपघात झाले असून नागरिकांच्या जीविताचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीला जवळपास दोन वर्षे उलटत आली तरी रस्त्यांची समस्या कायम असल्याने देवी विधानसभा मतदारसंघातील



लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विकासकामांवरून ठेकेदार आणि राजकीय वर्तुळात ‘कमिशन’च्या चर्चा असल्याचे आरोप स्थानिक पातळीवर होत आहेत. मात्र या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे जनतेचा प्रश्न असा आहे की, राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्यात सामान्य नागरिकांचा जीव का टांगणीला लावला जात आहे?

**कमिशनच्या चर्चेत रस्ता अडकला का ?**

नवीन रस्त्याची मागणी सातत्याने होत असताना कामाला मंजुरी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ठेकेदारांकडून कथित कमिशनची मागणी आणि त्यातून कामांना ब्रेक लागल्याचे आरोप होत असले तरी याबाबत संबंधित आमदार किंवा विभागाकडून अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. मात्र नागरिकांचा संताप आता रस्त्यावर उतरला आहे.

आंदोलनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विलास मुत्तेलवार आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांच्या मागण्या ऐकून लेखी आश्वासन दिले. नवीन रस्त्याचे काम अर्थसंकल्पात प्रस्तावित असून मंजुरीनंतर मजबुतीकरण करण्यात येईल. नाचनगाव येथील दोन किलोमीटर रस्त्याचे मजबुतीकरण मंजूर असून ३० सप्टेंबरपूर्वी काम सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले. उर्वरित रस्त्यावर ८ सप्टेंबरपासून डांबरी पॅचेस टाकण्याचेही लेखी आश्वासन देण्यात आले.

मात्र तात्पुरत्या मलमपट्टीने नागरिकांचे समाधान होणार नाही. नवीन रस्त्याला मंजुरी न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज वसू, काँग्रेस जिल्हाध्यक्ष छोटू चांदूरकर, अमर तिनघसे, शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष संदीप कोचे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पुलगाव अध्यक्ष श्यामसुंदर देशमुख, प्रमोद बिरे, सुधीर काकडे, सतीश बोरसे, दीपक तिवरे, प्रांजळ येडे, शेख गफ्फार, अशोक डफळे, शेखर चचाने, आकाश बोदळे यांच्यासह शेकडो नागरिक आंदोलनात सहभागी झाले.

**पाच वर्षे निघून जातील, पण खड्डे कायम राहतील का**

विधानसभा निवडणुकीनंतर विकासाची आश्वासने देण्यात आली. मात्र दोन वर्षांचा कालावधी जवळ येत असतानाही पुलगाव-शिरपूर मार्गाची अवस्था बदललेली नाही. त्यामुळे आता जनतेचा प्रश्न आहे. आमदार राजेश बकाने यांच्या कार्यकाळात हा रस्ता प्रत्यक्षात कधी सुधारणार की पाच वर्षांचा कार्यकाळ संपेपर्यंत नागरिकांना खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागणार रस्त्याच्या प्रश्नावर आता केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्ष काम सुरू होण्याची वेळ आली आहे. अन्यथा आगामी काळात हा रस्ता लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेचीच कसोटी ठरणार आहे.

# सिमेंटचे काम पाण्याविना; केळझरच्या नालीत निकृष्टतेचा उघड खेळ

## अधिकारी आले अन् कामगार गायब; अधिकारी गेले अन् काम पुन्हा सुरू

**सेलू जनमाध्यम :** केळझर बायपास ते बुद्ध विहार मार्गावरील नाली बांधकामाच्या दर्जावरून ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. लाखो रुपयांच्या या कामात बांधकामाच्या मूलभूत नियमांनाच हरताळ फासला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सिमेंटच्या बांधकामाला क्युरिंगसाठी पाणीच दिले जात नसल्याने ‘सिमेंटवर पाण्याचा विसर, चक्क पावसाच्या पाण्यावरच भिस्त’ अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.



सिमेंटचे बांधकाम मजबूत होण्यासाठी नियमित पाणी देणे आवश्यक असताना, घटनास्थळी टँकर, पाइप अथवा पाण्याची कोणतीही व्यवस्था दिसत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यातच नालीच्या दोन्ही बाजूंच्या साइड पट्ट्यांमध्ये मुरुमाऐवजी मातीचा भराव केला जात असल्याचा गंभीर आरोप आहे. पावसाळ्यात ही माती वाहून गेल्यास नालीलगतचा भाग खचून रस्त्याच्या मजबुतीला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

तक्रार झाली, अधिकारी पाहणीला आले; अधिकारी गेले अन् काम पुन्हा सुरू! या प्रकारामुळे ग्रामस्थांच्या भुवया उंचावल्या आहेत. अधिकारी पाहणीसाठी येताच कामगार निघून गेल्याचे आणि अधिकारी परतताच पुन्हा काम सुरू झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

मंजूर अंदाजपत्रक व तांत्रिक निकष धाब्यावर बसवले जात आहेत का, याची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद लाखे, फारुख शेख, प्रवीण गायकवाड, सुनील कावलकर, डॉ. अशोक दोडके, बबलू सय्यद, सुधाकर मेश्राम, सुधाकर बोरधरे, सज्जाद शेख यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

# कर्जमाफीचा गाजावाजा; शेतकरी मात्र यादीच्या फेऱ्यात

## पहिल्या यादीत नाव नसलेल्या शेतकऱ्यांची बँकांच्या चकरा

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** मोठा गाजावाजा करून जाहीर करण्यात आलेल्या शेतकरी कर्जमाफीचा लाभ अद्यापही अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील महिन्यात सुमारे १५ ते १६ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली. मात्र पहिल्या यादीत नाव नसलेल्या हजारो शेतकऱ्यांना आता दुसरी आणि तिसरी यादी कधी जाहीर होणार, याची प्रतीक्षा लागली आहे.

विशेषतः दोन लाख रुपयांपेक्षा कमी अथवा दोन लाख रुपयांपर्यंत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांची नावे पहिल्या यादीत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे आपले नाव पुढील यादीत येईल आणि कर्जाच्या ओझ्यातून दिलासा मिळेल, या आशेवर शेतकरी आहेत.

कर्जमाफीची प्रक्रिया अत्यंत संथगतीने सुरू असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यादी जाहीर झाली की नाही, खात्यात रक्कम जमा झाली की नाही, याची माहिती घेण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार बँकांच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. कर्जमाफीच्या घोषणेने दिलासा मिळण्याची अपेक्षा असताना प्रत्यक्ष लाभासाठी मात्र शेतकऱ्यांना प्रतीक्षेच्या फेऱ्यात अडकावे लागत आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान करून पात्र लाभार्थ्यांची पुढील यादी तातडीने जाहीर करावी. तसेच पहिल्या यादीतून वगळलेल्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### घोषणा मोठी, लाभाची प्रतीक्षा

कर्जमाफीची घोषणा झाली, पहिली यादीही प्रसिद्ध झाली; काहींच्या खात्यात रक्कमही जमा झाली. मात्र यादीतून वगळलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी अद्याप कागदावरच असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे सरकारने आता दुसरी यादी जाहीर करण्यास आणखी विलंब करू नये, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या चोरणारे दोघे जेरबंद

## सावंगी मेघे पोलिसांची कारवाई; १२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या चोरून नेणाऱ्या दोन आरोपींना सावंगी मेघे पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली. आरोपींकडून चोरीस गेलेल्या दोन्ही बॅटऱ्या असा एकूण १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंदी मेघे येथील सिद्धार्थ शंकरराव मुन यांनी याबाबत सावंगी मेघे पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते २ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान झाडगाव येथे घरासमोर उभ्या असलेल्या वाहनातील ट्रॅक्टरच्या दोन बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या होत्या. यामध्ये एक्साईड कंपनीची जुनी वापरती बॅटरी आणि ॲमरॉन कंपनीची नवीन बॅटरी अशा प्रत्येकी सहा हजार रुपये किमतीच्या दोन बॅटऱ्यांचा समावेश होता.



या प्रकरणी सावंगी मेघे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर ठाणेदार विनोद गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तपास सुरू केला. दरम्यान, मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी गौरव रमेश धुर्वे (२४) आणि प्रतीक पंडित कुरटकार, दोघेही रा. झाडगाव यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या ताब्यातून दोन्ही बॅटऱ्या जप्त करण्यात आल्या. आरोपींना अटक करून वर्धा कारागृहात दाखल करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार विनोद गिरी व पोलिस कर्मचाऱ्यांनी केली. पुढील तपास संजय पंचभाई करीत आहेत.

# वर्ध्यात अतिक्रमणावर पालिकेचा बुलडोजर

## बजाज चौकातील टपऱ्या, हातगाड्या, फलक आणि ओटे भुईसपाट

**पहिल्याच दिवशी ३० ते ३५ दुकानदारांचे साहित्य जप्त**

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील रस्ते आणि चौकांवर वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीचा बोजवारा उडालेला असताना अखेर नगरपालिका प्रशासनाने अतिक्रमणधारकांविरुद्ध बुलडोजर उगारला आहे. सोमवार ७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या धडक मोहिमेच्या पहिल्याच दिवशी शहरातील प्रमुख वर्दळीच्या बजाज चौक परिसरात जेसीबी चालवून अनधिकृत टपऱ्या, हातगाड्या, फलक आणि दुकानांसमोरील ओटे जमीनदोस्त करण्यात आले. पालिका, पोलीस आणि वाहतूक पोलिसांच्या संयुक्त कारवाईने अतिक्रमणधारकांची धावपळ उडाली.

गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील प्रमुख रस्त्यांवर अतिक्रमणाचे पेव फुटले होते. रस्त्याच्या कडेला दुकानदारांनी थाटलेले अनधिकृत स्टॉल, हातगाड्या, जाहिरातींचे फलक आणि दुकानांसमोरील वाढीव बांधकामामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. परिणामी शहरातील चौकांमध्ये वारंवार वाहतूक कोंडी होत असून अपघातांचाही धोका वाढला होता.

कारवाईपूर्वी प्रशासनाने सलग तीन दिवस दवंडी देऊन अतिक्रमणधारकांना स्वतःहून अतिक्रमण हटविण्याची सूचना केली होती. मात्र, सूचनेकडे कानाडोळा करणाऱ्यांवर सोमवारी थेट कारवाईचा बडगा उगारण्यात आला. पहिल्याच दिवशी तब्बल ३० ते ३५ दुकानदारांचे साहित्य जप्त करण्यात आले.





**बजाज चौकाला मोकळा श्वास-** अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू होताच काही व्यावसायिकांनी स्वतःहून आपले साहित्य हटविण्यास सुरुवात केली. जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यालगतचे अतिक्रमण हटविल्यानंतर बजाज चौक परिसराने मोकळा श्वास घेतला. वाहतुकीलाही काही प्रमाणात दिलासा मिळाला.

**दहा दिवस बुलडोजर धडाडणार-** शहरातील अतिक्रमणाचा विळखा पूर्णपणे हटविण्यासाठी ही मोहीम तब्बल दहा दिवस सुरू राहणार आहे. बजाज चौकानंतर शहरातील अन्य प्रमुख मार्ग, चौक आणि अंतर्गत रस्त्यांवरही कारवाई केली जाणार आहे. पुन्हा रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाईसोबतच फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, ऐन सणासुदीच्या काळात झालेल्या कारवाईमुळे लहान व्यावसायिक आणि हातगाडीधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वाहतुकीचा प्रश्न गंभीर असला तरी अतिक्रमणाच्या नावाखाली गरिबांच्या उदरनिर्वाहावर गदा येऊ नये, अशी मागणीही पुढे येत आहे.

# विषारी पावडर पाण्यात मिसळून प्राशन; २२ वर्षीय विवाहितेचा मृत्यू

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** गव्हात टाकण्यासाठी वापरण्यात येणारी पावडर पाण्यात मिसळून प्राशन केल्याने २२ वर्षीय विवाहितेचा मृत्यू झाल्याची घटना काकडा येथे रविवारी घडली. मनिषा रोशन खवशी असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनिषा ही पती रोशन खवशी याच्यासोबत काकडा येथे राहत होती. रविवारी सकाळी सुमारे ११ वाजता रोशन घरी आला असता मनिषा झोपलेली होती. तिला प्रकृतीबाबत विचारले असता डोके दुखत असल्याचे तिने सांगितले. काही वेळाने रोशन कामावर निघून गेला.

दुपारी अडीचच्या सुमारास मनिषाने पतीला फोन करून तब्येत अधिक बिघडल्याचे सांगत घरी बोलावून घेतले. रोशन घरी पोहोचला असता मनिषाच्या तोंडातून फेस येत होता. कुटुंबीयांनी विचारणा केली असता तिने गव्हात टाकायची पावडर पाण्यात मिसळून प्यायल्याचे सांगितले. त्यानंतर रोशनने गावातील ऑटोच्या मदतीने तिला ग्रामीण रुग्णालय, कारंजा येथे नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले.

या प्रकरणी पती रोशन खवशी यांच्या तक्रारीवरून कारंजा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू केला आहे. मनिषाने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचा तपास पोलिस करीत आहेत.


## जाहीर नोटीस

माझ्या अशील सौ. माधुरी राजेशराव दोड या मौजा सावंगी (मेघे), ता. व जि. वर्धा, ग्रामपंचायत सावंगी मेघे हद्दीत येणाऱ्या, मौजा क्र. १३८ पी.एच. क्र. १९, शेत सर्व्हे नं. ८२/३ (जुना), २७४(नवीन), प्लॉट नं. २८ मधील क्षेत्रफळ १९६.८७ चौ.मी. (२११८.३७ चौ.फुट), नकाशानुसार, तसेच ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्रफळ १८६.८७ चौ.मी. (२०१०.७२ चौ.फुट) असलेल्या मिळकतीच्या मालक व कब्जेदार आहेत.सदर मिळकतीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : लेआऊट रोड,
पश्चिमेस : प्लॉट नं. २१,
उत्तरेस : प्लॉट नं. २७,
दक्षिणेस : लेआऊट रोड

सदर मिळकत सौ. अर्चना संतोष लाडे यांनी शेत सर्व्हे नं. ८२/३ (जुना), २७४ (नवीन), प्लॉट नं. २८ मधील क्षेत्रफळ १९६.८७ चौ.मी. (२११८.३७ चौ.फुट) ही मिळकत माझ्या अशील सौ. माधुरी राजेशराव दोड यांना दिनांक १७/०९/२०२५ रोजी दस्त क्र. ४२३९/२०२५, दुय्यम निबंधक, वर्धा यांच्या कार्यालयात नोंदणीकृत विक्रीखताद्वारे विक्री केली असून, सदर मिळकतीवर माझ्या अशीलांचे नाव नियमानुसार फेरफार नोंद करून दाखल करण्यात आलेले आहे.

माझ्या अशीलांकडील सदर मिळकतीशी संबंधित मूळ जोडणी विक्रीखत दिनांक २७/०७/२०१० दस्त क्र. ६१५५/२०१० तसेच मूळ जोडणी विक्रीखत दिनांक २१/०९/२००५, दस्त क्र. ५३००/२००५ ही मूळ कागदपत्रे हरवलेली आहेत.तसेच, माझ्या अशील सौ. माधुरी राजेशराव दोड यांनी सदर प्लॉट नं. २८ बाबत सौ. सरोज नरेश गायकवाड यांच्यासोबत विक्रीचा करारनामा (?ग्रीमेन्ट टू सेल) केलेला असून, सौ. सरोज नरेश गायकवाड यांनी द टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. यांचेकडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

याद्वारे सर्व संबंधित जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद केलेल्या व्यवहारास किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचाही काही हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप, बोजा, गहाण, तारण अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा कायदेशीर हक्क असल्यास किंवा वरील नमूद केलेली मूळ कागदपत्रे कोणास आढळून आल्यास, त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात आपला दावा/आक्षेप सादर करावा.विहित मुदतीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, वरील मिळकतीसंबंधी कोणाचाही कोणताही हक्क, दावा, हितसंबंध अथवा आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ॲड. आर. आर. तिवारी,**
**रामनगर,वर्धा.मो. ९९२२४२६१६८**


# आंघोळीसाठी विहिरीत गेला अन् परतलाच नाही; २७ वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आंघोळ करण्यासाठी शेतातील विहिरीवर गेलेल्या २७ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना बोरगाव (दुमणी) शिवारात रविवारी दुपारी घडली. गजानन वासुदेव अधव असे मृत युवकाचे नाव आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गजानन हा रोजमजुरीचे काम करीत होता. रविवारी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास तो पंकज महेशलाल राठी यांच्या शेतात गेला होता. त्याने वडील वासुदेव बन्सीराम यांना विहिरीवर आंघोळ करण्यासाठी जात असल्याचे सांगितले. बराच वेळ उलटूनही गजानन परतला नाही. त्यामुळे वडिलांनी त्याचा शोध सुरू केला.

विहिरीजवळ गेल्यानंतर गजानन कुठेही दिसला नाही. मात्र, विहिरीतील पाण्यातून बुडबुडे येत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे तो पाण्यात बुडाल्याची शंका आली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. शोधमोहीम राबविल्यानंतर विहिरीच्या पाण्यात गजाननचा मृतदेह आढळून आला.

गजाननला पोहता येत नसल्याने पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाल्याचे वडिलांनी पोलिसांना सांगितले. या घटनेबाबत कोणावरही संशय नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# ज्ञानेश्वर काळे यांचा राज्यस्तरीय विशेष शिक्षक पुरस्काराने सन्मान

**देवळी जनमाध्यम :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून देवळी येथील स्व. रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालयाचे विशेष शिक्षक ज्ञानेश्वर काळे यांना राज्यस्तरीय विशेष शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सेवाभावी वृत्तीने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत काळे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. राज्यभरातून केवळ पाच विशेष शिक्षकांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, त्यामध्ये ज्ञानेश्वर काळे यांचा समावेश झाल्याने देवळीच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

काळे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, समाज कल्याण विभागाच्या सहायक सल्लागार सोनाली शिंदे, जिल्हा सक्षमीकरण अधिकारी प्रतिभा भागवतकर तसेच संस्थेचे अध्यक्ष यादव सूर्यवंशी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर W9927102 वरील माझे DIVYESH BHANDARI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील DIVYESH NARESH BHANDARI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: वॉर्ड नं १ गोदावरी नगर बोरी नागपूर ४४११०८

# संक्षिप्त

## कोळसा टंचाईने वीजसंकट गहिरे

**चंद्रपूर :** पावसाने बऱ्यापैकी विराम घेतल्याने उष्णतेत वाढ होत आहे. त्यामुळे विजेची मागणी वाढण्याची शक्यता असतानाच महानिर्मितीच्या सात वीज केंद्रांत सरासरी नऊ दिवस पुरेल इतकाच एवढा कोळसासाठा शिल्लक असल्याची माहिती आहे. महानिर्मितीला कोळशाचे व्यवस्थापन करीत वीजनिर्मिती



करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यावर उपाय म्हणून येत्या १५ सप्टेंबरपासून विदेशी कोळशाची आयात होण्याचे स्पष्ट संकेत येत आहेत.राज्यात महानिर्मितीची चंद्रपूरसह कोरडी, खापरखेडा, पारस, भुसावळ, परळी व नाशिक येथे केंद्रे आहेत. कोळसा संकट आल्याने या केंद्रांत अतिरिक्त साठा होऊ शकलेला नाही. त्यातच काही भागांत पावसामुळे कोळशाचा पुरवठा प्रभावित झाला आहे. सध्या महानिर्मितीच्या केंद्रात दररोज सरासरी वीसहून अधिक कोळसा रॅक्स प्राप्त होत आहेत. ही घटलेली आवक आहे. वाहतुकीने येणारा कोळसा वेळप्रसंगी ओला झाल्यास वीजनिर्मितीवेळी सयंत्रांची झीज होते. त्याचा वीजनिर्मितवर प्रचंड परिणाम होतो.यंदा उन्हाळा लवकर आला आहे. त्यामुळे वीज मागणी १५ टक्क्यांनी वाढली. त्यातच मुसळधार पावसामुळे काही भागांत कोळसा खाणीतून काढता आला नाही.इंडोनेशियाने कोळसा निर्यात बंद केल्याने भारतातील आयातीवर त्याचा परिणाम झाला. आता संकट गडद होऊ नये म्हणून कोळसा आयतीचा निर्णय घेण्यात आला आहे. आयातीतून दरमहा अपेक्षित असलेल्या कोळशाचे नेमके प्रमाण किती असेल हे तूर्त स्पष्ट झालेले नाही.

## 'छत्रपती शिवरायांनी अफझल खानाचा कोथळा काढला तेव्हा ..'; संजय राऊत

**मुंबई** - पुण्यात डीजेबंदीविरोधात विद्यानंद बापट यांनी आवाज उठवला आहे. डीजे आणि लाऊड स्पीकर बंद झाले पाहिजेत कारण त्याचा लोकांना त्रास होतो. सण उत्सव हे साजरे करायचे असतील तर ते लोकांना त्रास न होता साजरे झाले पाहिजेत असंही विद्यानंद बापट यांचं म्हणणं आहे. बहुतांश पुणेकरांनीही या



गोष्टीला पाठिंबा दिला आहे. रविवारी पुण्यात एका मोर्चाचंही आयोजन करण्यात आले होते. आता खासदार संजय राऊत यांनीही विद्यानंद बापट यांची भूमिका योग्य असल्याचे म्हटले आहे.

## एअर इंडिया एक्सप्रेसचे इंजिन हवेतच बंद

**मुंबई** -एअर इंडिया एक्सप्रेसचे बोईंग ७३७ विमानाला तांत्रिक बिघाडामुळे कोचीला परतावे लागले. अबूधाबीला जाणारे हे विमान ३६ हजार फूट उंचीवर असताना, विमानाच्या एका इंजिनमधील तेलाची पातळी झपाट्याने कमी झाली. पायलटच्या लक्षात येताच क्रूने खबरदारीचा उपाय म्हणून इंजिन



बंद करण्याचा निर्णय घेतला.आज तक ने दिलेल्या वृत्तानुसार एअर इंडिया एक्सप्रेसच्या IX415 या विमानामध्ये ही घटना घडली. या विमानाने कोचीहून उड्डाण घेतल्यानंतर सुमारे ५० मिनिटांनी इंजिन क्रमांक १ मधील तेलाची पातळी कमी होत असल्याचे निदर्शनास आले. पायलटने परिस्थिती लक्षात घेत, विमान पुन्हा कोचीला नेण्याचा निर्णय घेतला. तेलाचा दाब धोकादायक पातळीपर्यंत घसरल्याने संबंधित इंजिन बंद करण्यात आले. एक इंजिन बंद असतानाही विमान सुरक्षितपणे उड्डाण सुरू ठेवू शकत होते. मात्र, प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत विमान अबू धाबीऐवजी कोचीला परत आणण्याचा निर्णय घेण्यात आला.विमान कोची विमानतळावर सुरक्षितपणे उतरले. या घटनेमुळे विमानातील प्रवाशांमध्ये काही काळ चिंता निर्माण झाली असली, तरी विमान सुरक्षितपणे परतल्याने मोठा धोका टळला. घटनेनंतर विमानाच्या तांत्रिक बिघाडाची तपासणी करण्यात येत आहे.

## रिॲलिटी शोमध्ये तरुणाचा भयंकर अपघात

**मुंबई:** मालिका, सिनेमांच्या शूटिंग दरम्यान मृत्यू झाल्याच्या किंवा अपघातात अपंगत्व आल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या आहेत. आता एका रिॲलिटी शोच्या स्पर्धकाचा भीषण अपघात झाल्यानं त्याला पाय गमावावा लागला आहे. या घटनेनंतर स्पर्धकानं निर्मात्यांवर तब्बल १०० दशलक्ष डॉलरचा



दावा ठोकला आहे. रियालिटी टीव्ही जगतातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. लोकप्रिय 'सर्व्हायव्हर ग्रीस' या रिॲलिटी शोमधील २२ वर्षीय स्पर्धक स्टॅव्होस फ्लोरोस यानं शोच्या निर्मात्यांवर तब्बल १०० दशलक्ष डॉलर (सुमारे ८३० कोटी रुपये) भरपाईचा दावा ठोकला आहे. चित्रीकरणादरम्यान झालेल्या भीषण अपघातात गंभीर दुखापत झाल्यामुळं डॉक्टरांना त्याचा डावा पाय गुडघ्यापासून कापून टाकावा लागला आहे.हा अपघात डोमिनिकन रिपब्लिकच्या किनाऱ्याजवळ घडला. शोच्या नियमांनुसार स्पर्धकांना अन्न मिळवण्यासाठी समुद्रात पोहून मासेमारी करावी लागत होती. फ्लोरोस उघड्या समुद्रात पोहत असताना एका वेगानं जाणाऱ्या पर्यटक बोटीनं त्याला जोरदार धडक दिली. बोटीच्या पंख्यामुळे त्याच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली आणि डावा पाय अत्यंत वाईट पद्धतीनं कापला गेला.

## परभणीत एकाच वेळी ४४ मेंढ्यांचा मृत्यू

**परभणी :** परभणीच्या जिंतूर तालुक्यात धक्कादायक घटना समोर आली आहे. एका मेंढपाळाच्या कळपातील तब्बल ४४ मेंढ्यांचा अचानक मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. अचानक झालेल्या या मृत्यूमुळे मेंढपाळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, मृत्यूचे नेमके कारण शोधण्याचे आव्हान



प्रशासनासमोर आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त मेंढपाळाला तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान घटनेची माहिती कळताच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांनी घटनास्थळी भेट दिली असून मृत पडलेल्या मेंढ्यांचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवले आहेत नेमका त्याचा अहवाल आल्यानंतर या मेंढ्यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

# क्रिमिनल, अंडरवर्ल्ड भागातून मला ९२ टक्के मतदान, सुशिक्षित भागात ७५ टक्के मते - केंद्रीयमंत्री गडकरी

**नागपूर :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आपल्या बेधडक आणि रोखठोक वक्तव्यांसाठी ओळखले जातात. नागपुरातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपल्या निवडणुकीतील मतदानाबाबत केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. नागपुरात ९९ टक्के अंडरवर्ल्ड, माझ्या सोशल वर्कचे सपोर्टर आहेत, याचा अर्थ मी त्यांच्या कामाला पाठिंबा देतो, असा नाही, असे गडकरी यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, सुशिक्षित भागांपेक्षा क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरियातून आपल्याला अधिक मतदान झाल्याचा दावाही त्यांनी केला.

गडकरी म्हणाले की, 'जात, पंथ, धर्म आणि भाषा यांच्यापलीकडे प्रत्येक व्यक्तीने पाहिले पाहिजे. असे झाले तर लोकशाहीमध्ये बदल होईल. मी या सगळ्यातून गेलो आहे. राजकारणात चांगलेही केले आणि



वाईटही केले. सर्वांसोबत माझे संबंध आहेत. राजकारणात काम करताना समाजातील विविध घटकांशी संबंध असणे स्वाभाविक आहे. निवडणुकीत मोठमोठ्या सुशिक्षित भागांमधून मला ७० ते ७५ टक्के मते मिळाली. मात्र, ज्या भागांमध्ये क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरिया आहेत, तिथे मला तब्बल ९२ टक्के मते मिळाली,' असा दावा नितीन गडकरी यांनी मतदानाचा संदर्भ देताना सांगितले.

गडकरी पुढे म्हणाले की, मात्र, या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढू नये, अंडरवर्ल्ड माझे सोशल वर्कचे सपोर्टर असले तरी याचा अर्थ माझे त्याठिकाणी खूप जास्त संबंध आहेत किंवा मी त्यांच्या कामाला समर्थन देतो, असा नाही. या भागांमध्ये आपण रस्ते बनवले, सामाजिक कामे केले आणि विकासाची विविध कामे केल्यामुळे तेथील नागरिकांनी मला मतदान केले,' असे गडकरी यांनी स्पष्ट केले.लोकशाहीच्या मूल्यांबाबत बोलताना गडकरी यांनी विश्वसनी यता हीच निवडणुकीतील विजयाची महत्त्वाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. 'समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन विकासाची कामे केल्यास त्याचा राजकीय फायदा मिळतो, केवळ पैसा कमावणे पुरेसे नाही, तर कमावलेल्या पैशातील काही हिस्सा समाजासाठी खर्च करण्याची मानसिकता असणे गरजेचे आहे,' असे त्यांनी सांगितले. काही लोक मोठ्या प्रमाणात पैसा कमावतात, १०० रुपये कमवून १० पैसेही समाजासाठी नाही देत, तर काही जण आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा सामाजिक कामांसाठी वापरतात, असे उदाहरण त्यांनी दिले.

# मोठा आवाज म्हणजे उत्सव नाही, आवाजाला मर्यादा हवीच - जेन-झी

**पुणे:** सण-उत्सव म्हटले की जल्लोष, संगीत, ढोल-ताशांचा गजर आणि डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई हे चित्र हमखास दिसते. विशेषतः जेन-झी पिढीला संगीत, नृत्य आणि उत्सवाचे आकर्षण मोठे आहे. मात्र, उत्सवाचा आनंद घेताना डीजेचा आवाज किती असावा, यावर या पिढीचे मत जाणून घेतले असता केवळ 'मोठा आवाज म्हणजे जास्त मजा' किंवा 'मोठा आवाज म्हणजे उत्सव' असे समीकरण नसल्याची स्पष्ट भूमिका जेन-झींनी मांडली.

कानठळ्या बसविणारा आवाज, सततचा कर्कश दणदणाट आणि अनेक तास सुरू



असलेला डीजे यामुळे काही तरुणांनाही त्रास होतो. उत्सव साजरा करण्यासाठी संगीत आवश्यक आहे; मात्र त्याचा आवाज इतरांना त्रासदायक ठरणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत अनेक तरुणांनी व्यक्त केले. आजची जेन-झी पिढी विविध प्रकारचे संगीत ऐकते. मोबाइल, हेडफोन, म्युझिक स्ट्रीमिंग आणि सोशल मीडियामुळे संगीताची आवडही बदलली आहे. त्यामुळे केवळ मोठ्या आवाजात वाजणारे संगीत म्हणजेच चांगले संगीत, असे त्यांना वाटत नाही. आवाजापेक्षा गाण्याची निवड, बीट्स आणि वातावरण महत्त्वाचे असल्याचे ते सांगतात. उत्सवात मित्रांसोबत नाचणे, आनंद घेणे हा भाग महत्त्वाचा आहे. मात्र, त्यासाठी स्पीकरचा आवाज इतका वाढवण्याची गरज नाही की जवळच्या घरातील ज्येष्ठ नागरिक, लहान मुले किंवा आजारी व्यक्तींना त्याचा त्रास व्हावा. त्यामुळे 'मजा करा, पण दुसऱ्यांना त्याची किंमत मोजावी लागू नये', अशी भावना तरुणांमध्ये व्यक्त होत आहे.

शहरातील गर्दीच्या परिसरात सण-उत्सवाच्या काळात डीजेचा आवाज अधिक तीव्र जाणवतो. रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारे मोठे स्पीकर, वाहनांची गर्दी आणि त्यात मिसळणारा आवाज यामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय होते.

# शिवसेनेचे ऑपरेशन 'टायगर-४' लवकरच!

**मुंबई:** 'उबाठा गटाचे २० पैकी १४ आमदार सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असून, ग्रीन सिग्नल' मिळताच लवकरच 'ऑपरेशन टायगर-४' प्रत्यक्षात येईल आणि हे आमदार शिवसेनेत प्रवेश करतील', असा दावा अंधेरी पूर्व मतदारसंघाचे आमदार मुरजी पटेल यांनी सोमवारी केला.याविषयी माध्यमांशी बोलताना आमदार पटेल म्हणाले की, १४ आमदारांच्या पक्षप्रवेशाला ग्रीन सिग्नल मिळाला की ही मोहीम फत्ते होईल. आगामी काळात आमदारांनंतर उबाठा गटातील काही नगरसेवकही शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत



दाखल होऊ शकतात. दरम्यान, या दाव्यावर बोलताना उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी, अशा कोणत्याही दाव्यांना गांभीर्याने घेण्याची गरज नाही, असे म्हणत हा निव्वळ राजकीय स्टंट असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, उबाठा गटातील काही आमदारांनी अज्ञात ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गुप्त भेट घेतल्याची माहिती सूत्रांच्या हवाल्याने समोर आली आहे.

*राज्य सरकारने मराठा समाजासाठी घेतले चार मोठे निर्णय*

# परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसह मिळणार हे लाभ

**मुंबई** - मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर आज राज्य सरकारने मराठा समाजासाठी चार मोठे निर्णय घेतले आहेत. तसेच या निर्णयाचे शासन आदेशही काढण्यात आले आहेत.

राज्य सरकारने मराठा समाजासाठी घेतलेल्या या चार निर्णयांनुसार पॉलिटेक्निकमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सुविधा



देण्यात येणार आहेत. त्याबरोबरच पॉलिटेक्निकमध्ये शिकणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आता वसतीगृहाचा लाभ घेता येणार आहे. तसेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात शिकण्यासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. सारथीच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणांना ड्रायव्हिंगचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

त्याबरोबरच कुणबी प्रमाणपत्राबाबत आज एक महत्त्वपूर्ण बैठक झाली असून, शिंदे समितीला सापडलेल्या कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये लावण्याचा निर्णय आज घेण्यात आला आहे.

# मागण्या तात्काळ मान्य करा, नाहीतर... दानवे

**मुंबई** - मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज दहावा दिवस असून, त्यांनी पाणी आणि वैद्यकीय उपचार घेण्यासही नकार दिल्याने त्यांची प्रकृती अधिकच खालावल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अंतरवली सराटीत उपस्थित मराठा आंदोलकांमध्ये चिंता वाढली आहे. जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची माहिती मिळताच ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे अंतरवली सराटीत दाखल झाले. त्यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच जरांगे यांनी उपोषण सोडावे, अशी विनंतीही दानवेंनी केली.

दरम्यान, जरांगे यांच्या



प्रकृतीवर लक्ष ठेवण्यासाठी वैद्यकीय पथक अंतरवलीत ठाण मांडून आहे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि त्यांची टीम त्यांना उपचार घेण्याचा आग्रह करत आहे. मात्र, जरांगे पाटील यांनी उपचार घेण्यास स्पष्ट नकार दिल्याची माहिती मराठा आंदोलक अशोक काळकुटे यांनी दिली. काल सायंकाळीही त्यांची प्रकृती अधिक खालावली होती.

अंबादास दानवे यांनी सरकारला जरांगे यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याचं आवाहन केलं आहे. 'जरांगे पाटील यांनी ज्या मागण्या मांडल्या आहेत, त्या ताबडतोब मान्य करण्याची गरज आहे. सरकारने या आंदोलनाची दखल घेणं आवश्यक आहे,' असं दानवे म्हणाले. तसंच मागण्या त्वरेने मान्य झाल्या नाहीत तर परिस्थिती गंभीर होऊ शकते, असा इशाराही दानवेंनी दिला. 'त्वरेने मागण्या मान्य झाल्या नाहीत तर विस्फोट होऊ शकतो आणि त्याला जबाबदार कोण आहे, हे सांगायची गरज नाही,' असं त्यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले.

# फडणवीसांनी राज ठाकरेंकडून प्रचार करुन घेतला अन् निवडणुकीत त्यांच्याच पोराला पाडले- जरांगे पाटील

**मुंबई** -मुख्यमंत्री फडणवीस हे राज्यातील लोकांवर मोगलाईपेक्षा वाईट काळ आणू शकतात. फडणवीस राजकारणी आणि उद्योगपतींना ईडी लावून उद्धवस्त करत आहे. त्याला वाटेल तशा केसेस करत आहे, असे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली. देवेंद्र फडणवीस यांची मग्रुरी आणि हिटलरशाही मराठा राजकारणी सहन करत असतील तर तुमच्या जिंदगीवर थुकावं लागेल. एवढा मग्रूर शासक राज्याला परवडणारा



नाही. भाजपमधील नेत्यांनीही ही गोष्ट समजून घ्यावी. एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांचे फडणवीसांकडून काय हाल सुरु आहेत, हेदेखील खोलात जाऊन बघा, असेही मनोज जरांगे यांनी म्हटले. ते सोमवारी अंतरवाली सराटी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. यावेळी जरांगे पाटील यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्याबाबतही भाष्य केले.

देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे यांच्याकडून प्रचार आणि भाषणं करुन घेतली. त्यानंतर राज ठाकरे यांच्याच पोराला निवडणुकीत पाडले. देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या काही लोकांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची तिकीटं द्यायला लावली. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्याकडे सध्या त्यांचे असे १० ते १२ आमदारच आहेत. उद्धव ठाकरे साहेबांचाही फडणवीसांनी वापर करुन घेतला. भाजपकडून सातत्याने शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसने मराठा समाजासाठी काय केलं, असा प्रश्न विचारला जातो. पण तुम्ही सत्तेत असून मराठ्यांसाठी काय दिवे लावलेत, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला.

*कारच्या इंजिनमध्ये काळ*

# बोनट उघडताच ७ फूटाचा अजगर पाहून उडाला थरकाप

**दहिसर** - जरा विचार कराष्ठ तुम्ही कारचं बोनट उघडलं आणि तुमच्यासमोर भला मोठा अजगर वेटोळे घालून बसलेला दिसला तर काय कराल? या भल्या मोठ्या अजगराला पाहून तुमची बोबडी वळल्याशिवाय राहणार नाही. मुंबईच्या दहिसरमधला एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओत एक ७ फूटाचा अजगर कारच्या बोनटमध्ये काळ बनून आरामात



बसल्याचं दिसून येतंय. हा व्हिडीओ पाहूनच अनेकांची तंतरली आहे. अंगाचा थरकाप उडाला आहे.

व्हिडीओ पाहणाऱ्या प्रत्येकाच्या काळ जात धस्स झाल्याशिवाय राहत नाही, इतकं हे भयानक दृश्य आहे.

# कुंभमेळ्याच्या तयारीत भोंदू साधूंचा सुळसुळाट

**नाशिक:** दर बारा वर्षांनी भरणारा नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळा यंदा न भूतो न भविष्यती करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून ३४ हजार कोटी रुपये कुंभमेळ्यावर खर्च करण्यात येत आहेत. अशातच आता पोलिसांचा देखील मोठा बंदोबस्त यावर्षी असणार आहे. तसेच दरवेळी चोरट्यांचा देखील सुळसुळाट यंदाच्या कुंभमेळाव्यात पहायला मिळू शकतो. अशातच कुंभमेळाव्याच्या आधीच बोगस नागा साधूचा धक्कादायक प्रकार पहायला मिळाला आहे. ओझर परिसरात एका मिठाई व्यावसायिकाला संमोहित करून त्याच्या हातातील सोन्याची अंगठी लंपास करणाऱ्या दोन कथित बोगस नागा साधूंना ओझर पोलिसांनी मध्य प्रदेशातून ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्र्यंबकेश्वर येथे भंडारा आणि पूजेच्या नावाखाली दक्षिणा मागण्यासाठी एक साधू ओझरमधील मिठाईच्या दुकानात



**मिठाई व्यावसायिकाला संमोहित करून सोन्याची अंगठी लंपास**

पोहोचला. यावेळी गल्ल्यावर बसलेल्या दुकानदाराच्या हातातील सोन्याची अंगठी त्याच्या नजरेस पडली. यानंतर हातचलाखी आणि संमोहनाचा वापर करत दुकानदाराच्या नकळत ही अंगठी काढून घेण्यात आल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, हा संपूर्ण प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला.

घटना लक्षात आल्यानंतर दुकानदाराने ओझर पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तपासाला वेग देत परिसरातील तब्बल ४० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले.

सीसीटीव्हीच्या आधारे संशयितांचा माग काढत पोलिसांचे पथक मध्य प्रदेशातील खरगोन परिसरात पोहोचले. अखेर तेथून दोन कथित बोगस साधूंना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणाचा पुढील तपास ओझर पोलीस करत असून, या टोळीच्या इतर साथीदारांचा सहभाग आहे का, याचाही तपास केला जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## इस्त्रोची भरारी

**इस्त्रोने आपला पहिला इमेजिंग सॅटेलाइट यशस्वीपणे प्रक्षेपित करून भारताच्या अंतराळ क्षेत्रात आणखी एक ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. हे यश केवळ उपग्रह प्रक्षेपणापुरते मर्यादित नसून, भारताच्या वाढत्या तांत्रिक आणि सामरिक क्षमतेचे द्योतक आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्वदेशी संशोधन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर भारत 'विकसित भारत २०४७'च्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे या मोहिमेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे. हा अत्याधुनिक इमेजिंग उपग्रह रिअल-टाइम निरीक्षण, महत्त्वपूर्ण माहिती संकलन आणि रणनीतिक डेटाच्या माध्यमातून राष्ट्रीय सुरक्षा, संरक्षण, हवामान निरीक्षण आणि आपत्ती व्यवस्थापनाला बळ देणार आहे. या यशामुळे अत्याधुनिक इमेजिंग व देखरेख तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या देशांमध्ये भारताचे स्थान अधिक भक्कम झाले आहे. जीएसएलव्हीच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे स्वदेशी क्रायोजेनिक तंत्रज्ञानावरील भारताचे प्रभुत्वही अधोरेखित झाले आहे. पूर्वीच्या तांत्रिक अडचणी आणि अपयशांवर मात करत इस्त्रोने मिळवलेले हे यश भविष्यातील गगनयानासह अनेक महत्त्वाकांक्षी मोहिमांसाठी नवा आत्मविश्वास देणारे ठरेल. आव्हाने मोठी असली तरी विज्ञान, तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळाच्या बळावर भारत जागतिक अंतराळ क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. हे यश नव्या भारताच्या सामर्थ्याचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. चांद्रयान मोहिमांपासून ते प्रगत प्रक्षेपण तंत्रज्ञानापर्यंत भारताने अंतराळ संशोधनात सातत्याने महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. आता या यशस्वी प्रक्षेपणामुळे भारताने अमेरिका, रशिया, चीन, जपान आणि फ्रान्स यांसारख्या प्रगत अंतराळ क्षमता असलेल्या देशांच्या पंक्तीत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. या कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्त्रोच्या शास्त्रज्ञांचे केलेले कौतुक निश्चितच सार्थ ठरते. इस्त्रोसाठी हे यश प्रतिष्ठेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. त्याचबरोबर या मोहिमेचे आणखी एक मोठे महत्त्व म्हणजे क्रायोजेनिक इंजिन तंत्रज्ञानाच्या वापरातील भारताचे वाढते कौशल्य या यशातून अधोरेखित झाले. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील ही झेप भविष्यातील गगनयानासह महत्त्वाकांक्षी मोहिमांसाठी नवा आत्मविश्वास देणारी ठरणार. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) यशस्वी जीएसएलव्ही प्रक्षेपणाने भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला आणखी एक महत्त्वाची झेप दिली आहे. जीएसएलव्हीसारखे प्रक्षेपण वाहन विकसित करणे ही अत्यंत गुंतागुंतीची आणि आव्हानात्मक प्रक्रिया आहे. त्यात स्वदेशी क्रायोजेनिक इंजिन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. या तंत्रज्ञानातील गुंतागुंत आणि पूर्वीच्या काही अपयशांमुळे जीएसएलव्हीला कधीकधी 'नॉटी बॉय' असे संबोधले गेले आहे. मात्र, या आव्हानांवर सातत्याने मात करत इस्त्रोने पुन्हा एकदा आपल्या तांत्रिक क्षमतेची आणि आत्मविश्वासाची प्रचिती दिली आहे. जीएसएलव्ही एफ-१७चे यशस्वी प्रक्षेपण हे केवळ एका उपग्रहाला अवकाशात पोहोचवण्याचे यश नाही, तर अत्याधुनिक आणि गुंतागुंतीचे अंतराळ तंत्रज्ञान स्वदेशी पातळीवर विकसित करण्याच्या भारताच्या क्षमतेचे द्योतक आहे. इस्त्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी हे देशासाठी ऐतिहासिक यश असल्याचे सांगत, आगामी काळात आणखी अनेक महत्त्वाकांक्षी मोहिमा हाती घेण्याचे संकेत दिले आहेत. या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रक्षेपित करण्यात आलेल्या उपग्रहाचे वजन. सुमारे १,५३६ किलो वजनाचा हा उपग्रह भूस्थिर कक्षेत सुमारे ३६ हजार किलोमीटर उंचीवर स्थापन करण्यात आला आहे. एवढ्या वजनाचा आणि तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक उपग्रह स्वदेशी प्रक्षेपण क्षमतेच्या माध्यमातून निर्धारित कक्षेत पोहोचवणे ही भारताच्या अंतराळ तंत्रज्ञानातील वाढत्या सामर्थ्याची महत्त्वपूर्ण खूण आहे. या उपग्रहामुळे भारताच्या विस्तीर्ण भूभागावर सातत्याने देखरेख ठेवण्याच्या क्षमतेत वाढ होणार आहे. सीमावर्ती भागांचे निरीक्षण, महत्त्वाच्या राष्ट्रीय पायाभूत सुविधांवर लक्ष ठेवणे, नैसर्गिक आपत्तींचे निरीक्षण तसेच हवामानातील अचानक होणारे बदल टिपणे यांसारख्या अनेक क्षेत्रांत या उपग्रहाच्या क्षमतेचा उपयोग होऊ शकतो. त्यामुळे हा उपग्रह भारतासाठी आकाशातील आणखी एक महत्त्वाचा 'डोळा' ठरणार. जीएसएलव्हीच्या यशामागे अनेक वर्षांचा अनुभव, संशोधन आणि अपयशातून घेतलेले धडे आहेत. २०१० मध्ये जीएसएलव्हीच्या क्रायोजेनिक इंजिनाशी संबंधित तांत्रिक अडचणींमुळे मोहिमांना अपयश आले होते. क्रायोजेनिक इंजिन तंत्रज्ञान हे अंतराळ क्षेत्रातील अत्यंत गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मक तंत्रज्ञान मानले जाते. अत्यंत कमी तापमानातील इंधन आणि उच्च तापमानातील दहन प्रक्रिया यांचा अचूक समन्वय साधावा लागतो. त्यामुळे या तंत्रज्ञानात अचूकता, विश्वासार्हता आणि सातत्यपूर्ण सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. पूर्वीच्या तांत्रिक अडचणी आणि अपयशांवर मात करत इस्त्रोने स्वदेशी क्रायोजेनिक तंत्रज्ञानात मिळवलेले प्रभुत्व जीएसएलव्हीच्या यशस्वी प्रक्षेपणातून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. या यशामुळे इस्त्रोच्या शास्त्रज्ञांचा आत्मविश्वास निश्चितच वाढला असून, गगनयानासह भविष्यातील अनेक महत्त्वाकांक्षी मोहिमांना यामुळे नवी ऊर्जा मिळणार आहे. त्याचबरोबर भारताच्या स्वायत्त अंतराळ कार्यक्रमाला आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासाला अधिक बळ मिळणार आहे. चांद्रयान, मंगळयान, विविध पृथ्वी निरीक्षण मोहिमा आणि प्रगत प्रक्षेपण वाहनांच्या माध्यमातून भारताने अत्याधुनिक अंतराळ तंत्रज्ञान विकसित करण्याची आपली क्षमता सातत्याने सिद्ध केली आहे. तुलनेने कमी खर्चात प्रभावी तंत्रज्ञान विकसित करण्याची भारताची क्षमता ही जागतिक अंतराळ क्षेत्रात त्याची महत्त्वाची जमेची बाजू ठरत आहे. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून झालेले जीएसएलव्हीचे हे यश भारताच्या वाढत्या अंतराळ सामर्थ्याचे प्रतीक आहे. हवामान निरीक्षण, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय सुरक्षा, सीमावर्ती भागांचे निरीक्षण आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर लक्ष ठेवण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ शकतो. म्हणूनच जीएसएलव्हीचे हे भारताच्या वैज्ञानिक स्वावलंबनाचा आणि 'विकसित भारत २०४७'च्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीचा महत्त्वपूर्ण मैलाचा दगड आहे. इस्त्रोच्या संपूर्ण वैज्ञानिक, तांत्रिक आणि अभियांत्रिकी पथकाचे मनःपूर्वक अभिनंदन!**

**बड्या कर्जदारांची हजारो कोटींची कर्जे निर्लेखित होतात, त्याहून मोठ्या रकमांवर 'हेअरकट' घेऊन कर्जप्रकरणे संपवली जातात; मात्र सामान्य कर्जदाराकडून पै आणि पै वसूल केली जाते. बड्या थकबाकीदारांच्या नावांभोवती गोपनीयतेचे कवच आणि छोट्या कर्जदारांची जाहीर बदनामी, असा हा बँकिंग व्यवस्थेतील दुहेरी न्याय. माहिती अधिकारातून समोर आलेल्या आकडेवारीने या व्यवस्थेतील मोठ्या विसंगतीवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.**

# बड्यांचा 'हेअरकट', सामान्यांना भुर्दंड..

**'झी'** उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा सुभाषचंद्र यांचं २२ हजार कोटींचं कर्ज सव्वासहा कोटींमध्ये संपवण्यात आल्याच्या बातमीने सगळ्यांना हेअरकट नावाचा शब्द माहीत झाला. २०१६ साली गाजावाजा करून इनसॉल्व्हन्सी आणि बँकरप्सी कोड या नावाने आणलेल्या कायद्यानुसार बँकांना थकीत कर्जवसुलीसाठीची सोपी व्यवस्था निर्माण केली गेली. बँकांना आपली कर्जवसुली करण्यासाठी एनसीएलटी या विशेष कोर्टात या कायद्यान्वये जाण्याची सुविधा निर्माण झाली. या ठिकाणी गेल्यानंतर बँकांना संपूर्ण वसुली मिळणे शक्य नसेल तर थोडीफार तडजोड करावी लागते आणि या प्रक्रियेत ज्या रकमेवर पाणी सोडून प्रकरण निकाली काढले जाते त्या रकमेला हेअरकट असे म्हटले जाते. यासंदर्भात आधी बँकांमधील थकबाकीबाबतच्या काही संज्ञांची माहिती घेणं आवश्यक आहे.

कर्जदार सलग तीन महिने बँकेच्या कर्जाचे हप्ते देत नाही तेव्हा ते कर्ज एनपीए होते. मग बँक त्या कर्जाच्या वसुलीसाठी विशेष प्रयत्न सुरू करते. २०१५ पर्यंत बहुतेक सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एनपीए १० टक्क्यांच्या वर होते. २०१५ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बँकांना ॲसेट क्वालिटी रिव्ह्यू करण्यास सांगितले. जी कर्जे वसूल होण्याची शक्यता उरलेली नाही ती निर्लेखित करायला बँकांनी सुरुवात केली. आपल्या नफ्यातून ही प्रक्रिया केल्याने त्यांचा आयकर वाचला आणि भागधारकांना लाभांश देण्याचीही गरज उरली नाही.

निर्लेखित कर्जे बँकांच्या ताळेबंदातून काढून टाकली जात असली तरी त्यांची वसुली प्रक्रिया सुरूच राहते असे बँका सांगतात. माहिती अधिकार कायद्याअंतर्गत यासंदर्भात विचारणा केली असता बड्या कर्जदारांची (१०० कोटींहून अधिक कर्जे ) किती कर्जे निर्लेखित केली आणि आजवर किती वसुली झाली याची माहिती अत्यंत धक्कादायक होती. स्टेट बँक ऑफ इंडियाने नुकत्याच दिलेल्या माहितीनुसार बँकेने गेल्या दहा वर्षांत बड्या कर्जदारांचे (१०० कोटींवरील) १,५१,८५७ कोटी रुपये निर्लेखित केले आहेत. आजवर त्यातील जेमतेम १४ टक्के म्हणजे २०,८३८ कोटी रुपयांची वसुली होऊ शकली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या माहितीनुसार गेल्या दहा वर्षांत बड्या कर्जदारांचे (१०० कोटींवरील) २६,७०१ कोटी रुपये निर्लेखित केले व आजवर त्यातील जेमतेम १५ टक्के म्हणजे ३,८७५ कोटी रुपयांची वसुली होऊ शकली आहे. बँक ऑफ बरोडाने गेल्या सहा वर्षांत बड्या कर्जदारांचे (१०० कोटींवरील) ३५,७१५ कोटी रुपये निर्लेखित केले व आजवर त्यातील जेमतेम २७ टक्के म्हणजे ९,९४६ कोटी रुपयांची वसुली होऊ शकली आहे. बँक ऑफ महाराष्ट्रने गेल्या दहा वर्षांत बड्या कर्जदारांचे (१०० कोटींवरील) ११,३१३ कोटी रुपये निर्लेखित केले असून आजवर त्यातील जेमतेम २४ टक्के म्हणजे २,७२७ कोटी रुपयांची वसुली होऊ शकली आहे. मात्र यापैकी एकाही बँकेने हे बडे थकबाकीदार कोण आहेत, त्यांची प्रत्येकी किती कर्जे, कधी निर्लेखित केली याची माहिती द्यायला नकार दिला.



बँकिंगमध्ये विलफुल डिफॉल्टर अशी संज्ञा आहे. म्हणजे कर्ज फेडण्याची ऐपत असूनही कर्ज फेडत नाहीत किंवा घेतलेले कर्ज भलतीकडेच वळवलेले असते असे थकबाकीदार. अशा विलफुल डिफॉल्टरची कर्जवसुली करण्यासाठी बँका सरफेसी कायदा, डीआरटी तसेच एनसीएलटी यांचा आधार घेतात.एनसीएलटीमध्ये बँकांना कशा प्रकारचे हेअरकट घ्यावे लागतात हे सुभाषचंद्र केसमध्ये सगळ्यांना कळले. मी यासंदर्भात माहिती अधिकाराअंतर्गत विचारले होते की संबंधित राष्ट्रीयीकृत बँकानी गेल्या नऊ वर्षांत किती थकबाकीदारांची प्रकरणे एनसीएलटीमध्ये नेली आणि त्यात त्यांना किती हेअरकट सोसावा लागला? गेल्या नऊ वर्षांत स्टेट बँक ऑफ इंडियाने ३०९ प्रकरणे एनसीएलटीमध्ये नेली. त्यामध्ये एकूण अडकलेली रक्कम होती १,४९,८९५ कोटी रुपये आणि शेवटी बँकेला तब्बल एक लाख कोटी रुपयांचा हेअरकट (६७ टक्के) घेऊन फक्त ४९,७०० कोटी रुपयांच्या वसुलीवर समाधान मानावे लागले.

बँक ऑफ महाराष्ट्रने सहा वर्षांत २७ प्रकरणे एनसीएलटीमध्ये नेली. त्यामध्ये एकूण अडकलेली रक्कम होती ३,६९० कोटी रुपये आणि शेवटी बँकेला तब्बल २,४६३ कोटी रुपयांचा हेअरकट (६७ टक्के) घेऊन फक्त १,२२७ कोटी रुपयांच्या वसुलीवर समाधान मानावे लागले. बँक ऑफ बडोदाने गेल्या सहा वर्षांत ७,८१७ कोटी रुपयांचा हेअरकट घेतला एवढेच सांगितले. माहिती अधिकारातही अशी महत्त्वाची माहिती नाकारली जाणे ही या कायद्याचा धाक उरला नसल्याची प्रचीती आहे. तिन्ही बँकांनी कोणत्या प्रकरणात किती हेअरकट घेतला आणि कोणत्या थकबाकीदारांमुळे बँकेला हा तोटा सहन करावा लागला ही माहिती देण्यास गोपनीयतेच्या नावाखाली नकार दिला.

वास्तविक जी प्रकरणे एनसीएलटी न्यायालयात गेली आणि बँकेला हेअरकट सोसावा लागून कायमची संपली त्या प्रकरणांमध्ये थकबाकीदारांची नावे गोपनीय ठेवण्याचे कारणच काय? नुकतीच मी स्टेट बँकेची वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली एक जाहिरात पाहिली. त्यात एका मोटारगाडीच्या कर्जदाराचे सहा लाख रुपये कर्ज एनपीए झाले म्हणून त्याच्या गाडीचा बँकेने लिलाव काढला होता. या जाहिरातीत तर गाडीच्या वर्णनाबरोबरच कर्जदाराचे नाव आणि पत्ताही प्रसिद्ध केला होता. म्हणजे बँक त्याच्या गाडीचा लिलाव करून कर्जवसुली करणार, वर थकबाकीदार म्हणून त्याचे नाव प्रसिद्ध करणार आणि दुसरीकडे ज्या बड्या कर्जदारांमुळे हजारो कोटी रुपयांचा हेअरकट सोसावा लागला त्यांची नावे मात्र गोपनीय ठेवणार, हा काय प्रकार आहे?

हेअरकटच नाही तर पूर्ण नुकसान झालेल्या प्रकरणांमध्येही बँका थकबाकीदारांचे नाव गोपनीय ठेवतात, यात एक अंतस्थ हेतू असावा. समजा, काही ठरावीक मंडळींनाच अनेक बँकांनी कर्जे दिली आहेत आणि हेअरकटरूपी नुकसान सोसून या बँकांनी ही प्रकरणे मिटवली आहेत, असे दिसून आले, तर त्यासाठी संचालक मंडळाला जबाबदार धरले जाऊ शकते. या भीतीने ही नावे दडवली जात असावीत.

बँकांच्या या अपारदर्शक कारभाराचा फटका शेवटी सामान्य माणसालाच बसतो, कारण हेअरकटमधून झालेले नुकसान भरून काढण्यासाठी बँका एसएमएस चार्जेस, मिनिमम बॅलन्स पेनल्टी या मार्गांनी ग्राहकांकडून पैसे काढतात. गेल्या फक्त चार वर्षांत भारतातील बँकांनी सर्वसामान्य माणसांकडून २६,१७० कोटी रुपयांची रक्कम मिनिमम बॅलन्स पेनल्टी या नावाने उकळली आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने सामान्य माणसाच्या करांचे जवळपास साडेतीन लाख कोटी रुपये या बँकांमध्ये रीकॅपिटलायझेशनच्या नावाखाली टाकले आणि या बँकांनी त्याचा उपयोग कर्जे निर्लेखित करण्यापासून हेअरकट घेण्यापर्यंत केला आहे.

छोट्या थकबाकीदारांची नावापत्त्यासह वर्तमानपत्रातून जाहीर बदनामी करून त्यांची घरेदारे विकून कर्जवसुली करण्यात तत्परता दाखवणाऱ्या बँका बड्या कर्जदारांबाबत बोटचेपी भूमिका घेतात, मोठाल्या रकमांवर पाणी सोडतात आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि अर्थमंत्रालय यात बघ्याची भूमिका घेते, हे दुर्दैवी आहे. मुळात बेजबाबदारपणे ही मोठाली कर्जे देणे, मग ती निर्लेखित करणे, मग त्यांची वसुली करण्यात अपयश येणे, हजारो कोटी रुपयांवर पाणी सोडून द्यावे लागणे या सगळ्याला जबाबदार असते ते संचालक मंडळ. त्याच्यावर काहीच कारवाई होत नाही हे जनतेचे दुर्भाग्य.

**विवेक वेलणकर**

## हाच का 'सबका साथ सबका विकास?

**आदरणीय श्री नरेंद्र मोदी,**
**पंतप्रधान मंत्री, भारत सरकार,**
**नवी दिल्ली.**

**विषयः**-मुठभर जनतेला २०० लाख कोटी आणि ८० कोटी जनतेला ५ किलो मोफत धान्य?हाच का 'सबका साथ सबका विकास?'

**सादर नमस्कार,**

१५ ऑगस्ट २०२६ रोजीचे तुमचे भाषण ऐकल्यानंतर आम्ही तुम्हाला २० ऑगस्ट २०२६ रोजी पत्र दिले आहे.एसआरसीसी (श्री राम कॉलेज, नवी दिल्ली) येथे विद्यार्थ्यांसमोर केलेले भाषण ऐकल्यानंतर आज हे पत्र लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

तुम्ही मला याच व्यासपीठावर २०१३ साली दिलेल्या तुमच्या भाषणाची आठवण करून दिली. २०१३ मध्ये देशाची परिस्थिती किती वाईट होती, हे तुम्ही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता. तुमच्या १२-१३ वर्षांच्या कार्यकाळात देश चमकू लागला आहे. रस्ते, रेल्वे आणि विमानतळे चमकत आहेत, पण तुम्ही हे सांगितले नाही की देशाचे कर्ज २०० लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. यापैकी ४० टक्के रक्कम मूठभर लोकांच्या तिजोरीत गेली आहे.त्याचवेळी ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य देऊन गुलामगिरीची एक नवीन व्यवस्था निर्माण केली आहे.

अशा अनेक गोष्टी बोलता येतील.पण, तुमच्या दैदीप्यमान विकासासोबत देशाची निर्यात वाढत नाही तर आयात वाढत आहे, आणि रुपयाचे अवमूल्यन होत आहे. २०१३ मध्ये एका डॉलरची किंमत ६० रुपये होती आणि आज ती ९५ रुपये आहे. म्हणजेच 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' इंग्रजीमध्ये त्याला असे म्हणतात की,'किंग कॅन डू नो रॉंग' म्हणतात. माफ करा.

तुम्ही २०१३ च्या भाषणात एका गोष्टीचा उल्लेख केला होता. तुमच्या स्वप्नातील वस्त्रोद्योग धोरण. तुम्ही म्हणालात, 'कापूस उत्पादकाला कापूस विकण्यासाठी हेलपाटे मारावे लागू नयेत. माझ्याकडे ५-एफ फॉर्मुला आहे.'म्हणजेच शेती ते धागा, धाग्यापासून कापड,कापडापासून फॅशन, फॅशनपासून परदेश. यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढेल.गेल्या १२-१३ वर्षांपासून कापसाचे पीक घटत आहे मात्र कपडयांचे भाव कमी होत आहेत का?

तुमच्या राजवटीत यावर्षी देशात कापसाच्या ५० लाख गाठयांची आयात करण्यात आली हे सत्य नाकारता येईल का?

तुम्ही पाकिस्तानबद्दल बोलता, पण चीनबद्दल नाही. चीन आपला रेन्मिन्बी (चीनचा रुपया) कमकुवत करून निर्यात वाढवतो. आणि आपले सरकार आपले शेअर्स विकून त्याला मजबूत करत आयात वाढवत आहे. तुमचे म्हणणे बरोबर आहे,'ग्लास भरलेला आहे..अर्धा पाण्याने आणि बाकीचा हवेने.'पण अशा गोष्टीमुळे गरीबी कमी होणार नाही; त्यांचे वेतन वाढविणे गरजेचे आहे.या विषयावर आम्ही जून २००६ मध्ये डॉ. मनमोहन सिंगजींनाही हेच सांगितले होते.तुम्ही आमच्या मतांचा विचार कराल अशी आशा आहे.

**विजय जावंधिया, शेतकरी संघटना पाईक**
**मो.९४२१७२७९९८**

# नास्तिक कोण ?

**काल** कोणी तरी कोणाला तरी 'नास्तिक' म्हटले. ते साधे विशेषण नव्हते. नास्तिक असणे ही काहीतरी चुकीची, अभद्र व समाजास मुळीच मान्य नसणारी गोष्ट आहे, असा म्हणणाऱ्याचा रोख होता.

नास्तिक कोणास म्हणावे? आपल्या डोळ्यांना, कानांना, नाकाला अथवा त्वचेला जे जाणवत नाही ; आपल्या तर्कबुद्धीला ज्यावर संशय आहे, ज्यांच्या अस्तित्वाबाबत पुरावे उपलब्ध नाहीत, अश्या कोणत्याही तत्वावर, वस्तूवर, घटनेवर विश्वास न ठेवणे म्हणजे नास्तिक असणे होय. आपली न्यायसंस्था ही एकप्रकारे नास्तिकच आहे. कारण ठोस पुरावा असल्याशिवाय न्यायालय कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवत नाही. तसेच विज्ञान देखील नास्तिकच आहे. कोणतेही तथ्य विशिष्ट परिस्थितीत सर्व काळी व सर्व जागी आढळून येत नाही, तोपर्यंत विज्ञान त्या तथ्यावर विश्वास ठेवत नाही.

ईश्वराने मला तसा आदेश दिला म्हणून मी एखादी दुसऱ्याची जागा ताब्यात घेतली तर न्यायालय माझ्यावर विश्वास ठेवेल का? मला मालकी हक्काचे कागदपत्र मागण्यात येतील. ईश्वराने तसा काही लेखी आदेश दिला का, हे विचारण्यात येईल. आपण सगळेच प्रत्यक्ष व्यवहारात नास्तिकासारखेच वागत असतो. कारण खात्री झाल्याशिवाय आपण कोणत्याही व्यवहारात पुढे सरकत नसतो.

विज्ञानाने शोध लावलेल्या अनेक उपकरणांचा आपण दैनंदिन जीवनात सतत उपयोग करत राहतो. इलेक्ट्रॉन नावाचा अतिसूक्ष्म कण आपण कधीही पाहिला नसतो. तो अतिसूक्ष्म कण ज्या अणुमध्ये असतो तो अणुदेखील आपल्या डोळ्यांना दिसत नाही. परंतु इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर आपण करतो. खूप उत्सुकता असेल तर वैज्ञानिक आपल्याला त्यांच्या अतिसूक्ष्मदर्शक यंत्रातून अणु व इलेक्ट्रॉन चे दर्शनही घडवू शकतात. म्हणून आपण इलेक्ट्रॉन च्या अस्तित्वावर विश्वास ठेवतो.

ज्यांना ईश्वराच्या अस्तित्वाची काही अनुभूती झाली आहे, ते स्वतःला आस्तिक म्हणवू शकतात. परंतु पूर्वजांनी सांगितले म्हणून देवावर श्रद्धा ठेवणारे हे खऱ्या अर्थाने आस्तिकही नसतात आणि नास्तिकही नसतात. अश्या श्रद्धाळूंपेक्षा आधुनिक युगात नास्तिकांची जास्त आवश्यकता आहे. कधी काळी विज्ञानाने सृष्टीच्या मुळाशी ईश्वरी चैतन्य आहे, असा प्रयोगातून निष्कर्ष काढला तर आजचे नास्तिक ते मान्य करतीलच.

'दिमागी नक्षल' या शब्दांसारखाच 'नास्तिक' या शब्दाचाही एकप्रकारची शिवी म्हणून उपयोग होऊ नये.

**किशोर देशपांडे**

## दिमागी नक्षलवाद !

पंतप्रधानांनी ऐंशीव्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने लाल किल्ल्या वरून जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात 'दिमागी नक्षलवादाचा' उल्लेख केला.दिमागी नक्षलवाद हा 'शाल जोडीतला'शब्द आहे.याचा गर्भितार्थ कळण्यासाठी असणाऱ्या विवेक बुद्धीचाच अभाव आहे. कोणत्यातरी गोंडस नावाखाली देशभरात देशविघातक धोरणांना बळकटी देण्याचे काम हे दिमागी नक्षलवादी करत असतात. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी लोकजागृतीसाठी महाराष्ट्रात शिवजयंती आणि गणेशोत्सव हे उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करण्याची प्रथा सुरू केली. श्री गणेश हा बुद्धीदाता तसेच विघ्नहर्ता आहे. महाराष्ट्रात घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. कालौघात यामध्ये काही अपप्रवृत्तींनी शिरकाव केला आहे. कर्णकर्कश आवाजातील संगीत,मोठ्या आवाजातील डीजे किंवा रात्रीच्या वेळी देवासमोर बसून अयोग्य कृती करणे हे सर्व अयोग्य आहे याबद्दल दुमत असायचे कारण नाही.पण पुण्यातील विद्यानंद बापट यांनी पुण्यातील गणेशोत्सवाची तुलना आतंकवादी संघटना लष्करे ए तोयबा या संघटनेशी केली आहे.गणेशोत्सवाला लष्करे-ए-सण लष्करे-ए - उत्सव असे संतापजनक संबोधन वापरले आहे. एवढ्यावरच न थांबता त्यांनी पुण्यातील मानाच्या गणपतींना शहराबाहेर हलवा, कार्यकर्त्यांवर बल प्रयोग करा अशी धर्मद्रोही आणि समाजविघातक वक्तव्ये केली आहेत.या त्यांच्या वक्तव्याला पुरोगामी, माओवादी, साम्यवादी, संस्था,संघटना, वृत्तवाहिन्या पाठिंबा देतात यात काही आश्चर्य नाही. भारतीय उच्च नैतिक मूल्ये,सांस्कृतिक मूल्ये, हिंदु धर्म ,सभ्यता ,परंपरा उखडून टाकून समाज आणि पर्यायाने देश अस्थिर करणे हाच या दिमागी नक्षलवाद्यांचा एक कलमी कार्यक्रम आहे. हा त्यांचा कुटिल डाव उधळून लावण्यासाठी धर्माभिमानी होऊन संघटित होऊया.

**संध्या काटदरे**

**संवाद**

## डॉ. मनमोहन सिंग यांचे स्मारक दिशादर्शक

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग या थोर नेत्यांचे स्मृतीस्थळ अर्थात स्मारक राजघाटावर व्हावे म्हणून सेंट्रल पब्लिक वर्क डिपार्टमेंट यांनी दिल्ली अर्बन आर्टस् कमिशन यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्याला नुकतीच मंजूरी मिळाली आहे त्यामुळे स्मारक होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांनी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण राबवून भारताची अर्थव्यवस्था संकटातून बाहेर काढली. त्यांनी २२ मे २००४ ते २६ मे २०१४ या काळात सलग १० वर्षे भारताचे १४ वे पंतप्रधान म्हणून देश सांभाळला अखेर त्यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ रोजी झाले त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे यासाठी घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल.

**राजू जाधव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# कलगाव शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात वासरू ठार

## महिनाभरापासून बिबट्याची दहशत, वनविभागाच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ७ : तालुक्यातील कलगाव शिवारात गेल्या महिनाभरापासून बिबट्याचा वावर असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, ६ सप्टेंबर रोजी रात्री बिबट्याने हल्ला करून एका वासराला ठार केल्याची घटना घडली. कलगाव येथील शेतकरी बालाजी राऊत यांच्या गोठ्याबाहेर बांधून ठेवलेल्या गाईच्या वासरावर बिबट्याने हल्ला केला.**



या हल्ल्यात वासराचा मृत्यू झाला असून बिबट्याने त्याचा काही भाग फस्त केल्याचे दिसून आले. गेल्या महिनाभरापासून कलगाव शिवारात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. सोशल मीडियावरही बिबट्याच्या वावराचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाण्यास शेतकरी घाबरत आहेत. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे.

### जीवितहानी होण्यापूर्वी बिबट्याचा बंदोबस्त करा!

**कलगाव शिवारात बिबट्याचा वाढता वावर पाहता वनविभागाने केवळ पंचनामा करण्यापुरती कारवाई न करता तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. बिबट्याच्या दहशतीतून शेतकरी व ग्रामस्थांची सुटका करण्यासाठी पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी होत आहे.**

### वनविभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**गेल्या महिनाभरापासून कलगाव शिवारात बिबट्याचा वावर असल्याच्या सूचना सोशल मीडियावरून वारंवार दिल्या जात आहेत. बिबट्याचे व्हिडिओही व्हायरल झाले आहेत. मात्र, वनविभागाकडून अद्याप ठोस दखल किंवा प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. आता वासराचा बळी गेल्यानंतर तरी वनविभाग जागे होणार का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**

वनविभागाने वेळीच दखल घेतली नाही आणि भविष्यात एखादी जीवितहानी झाली तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# दोन धारदार तलवारी जप्त, युवक पोलिसांच्या ताब्यात

## गुन्ह्याच्या उद्देशाने शस्त्र बाळगल्याचा पोलिसांचा संशय.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. ७ :** राळेगाव शहरातील नवीन वस्ती परिसरात दोन धारदार लोखंडी तलवारी बाळगणाऱ्या २४ वर्षीय युवकास राळेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. निरज प्रकाश निखाडे (वय २४, रा. नवीन वस्ती, राळेगाव) असे ताब्यात घेतलेल्या युवकाचे नाव आहे.

त्याच्याकडून दोन लोखंडी तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निरज निखाडे याने आपल्या राहत्या घरी लोखंडी तलवार लपवून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलिस पथकाने तातडीने त्याच्या घरी झडती घेतली. यावेळी लोखंडी मूठ असलेल्या दोन धारदार तलवारी पोलिसांच्या हाती लागल्या. सदर शस्त्रे कोणत्यातरी दखलपात्र गुन्ह्याच्या उद्देशाने बाळगण्यात आली असावीत, असा पोलिसांचा संशय असून, या दिशेने तपास सुरू आहे. पोलिसांनी तलवारी जप्त करून युवकास ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंत्ता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली राळेगाव पोलिसांनी केली. पुढील तपास पोलीस नाईक सुरज शिकणे करीत आहेत.

## थोडक्यात



### पात्र शेतकऱ्यांना तातडीने नवीन पीक कर्ज द्या..!

**आमदार बाळासाहेब मांगुळकर यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**यवतमाळ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना अद्याप नवीन पीक कर्ज मिळाले नसल्याने प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे. पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. कर्जमुक्ती योजना जाहीर होऊन सुमारे दोन महिने उलटले असतानाही अनेक पात्र शेतकरी नवीन कर्जाच्या प्रतीक्षेत आहेत. खरीप हंगामातील शेतीची कामे अंतिम टप्प्यात असताना खते, बियाणे, कीटकनाशके व मशागतीसाठी शेतकऱ्यांना भांडवलाची गरज आहे. नैसर्गिक आपत्ती आणि अनियमित पावसामुळे आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्जासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. आधार प्रमाणीकरण व आवश्यक पडताळणी पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांची प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करून यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयीकृत बँकांना तातडीने निर्देश द्यावेत, अशी मागणी मांगुळकर यांनी केली. अनावश्यक तांत्रिक कारणांमुळे पात्र शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशीही भूमिका त्यांनी मांडली. यावेळी रमेश भिसनकार, बबलूभाऊ देशमुख, रविभाऊ ढोक यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### फ्रेंड्स गोविंदा पथकाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला..

**१ लाख ११ हजार १११ रुपये देऊन सन्मानित**

**यवतमाळ :** यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा अॅड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांच्या पुढाकारातून रविवारी (ता. ६) आयोजित करण्यात आलेल्या भव्य दहीहंडी उत्सवात धामणगाव रेल्वे येथील फ्रेंड्स गोविंदा पथकाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या पथकाला तब्बल १ लाख ११ हजार १११ रुपये रोख व करंडक देऊन सन्मानित करण्यात आले. उत्सवाचे उद्घाटन नगराध्यक्षा अॅड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांच्या हस्ते झाले. यावेळी आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ.अशोक उईके, लोकप्रिय गायिका वैशाली सामंत, अभिनेत्री नेहा पेंडसे, अॅड. प्रफुल्ल चव्हाण, प्रवीण देशमुख, वसंतराव घुईखेडकर यांच्यासह नगर परिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक व मान्यवर उपस्थित होते. सरस्वती गोविंदा पथक, नांदेड यांनी द्वितीय क्रमांक मिळवत ७१ हजार १११ रुपये व करंडक पटकावला. ओम साई गोविंदा पथक, पुसद यांना २१ हजार रुपयांचा प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला. मानवी मनोऱ्यांचा थरार, वैशाली सामंत यांचे गायन आणि नेहा पेंडसे यांच्या उपस्थितीने उत्सवाला रंगत आली. सहभागी सर्व गोविंदांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

# गणेशजी कचकलवार यांना २४/७ पोलीस संरक्षण देण्याची मागणी..!

## 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. ७ :** राज्यात निष्पक्षपणे पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांवर सातत्याने भ्याड हल्ले होत असून पत्रकारांची सुरक्षा धोक्यात आली आहे. पत्रकारांच्या हक्कासाठी व न्यायासाठी नेहमी धावून जाणारे 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे' राष्ट्रीय अध्यक्ष गणेशजी कचकलवार यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून, त्यांना तात्काळ २४/७ पोलीस संरक्षण पुरवण्यात यावे, अशी जोरदार मागणी 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, तालुका घाटंजी' व वरिष्ठ पत्रकार बांधवांच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार घाटंजी आणि पोलीस निरीक्षक घाटंजी यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना निवेदन सादर केले.२७ ऑगस्ट २०२६ रोजी शेकापूर (माहूरगड) येथे पत्रकार समाधान कांबळे यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला अत्यंत निंदनीय आहे. असामाजिक तत्त्वांवर वेळेत कडक कारवाई न झाल्यास अशा गुंड प्रवृत्तींचे धाडस अधिक वाढेल. महाराष्ट्रात कुठेही पत्रकारावर अन्याय झाल्यास राष्ट्रीय अध्यक्ष गणेशजी कचकलवार हे स्वतः समोर येऊन न्यायासाठी आवाज उठवतात. यामुळे राजकीय व सामाजिक गुंड प्रवृत्तीचे पितळ उघडे पडत असून, याच सूडबुद्धीने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यासाठी कोणतीही अप्रिय वा दुर्दैवी घटना घडण्यापूर्वीच शासनाने व प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखावे आणि गणेशजी कचकलवार यांना तात्काळ २४/७ पोलीस संरक्षण द्यावे.लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाच्या रक्षणासाठी प्रशासनाने तातडीने योग्य पावले उचलावीत, अशी ठाम मागणी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघांचे घाटंजी तालुका अध्यक्ष महेश पेंदोर, तालुका उपाध्यक्ष निरज मन्ने, तसेच ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब ठाकरे, कैलास कोरवते, बंडू तोडसाम, सचिन कर्णेवार, अरविंद जाधव, सागर सम्मनवार, दिनेश गाउत्रे, कंजूम कुरेशी, अमोल कावळे, अरविंद चौधरी व समस्त पत्रकारांनी केली आहे.

# पोलिसांची अवैध वाळू वाहतूक ट्रकवर कारवाई

## चालक व मालकासह तीन व्यक्तीवर गुन्हे दाखल, ५ लाख १६ हजारचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ७ :** महागांव तालुक्यात अवैध रेती तस्करीचा धंदा जोमात सुरू असतानाच महागाव पोलिसांनी रविवारी पहाटे थरारक कारवाई करत रेतीची वाहतूक करणारा ट्रक पकडला. या कारवाईत ५ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने रेती माफियांच्या रॅकेटमध्ये खळबळ उडाली आहे.

रविवार (दि. ६ सप्टेंबर) रोजी रात्री १.१५ वाजता उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाकडून अवैध रेती वाहतुकीची गोपनीय माहिती मिळताच उपनिरीक्षक किशोर मुरकुटे यांनी पथकासह सापळा रचला. महागाव शहराच्या हद्दीत एम एच ३१ सी बी ४८०८ क्रमांकाचा ट्रक अडवून तपासणी केली असता त्यामध्ये दोन ब्रास रेती भरलेली आढळली. चौकशीत चालक वामन होरिराम चव्हाण (रा. कृष्णानगर शेलू, ता. पुसद) याच्याकडे कोणतेही वैध रॉयल्टी पास किंवा वाहतूक परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. पुढील तपासात महागाव येथील फिरोज पठाण व अमोल राजवाडे यांच्या सांगण्यावरून नदीपात्रातून रेती भरून विक्रीसाठी आणली जात असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी ५ लाखांचा ट्रक व १६ हजार रुपयांची दोन ब्रास रेती असा एकूण ५.१६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७) व ४८(८) अंतर्गत महागाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत उपनिरीक्षक किशोर मुरकुटे यांच्यासह चालक राजू तिजारे, पोलीस अंमलदार सुरेश महल्ले व मनोज रायवाडे यांनी सहभाग घेतला. पोलिस आता या प्रकरणातील आर्थिक साखळी, रेतीचा मूळ उत्खनन बिंदू आणि या मागील सूत्रधारांचा शोध घेत आहेत. अलीकडे महसूल विभागानंतर आता पोलिसांनीही रेती माफियांवर थेट कारवाईचा बडगा उगारल्याने महागाव तालुक्यातील अवैध रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# धनगर ST आरक्षणावर सरकारने भूमिका स्पष्ट करावी!

## ८ सप्टेंबर पूर्वी सर्वोच्च न्यायालयात ठाम बाजू मांडण्याची मागणी.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ७ :** धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या (ST) आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात ठाम आणि स्पष्ट भूमिका मांडावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा समस्त धनगर समाज, यवतमाळच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तसेच आमदार बाळासाहेब मांगुळकर यांना निवेदन देण्यात आले.

८ सप्टेंबरपूर्वी सरकारने सर्वोच्च न्यायालयासमोर पूर्ण कायदेशीर ताकदीने समाजाची बाजू मांडावी, अशी मागणी करण्यात आली. निकाल प्रतिकूल ठरल्यास आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी पर्यायी 'प्लॅन-बी' तयार ठेवावा, अशीही भूमिका समाजाने मांडली. यासोबतच हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांच्या नावाने मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील संबंधित कनेक्टिंग लिंकचे नामकरण, चर्चगेट रेल्वे स्थानकाला राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देणे आणि आदमापूर येथील श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी करण्यात आली. देवस्थानातील कथित गैरव्यवहाराची चौकशी तातडीने पूर्ण करावी, तसेच मेंढपाळांच्या मेंढी चराईचा प्रलंबित शासन निर्णय तत्काळ जारी करावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. धनगर समाजाच्या अस्मिता, श्रद्धा व घटनात्मक हक्कांशी संबंधित या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा इशारा देण्यात आला.

# १५ सप्टेंबरपर्यंत मागण्या मान्य करण्याची आदिवासी मंत्र्यांची ग्वाही..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## १९ दिवसांचे उपोषण तूर्तास स्थगित



**यवतमाळ, दि. ७ :** आदिवासी विद्यार्थी व बेरोजगार युवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गेल्या १८ दिवसांपासून सुरू असलेले उपोषण अखेर तूर्तास स्थगित करण्यात आले. राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके आणि आमदार राजू तोडसाम यांनी सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) उपोषणस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

उर्वरित मागण्या १५ सप्टेंबरपर्यंत मान्य करून त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही दिल्यानंतर विद्यार्थी संघटनेने आंदोलन मागे घेतले. मुंबई येथे मुख्यमंत्री आणि आदिवासी मंत्र्यांसोबत उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांची बैठक झाली होती. त्यावेळी काही मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आला. मात्र काही महत्त्वाच्या मागण्या अद्याप प्रलंबित असल्याने यवतमाळातील विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरूच ठेवले होते. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, रोजगार, वसतिगृह आणि सामाजिक प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. यामध्ये १२,५०० पेक्षा अधिक विशेष पदांची आदिवासी पदभरती तातडीने घेणे, पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील १७ संवर्गांची पदभरती सुरू करणे, एमपीएससी गट-कमधील तलाठी पदांच्या पेसा व नॉन-पेसा जिल्हानिहाय जागा जाहीर करून जाहिरात प्रसिद्ध करणे तसेच पवित्र प्रणालीतील शिक्षक भरतीत आदिवासींसाठीच्या पेसा व नॉन-पेसा जागा उपलब्ध करून देणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. दरम्यान, १५ सप्टेंबरपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विद्यार्थ्यांनी शासनाला दिला आहे. त्यामुळे आता शासनाच्या आश्वासनाची अंमलबजावणी कधी होते, याकडे विद्यार्थी व बेरोजगार युवकांचे लक्ष लागले आहे.

# बंजारा संस्कृतीचा तिज महोत्सव उत्सवात..!

## संवर्धनाचा यवतमाळात आझाद मैदानावर सामूहिक तिज व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ७ :** गोर बंजारा उत्सव समितीच्या वतीने रविवारी (६ सप्टेंबर) आझाद मैदानावर सामूहिक तीज महोत्सव उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात पार पडला. पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या बंजारा महिला व युवतींनी तीज महोत्सवाला पारंपरिक रंगत आणली. संत सेवालाल महाराज आणि हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

विधिवत पूजा, अरदास व 'जल भोग' अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. महेश चव्हाण व डॉ. निकिता महेश चव्हाण होते. स्वागताध्यक्ष डॉ. सुभाष राठोड व विद्याताई राठोड, तसेच तांड्याचे नायक बाबाराव राठोड व बाबुलाल चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. महेश चव्हाण यांनी आरोग्य, शिक्षण आणि समाजाच्या विकासासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. डॉ. निकिता चव्हाण यांनी महिलांचे पारंपरिक नृत्य, बंजारा संस्कृतीचे महत्त्व आणि सामाजिक एकतेवर भर दिला. डॉ. सुभाष राठोड यांनी युवा पिढीने आधुनिक शिक्षणासोबत संस्कृती व परंपरांचे जतन करण्याचे आवाहन केले. यावेळी कु. नेहा प्रेम पवार हिची एमबीबीएस वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याबद्दल, तसेच कोमल चव्हाण यांनी 'वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक' पदासाठी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहित वामनराव राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. भारत जाधव, तर आभार बाळकृष्ण वसंतराव आडे यांनी मानले. समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# २० पैकी १३ सोसायटी प्रतिनिधींचा येल्टीवार यांना जाहीर पाठिंबा

## आमदार संजय देरकर, माजी आमदार वामनराव कासावारांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. ७ :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून, झरी तालुक्यात सहकाराच्या राजकारणाला चांगलीच रंगत आली आहे. तालुक्यातील आदिवासी व ग्रामीण विकास कार्यकारी सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची नुकतीच बैठक पार पडली.

या बैठकीत संचालकपदाचे इच्छुक राजू येल्टीवार यांच्या उमेदवारीला २० पैकी तब्बल १३ सोसायटी प्रतिनिधींनी जाहीर पाठिंबा देत निवडणुकीच्या रणधुमाळीचे संकेत दिले. आमदार संजयजी देरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला माजी आमदार वामनरावजी कासावार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विवेक मांडवकर, प्रशांत गोहोकार, सुनील कातकडे, राजीव कासावार, शंकर लाकडे यांच्यासह विविध सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान विविध संस्थांच्या प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत झरी तालुक्यातून संचालकपदासाठी राजू येल्टीवार यांच्या उमेदवारीवर चर्चा झाली. यावेळी उपस्थित २० प्रतिनिधींपैकी १३ जणांनी येल्टीवार यांच्या बाजूने आपली भूमिका स्पष्ट केली. आमदार देरकर आणि माजी आमदार कासावार यांच्या उपस्थितीत मिळालेला हा पाठिंबा येल्टीवारांच्या उमेदवारीला राजकीय व सहकारी क्षेत्रातील बळ देणारा ठरत आहे. त्यामुळे झरी तालुक्यातील जिल्हा बँक निवडणुकीत येल्टीवारांच्या उमेदवारीची चर्चा आता केंद्रस्थानी आली असून, आगामी काळात या समीकरणाचा याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# पांढरकवड्यात २६-२७ डिसेंबरला 'केशर साहित्य संमेलन'

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. ७ :** केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठानद्वारा संचालित श्री शारदा ज्ञानपीठ व मीना चाहल कॉन्व्हेन्टच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त 'केशर साहित्य संमेलनाचे' आयोजन २६ व २७ डिसेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. या दोन दिवसीय संमेलनात विदर्भासह महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक सहभागी होणार आहेत.

शनिवार, २६ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल. दुपारी 'मराठी साहित्यातील स्त्री चित्रण सक्षम नाही' या विषयावर परिसंवाद, त्यानंतर निवडक कवी-कवयित्रींचे काव्यसंमेलन तसेच रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. रविवार, २७ डिसेंबर रोजी 'मराठी लेखिकांचे साहित्य : चिंता आणि चिंतन' या विषयावर दुसरा परिसंवाद होईल. त्यानंतर कथाकथन, संमेलनाध्यक्षांची मुलाखत आणि सायंकाळी ५.३० वाजता संमेलनाचा समारोप होणार आहे. या साहित्य संमेलनामुळे पांढरकवडा शहरातील साहित्य रसिकांना दर्जेदार साहित्यिक कार्यक्रमांची पर्वणी मिळणार असून, रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने हा उपक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे. अशी माहिती संमेलनाचे आयोजक तनवीर शेख व राहुल देवतळे यांनी दिली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती

## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे जिल्हाधिका - यांमार्फत जनप्रतिनिधींना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

अत्यंत अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे सध्यस्थितीत सोयाबीन, तूर, कपाशी ही पिके माना टाकू लागली आहे. सोयाबीन तर पूर्णतः हातचे गेले आहे. आता अधिकचा विलंब न करता पीक नुकसानीचे पंचनामे तात्काळ सुरू करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी या मागणीसह इतर मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस हरिभाऊ मोहोड यांनी जिल्हाधिका-यांमार्फत जनप्रतिनिधींना दिले आहे.



दुष्काळाच्या उंबरठ्यावर विना विलंब शासकीय यंत्रणा कामी लावून शेतकऱ्यांना आधार न दिल्यास विदारक चित्र निर्माण होवून शेतकरी आत्महत्येचा उद्रेक होऊ शकतो. मागील वर्षी पासून पिक विमा योजना कूचकामी ठरली असून तात्काळ ट्रिगर पद्धती बंद करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई सुरू करणे आवश्यक आहे. कृषी फीडरवरील अघोषित भारनियम तात्काळ थांबवून, २४ तास कृषी पंपांना विद्युत पुरवठा उपलब्ध करून दिल्यास, काही प्रमाणात तरी शेतकरी लाभ घेऊ शकतील. याचबरोबर जिल्ह्यातील जवळजवळ सर्व भागात खरीप हंगाम धोक्यात आल्यामुळे विनाविलंब पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करणे व तात्काळ प्रभावित शेतकऱ्यांना मदतीसाठी जिल्हा प्रशासनाने आजच कामी लागणे आवश्यक आहे.

खरीप हंगामामध्ये, उणे ६०३ किंवा त्यापेक्षा कमी पावसामुळे, अत्यंत गंभीर पीक परिस्थिती निर्माण झालेली असून तात्काळ पीक नुकसानीचे पंचनामे सुरू करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, पीक विमा योजनेअंतर्गत ट्रिगर पद्धती बंद करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यात यावी, भातकुली व अमरावती तालुक्यात अघोषित कृषी फिडर वरील भारनियमनामुळे हतबल झालेल्या शेतक-यांना दिलासा द्यावा आदी मागण्या करण्यात आल्या.

सदर निवेदन जिल्हाधिका-यांमार्फत पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, का. बळवंत वानखडे यांना सादर केले आहे.

# धारणी-चिखलदऱ्यात ४२ वर्षांत जवळपास १०० जणांचे निलंबन

**मेळघाट/वार्ताहर**

धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांमध्ये मागील सुमारे ४२ वर्षांच्या कालावधीत विविध शासकीय विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई झाल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. स्थानिक पातळीवर अशा प्रकरणांची संख्या जवळपास १००च्या आसपास असल्याचे सांगितले जाते. महसूल विभागातील कर्मचारी, पंचायत समितीतील कनिष्ठ अभियंता, बीएनसी विभागातील अधिकारी तसेच इतर शासकीय विभागांतील अधिकारी-कर्मचारी यांच्यावर अशा कारवाया झाल्या आहेत. पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवरही लाचखोरीच्या कारवाया झाल्याचे प्रकरणे समोर आली आहेत.

निलंबन ही कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रिया असली तरी केवळ निलंबनावर कारवाई थांबता कामा नये. संबंधित प्रकरणाची चौकशी वेळेत पूर्ण होऊन दोष सिद्ध झाल्यास

### पुढील कारवाईचे काय?

नियमानुसार कठोर विभागीय कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा एसीबीची कारवाई केवळ काही दिवसांच्या चर्चेपुरती मर्यादित राहण्याची शक्यता आहे. गेल्या तीन महिन्यांत धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांत लाचखोरीशी संबंधित जवळपास पाच-सहा कारवाया झाल्याची चर्चा आहे. काही प्रकरणांत संबंधित कर्मचारी निलंबित झाले असतील, काही प्रकरणे चौकशीत असतील, तर काहींवर पुढील प्रक्रिया सुरू असेल. मात्र या सर्व प्रकरणांचा अंतिम निकाल काय लागला, हे नागरिकांना कळणे आवश्यक आहे.

मागील ४२ वर्षांत झालेल्या अशा सर्व प्रकरणांचा प्रशासनाने आढावा घ्यावा. किती प्रकरणांत दोष सिद्ध झाले, किती कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झाली आणि किती प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत, याचा अहवाल जनतेसमोर यावा. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये खरोखरच कारवाई चा धाक निर्माण करायचा असेल, तर एसीबीच्या कारवाई नंतरची विभागीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करून तिचा अंतिम निकालही स्पष्टपणे समोर आणणे गरजेचे आहे.

### श्री दामोदर महाराज महाविद्यालयात शिक्षकांचा सन्मान

**नेरपिंगळाई** - श्री दामोदर महाराज महाविद्यालय, नेरपिंगळाई येथे शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य सुनिता दे. उमप, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. देविदास उमप होते. शिक्षक दिनाबद्दल प्रा. हर्षा चतुर्भुज यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल प्रतिक्षा बरडे यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. रेणुका वानखडे, प्रा. ओमप्रकाश उमप उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शुशांत मडगे यांनी केले.

# सा.बां.विभागाचे नियोजन चुकले

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

पुष्करणा नगर येथील धामणगाव-अंजनसिंगी तिवसा राज्यमार्गावर आदर्श कॉलेजच्या समोर रस्ता तयार केला. मात्र मधोमध झाड तसेच ठेवले आहे. रस्त्याचे काँक्रीटीकरण करताना रस्त्याच्या मध्यभागी असलेले मोठे झाड न हटवता त्याभोवतीच काँक्रीटचा रस्ता तयार करण्यात आला आहे. झाडे वाचविणे ही निश्चितच चांगली बाब आहे. मात्र रस्त्याचे नियोजन, वाहनांची सुरक्षितता, पादचाऱ्यांची ये-जा आणि भविष्यातील वाहतूक व्यवस्था यांचा विचार करूनच अशा पद्धतीने काम होणे अपेक्षित आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रमुख जबाबदारी रस्ते, पूल व त्यांच्या देखभालीशी संबंधित आहे. छायाचित्रात रस्त्याच्या अगदी कडेला आणि वाहतुकीच्या मार्गात झाडाचा बुंधा येत असल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होऊ शकतो. विशेषतः दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक तसेच आपत्कालीन वाहनांना यामुळे अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

### झाड वाचविणे योग्य, पण रस्त्याचे नियोजन असे का?

काम सुरू करण्यापूर्वी रस्त्याचा आराखडा तयार करताना झाडाभोवती सुरक्षित जागा ठेवणे किंवा शक्य असल्यास रस्त्याची दिशा बदलणे, असा पर्याय तपासला गेला का? कामाची गुणवत्ता, मोजमाप आणि मंजूर आराखड्यानुसार प्रत्यक्ष काम झाले आहे का, याचीही तपासणी होणे गरजेचे आहे. काँक्रीटचे रस्ते टिकाऊ असले तरी त्यासाठी योग्य पायाभूत तयारी, रचना आणि बांधकाम पद्धती महत्त्वाची असते

.झाड वाचविण्याचे कौतुक करायचे की रस्त्याच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे?' हा प्रश्न आता नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. संबंधित विभागाने या कामाची पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि भविष्यात नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सोयाबीनवर एलो-मोझॅकचा प्रादुर्भाव; शेतकरी चिंतेत

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरातील मांजरी म्हसला येथे सोयाबीन पिकावर एलो-मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसातील खंड तसेच हवामानातील सततच्या बदलामुळे सोयाबीन पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतकरी विलास खाकरे व दिनेश ठाकरे यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची कृषी सहाय्यक अलका दाभाडे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी पिकाची पाहणी करून रोगाचा प्रादुर्भाव, पिकाची सद्यस्थिती तसेच आवश्यक उपाय योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्ग दर्शन केले. दरम्यान, रोगाच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीनच्या उत्पादनावर परिणाम होण्याची



### पावसातील खंड व हवामानातील बदलाचा पिकाला फटक

### कृषी विभागाकडून पाहणी व मार्गदर्शन

शक्यता असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची भीती व्यक्त करीत आहेत. कृषी विभागाने बाधित क्षेत्राची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत

# विलायतपूरा येथे मानाची कावड यात्रा उत्साहात

**अचलपूर/वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही, श्रवण महिन्याच्या शेवटच्या सोमवारचे औचित्य साधून सोमवार ७ सप्टेंबर रोजी ही मानाची कावड यात्रा उत्साहात संपन्न झाली.

यावेळी अमरावती जिल्ह्याचे माजी खासदार नवनीत राणा ,अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे ,अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने, भाजपा पक्षाचे सुधीर रसे, अभय माथने, तुषार खेरडे, मनीष खंडेलवाल, युवा स्वाभिमान पक्षाचे उपेन बछले, प्रफुल बर्वे, महेश देशमुख, तमिज शहा, रवींद्र गवई, रामभरोसे गौर, राजेश खोलापुरे, शंकर मालखेडे, सतीश शर्मा, नंदू राऊत, मनोज भुजाडे, अनिकेत मिश्रा, अक्षय पखाले, नंदू भुसकडे, छोटू लाडोळे आदी



भाविक-भक्त उपस्थित होते. वाघोली ग्राम येथील पवित्र पूर्णा नदीचे जल कावडीद्वारे आणण्यात आले. त्याचा जलाभिषेक विलायतपूरा येथील विठ्ठल मंदिरातील महादेवाच्या शिवपिंडीवर करण्यात आला. कावड यात्रा जिल्हा परिषद शाळा वाघोली येथून सुरू होऊन चावलमंडी मार्गे टक्कर चौक, जुना सराफा, देवळी मार्गान विलायतपूरा येथे पोहचली. या वर्षीच्या कावड यात्रेत सहभागी झालेले काही मानाचे कावड ग्रुपमध्ये अचलेश्वर शिव कावड, विलायतपूरा १०१ भरण्याची कावड, गांधी पूल शीतला माता ग्रुप, बुंदेलपूरा कालंका माता ग्रुपसुदर्शन कावड ग्रुपही यात्रा भक्ती, सेवा आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरली. हजारो भाविक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. यावेळी अनेक ठिकाणी भक्तांना चहा, नाश्त्याचे वाटप करण्यात आले. यावेळी अचलपूर पोलिसांचा तगडा बंदोबस्त बंदोबस्त होता

तालुक्यातील विलायतपूरा (दानाखोरी) येथील नागरिक गेली २५ वर्षांपासून एक अनोखी धार्मिक परंपरा जपत आहेत. या परंपरेचा मुख्य घटक म्हणजे विठ्ठल मंदिरातील शिवपिंडीवर गांधीग्राम येथून आणलेल्या पवित्र पूर्णा नदीच्या जलाने अभिषेक करण्याची मानाची कावड यात्रा जी संपूर्ण जिल्ह्यातील सर्वात पहिली आणि सर्वाधिक प्रतिष्ठित कावड यात्रा मानली जाते. या परंपरेची पायाभरणी विलायतपूरा येथील भाविकांनी केली असून, याच धार्मिक परंपरेच्या प्रेरणेतून ५०० वर्षांहून अधिक जुने अचलेश्वर शिवमंदिर जीर्णोद्धाराच्या दिशेने पुनर्जीवित झाले. विशेष म्हणजे हे मंदिर लोकवर्गणीद्वारे बांधले गेलेले अचलपूरमधील पहिले मंदिर ठरल आहे.

# एसटी महामंडळाचा भोंगळ कारभार!

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी) भोंगळ आणि बेजबाबदार कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. अमरावती ते पुणे या तब्बल ६०० किलोमीटरच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी महामंडळाकडून प्रवाशांच्या जिवाशी खेळ सुरू असून, चक्क भंगार गाड्या रस्त्यावर उतरवल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पैसे स्लीपर कोचचे घेऊन प्रवाशांना मात्र रात्रभर सिटिंग (बैठक) गाडीने प्रवास करण्याची सक्ती केल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



### रिझर्वेशन स्लीपरचे, गाडी मात्र सिटिंग!!

### अमरावती - पुणे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती येथून पुण्याकडे सायंकाळी ०६:४५ वाजता सुटणाऱ्या स्लीपर गाडीचे अनेक प्रवाशांनी नियमानुसार आगाऊ आरक्षण केले होते. रात्रभराचा ६०० किमीचा प्रवास सुखाचा व्हावा, यासाठी प्रवाशांनी जास्तीचे पैसे मोजून स्लीपरचे तिकीट काढले होते. मात्र, प्रवाशांनी जेव्हा प्रत्यक्ष बस स्थानक गाठले, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला. स्थानकातून ती नियोजित स्लीपर गाडी चक्क बेपत्ता होती. स्लीपर गाडीऐवजी बस स्थानकावर साधी सिटिंग (बैठक व्यवस्था असलेली) गाडी उभी करण्यात आली होती. महामंडळाच्या या मनमानी कारभारामुळे महिला, वृद्ध आणि लहान मुलांसह सर्वच प्रवाशांना प्रचंड मानसिक आणि शारीरिक मनस्ताप सहन करावा लागला.

रात्रीच्या वेळी झोपून प्रवास करायचा सोडून, प्रवाशांना रात्रभर जागून आणि त्रास सहन करत प्रवास करावा लागला.

### भंगार गाड्यांच्या भरवशावर ६०० किमीचा प्रवास

हा प्रकार म्हणजे प्रवाशांची उघडउघड आर्थिक आणि मानसिक फसवणूक आहे. एकीकडे खाजगी ट्रॅव्हल्सच्या स्पर्धेत टिकण्यासाठी एसटी महामंडळ 'प्रवाशांच्या सेवेसाठी' म्हणत नव्या गाड्यांचे दावे करते, तर दुसरीकडे ६०० किलोमीटर सारख्या मोठ्या अंतरासाठी प्रवाशांच्या पदरी भंगार गाड्या दिल्या जातात.

# वीज चोरी रोखण्यासाठी महावितरणचा पुढाकार

## अमरावती परिमंडळात पाच महिन्यात २ हजार ३५० वीजचोरी प्रकरणे उघड

**अमरावती/का.प्र.**

वीज चोरीला आळा घालण्यासाठी महावितरणने आता अत्यंत आक्रमक आणि कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे वीज चोरी करत असाल तर सावधान! कारण यापुढे वीज चोरी करताना आढळल्यास गुन्हा दाखल करण्यासोबत वीज चोरांचे नाव आणि पत्ता थेट सार्वजनिक केला जाणार आहे.

वीज चोरीला आळा घालण्यासाठी महावितरणच्या विविध प्रयत्नांनंतरही वीज चोरीवर पूर्णपणे अंकुश बसलेला नाही. नुकताच महावितरण अमरावती परिमंडळात मागील पाच महिन्यात ४ कोटी ५१ रूपयाच्या २ हजार ३५० वीज प्रकरणे उघड केल्याचे जाहिर केले आहे. त्यामुळे महावितरणने आगामी काळात कठोर भूमिका घेत वीज चोरी विरूध्द मोहिम तीव्र केली असून यात स्थानिक उपविभाग, विभाग आणि भरारी पथकांचे स्वतंत्र पथके तयार करून त्यांना वीज चोरी पकडण्याचे उद्धीष्ठ देण्यात आले आहे.

वीज चोरी तसेच अनाधिकृत वीज जोडण्यांमुळे शॉर्टसर्किट, ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड किंवा आगीसारख्या जीवघेण्या दुर्घटना घडण्याची शक्यता असते. अशा अपघातांमुळे महावितरणचे आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय नागरिकांच्या जिवालाही धोका निर्माण होतो. त

यामुळे संपूर्ण वीज वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी महावितरणने आता हे अत्यंत कडक धोरण अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे.

वीज चोरी गंभीर गुन्हा असून कायद्यात तीन वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या जोडण्यांची विशेष तपासणी सुरू असून, थकबाकीदारांनी इतर ठिकाणाहून अनधिकृतपणे वीज वापरल्याचे आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जात आहे.

महावितरणचे प्रत्येक वीज जोडणीवर लक्ष असून, वीज ग्राहकांनी केवळ अधिकृत वीज वापरण्याचे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

# संक्षिप्त

## श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात

**अमरावती** - शक्ती स्वरूपा महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला महिला व मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जन्माष्टमीच्या निमित्ताने महिला व मुलींसाठी नृत्य तसेच सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी महिलांनी व मुलींनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक वेशभूषा परिधान करून स्पर्धेत सहभाग घेतला. नृत्य सादरीकरणासाठी निवडण्यात आलेली गाणीही अध्यात्मिक आणि भारतीय संस्कृतीचे जतन करणारी होती. कार्यक्रमाला महापौर तेजवानी यांची प्रमुख उपस्थिती होती. नगरसेवक मिलिंद बांबल यांच्याकडून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तर जयश्री कुबडे यांच्याकडून रोख पारितोषिक देण्यात आले. यावेळी नगरसेविका स्वाती कुलकर्णी, माजी नगरसेविका संगीता भुरंगे, भारता गुहे, राष्ट्रवादीच्या संगीता ठाकरे, अंगण एक्झिबिशनच्या संचालिका निकिता उमक, वैशाली घोम, वनिता चौके, प्रीती दुबे, अनिता खडतकर, मनीषा कोकणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणारे नानक रामजी नेभनानी, लायन्स क्लब, सुरेंद्र बुरंगे, चाकोते फोटो स्टुडिओ आणि कोठारी ज्वेलर्स यांचे संस्थेतर्फे विशेष आभार मानण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक आदित्य निकम व कुंजल यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. संचालन लीना गायनर यांनी केले. महिला व मुलींमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि पारंपरिक मूल्यांची जपणूक व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



## कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये जन्माष्टमी

**अमरावती** - स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी डॉ. ज्योती खडसे, मुख्याध्यापिका साधना चंदेल, शाळेचे पर्यवेक्षक जुमडे प्रामुख्याने उपस्थित होते. चिमुकल्या राधा कृष्णाच्या वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांसह मान्यवरांचे ढोल ताळाच्या गजरात आगमन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते भाऊसाहेबांच्या प्रतिमेचे व बाळकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. इयत्ता नर्सरी ते दुसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी कृष्ण व राधा यांची वेशभूषा साकारून परिसर भक्तीमय होऊन गेला. इयत्ता ७ वी, ८वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्यातून रासलीलेचे सादरीकरण करून रासलीनेचा अनुभव घेतला. मानवी थरांचे पिरॅमिड बनवून हंडी फोडण्याची स्पर्धा घेऊन दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी यांनी आपल्या भाषणातून भगवद्गीतेतील चौथ्या अध्यायाचे स्पष्टीकरण देऊन गीतेतील विचार व कर्माचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रम यशस्वीरित्या शिक्षिका शरयू कपले, ज्योती चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.




## श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत रमणासह चंदनउटी उत्सव

**चांदूर रेल्वे** - तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अमावस्येनिमित्त रमणा सह चंदनउटी उत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्र मासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी संस्थानच्या अन्नदान समितीच्या नियंत्रणाखाली महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे. श्रावण मास मांडीचा वाढवा रविवार १३ सप्टेंबर सकाळी ९ वाजता मुख्य मंदिरात महाराजांच्या अरजानी करून मुख्य मंदिरातून रमणासह लहान मंदिरातील ढाल व मांड वाढवा होणार आहे. दुपारी १२ वाजता सर्व गावकरी मंडळी आणि भाविक भक्तांकरीता भव्य महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी संस्थानच्या अन्नदान समितीच्या वतीने दररोज दुपारी १२ ते १.३० आणि रात्री ८ ते ९.३० या वेळेत प्रसाद (भोजन) वितरण करण्यात येत आहे. या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांना सर्व भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## संगणक शास्त्र विभागात अभ्यास मंडळाची स्थापना

**चांदुर रेल्वे** - राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथील संगणक शास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी 'सर व्ही. राजारमण कॉम्प्युटर सायन्स सोसायटी' चा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्वडनेरकर सर लाभले होते, तर प्रमुख अतिथी म्हणून समन्वयक प्रा. वाणी यांची विशेष उपस्थिती होती. कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या प्रा. सरोसरे यांनी प्रास्ताविक मांडताना अभ्यास मंडळ स्थापनेमागील मुख्य हेतू स्पष्ट केला. विद्यार्थ्यांमध्ये संगणक शास्त्र विषयाची आवड निर्माण करणे, तांत्रिक ज्ञानासोबतच व्यावहारिक कौशल्यांचा विकास करणे, तसेच विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व तंत्रज्ञानविषयक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या मंडळाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर प्रा. भाग्यश्री जी. बेलसरे यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी निवडण्यात आलेली नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये अध्यक्षपदी कात्यायनी कलावटे, उपाध्यक्षपदी साक्षी डांगे, सचिवपदी गायत्री डहाके, खजिनदारपदी क्रिश अलोने, तर सदस्य म्हणून आरती समोसे, खुशी घुरडे, पूर्वा कर्मोरे व अयान पठाण यांची निवड करण्यात आली. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांचा पुष्पगुच्छ व छोटी भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. संचालन श्रुती वडस्कर आभार खुशी घुरडे हिने मानले.



# जीडीपी ७.८ टक्के विरुद्ध २.६ टक्के


देश म्हणजे के एक महाकाय कॉर्पोरेट, देशाची जीडीपी म्हणजे काय कंपनीची विक्री आणि पंतप्रधान म्हणजे काय त्या कंपनीचे सीइओ? असे नसते ना!

जीडीपी वाढली की नाही हे 'कसे' मोजायचे (तांत्रिक विषय) आणि मुळात जीडीपी 'कशासाठी' वाढवायची ( राजकीय विषय) हे दोन भिन्न प्रश्न आहेत.

पहिल्या प्रश्नाच्या मागे भरकटत जाऊ नका, आपली त्यात expertise नाही. पण दुसरा प्रश्न सतत लावून धरा, कारण तो आपल्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. पंतप्रधानांपासून सर्व सरकारी प्रवक्ते म्हणाले देशाची जीडीपी ७.८ टक्क्यांनी वाढली तर बिलकुल इंप्रेस न होता, जेन झी प्रमाणे, डोळ्यात डोळे घालून उलटा प्रश्न विचारा बर मग ? आमच्या राहणीमान सुधारण्याचा आणि जीडीपी वाढण्याचा अर्थाअर्थी संबंध विस्कटून सांगा जरा.

देशात मागच्या आठवड्यात या वित्तवर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी नक्की किती टक्क्यांनी वाढली यावर बरेच रणकंदन झाले.जीडीपी कशी मोजायची? अनौपचारिक क्षेत्राच्या जीडीपी बद्दल, ज्याची आकडेवारी सहज उपलब्ध नसते, कोणती गृहीतकृत्य धरायची? आधीच्या तिमाहीतील, वर्षातील आधी जाहीर झालेली जीडीपीच्या आकडेवारी मध्ये सुधारणा करायची झाली तर काय मेथोडोलोजी वापरायची? इतर विकसित अणि विकसनशील देशांत या संदर्भात काय करतात? या साऱ्या तांत्रिक बाबी आहेत. त्या बाबींवर त्या क्षेत्रातील तज्ञ मंडळी चर्चा करत आहेत. त्यांना करू द्याव्यात. आपण समजून घ्याव्यात.

पण या वादात न्यूट्रल मात्र राहू नये. सरकारवर टीका करणाऱ्या अर्थतज्ञ, संख्याशास्त्रज्ञ यांची समजा सरकार मुस्कटदाबी करत असेल तर नक्कीच त्यांच्या अधिकाराच्या बाजूने उभे राहावे. कारण सर्व बाजू पुढे येण्यात आपले हित आहे म्हणून. लोकशाही बळकट होणार असते म्हणून. लोकशाही बळकट होण्याचा संबंध आपल्या राहणीमानाशी आहे म्हणून. नाहीतर राजा जसे स्वतःच जोरजोरात जाहीर करतो की त्याच्या राज्यात सर्व काही आलबेल आहे, स्वतःच सांगतो की 'सब चंगा है जी' त्यात




आणि जनता सार्वभौम असणाऱ्या लोकशाही प्रणालीत काही फरकच राहणार नाही.

**हा मुद्दा वेगळा आहे**

कंपनीचा सीइओ माझ्या कार्यकाळात जशी कंपनीची तिमाही किंवा वार्षिक विक्री किंवा नफा किती टक्क्यांनी वाढली/ वाढला हे जाहीर करतो तशी देशाची जीडीपी आहे काय? देशची अर्थव्यवस्था म्हणजे कंपनी आणि देशाचे पंतप्रधान, इतर नेते सीइओ/ डायरेकटर्स असतात काय ?

गेली अनेक वर्षे हे सांगून आपला ब्रेनवॉश केला गेला आहे की देशाची जीडीपी सतत वाढली तर देशाची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर आहे असे मानता येते. फाईन.पण मुळात देशाची जीडीपी वाढवण्याचा उद्देश काय ? हा कोट्यवधी मतदार नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न, या चालू लोकांनी कार्पेटखाली घातला. बोलतच नाहीत. सगळा आपोआपवाद!

उदा. पाण्याची पातळी वाढली की साऱ्या बोटी / नावा वर उचलल्या जातात अशी उथळ तत्वज्ञानात्मक गुळगुळीत झालेली वाक्ये रुजवली गेली. मुळात देशाची अर्थव्यवस्था समुद्राचे रूप घेताना, अनेक छोट्या, मध्यम नावांना समुद्रात घेतलेच गेलेले नाही. (Exclusionist Economy). त्या अजूनही समुद्राकडे जाऊ इच्छिणाऱ्या नद्या , नाल्यात आणि खाडीच्या गाळात/ चिखलात दशकानुदशके रुतून बसल्या आहेत. त्यामुळे समुद्राची पातळी समजा वाढली तरी त्यांना वर उचलल्या जात नाहीच आहेत. उलट गाळात रुजत चालल्या आहेत. कायमच्या.

**हा मुद्दा फक्त या तिमाही जीडीपी पुरता नाही**

गेली अनेक वर्षे देशाची जीडीपी वाढली तर नक्की काय फरक पडला?भूक निर्देशांक सुधारला? गिनी निर्देशांक सुधारला? देशातील आर्थिक विवंचनेमुळे होणाऱ्या आत्महत्या कमी झाल्या?का कोट्यावधी सामान्य नागरिकांच्या डोक्यावरील कर्जभार कमी झाला?५० टक्के तरुण लोकसंख्या असणाऱ्या युवकांना रोजगार मिळाला?५० टक्के अवलंबून असणाऱ्या शेतीक्षेत्राचा जीडीपीतील वाटा वाढला...यापैकी काय झाले. ही तर एक झलक.यादी काही पानांची होईल.

हे झाले जनकेंद्री परिप्रेक्ष्यातून लावलेले निकष. त्यांना चला बाजूला ठेवूया. पण प्रस्थापित वर्गाच्या परिप्रेक्ष्यातून निकष जरी लावले तरी फारसे काही हाती लागत नाही. उदा.अर्थव्यवस्था गेली अनेक वर्षे तेजीत आहे तर देशातील खाजगी कॉर्पोरेट क्षेत्राने हिरीरीने भांडवल गुंतवणुकीसाठी पुढे आले पाहिजे ? परकीय भांडवलाने , देशातील अस्तित्वात असणाऱ्या कंपन्या विकत घेण्यासाठी नाही, तर नवीन उत्पादन क्षमतासाठी गुंतवणूक केल्या पाहिजेत ; देशातील श्रीमंत नागरिक जे दरवर्षी मोठ्या संख्येने भारतीय नागरिकत्व सोडून विकसित देशाचे नागरिकत्व घेत आहेत ते थांबले पाहिजेत ; आपले परदेशी गेलेले विद्यार्थी, तरुण तंत्रज्ञ देशात परत आले पाहिजेत..जसे ते चीनमध्ये घडत आहे. यातील काहीही होत नाही.

जीडीपी वाढली म्हणून स्वतःचीच पाठ थोपटणारे सरकारी प्रवक्ते सोयीस्करपणे या कोणत्याच प्रश्नावर कधीच तोंड उघडत नाहीत. त्यांनी उत्तरे न देणे हीच त्यांची उत्तरे आहेत.जीडीपी विषयकच नाही तर अर्थव्यवस्था विषयक कोणतीच आकडेवारी फेसव्हॅल्यूवर घेऊ नका;फोड करून बारीक प्रश्न विचारा. सगळी स्टोरी त्यातच दडलेली आहे.

**-संजीव चांदोरकर**

# जेन-झी : बदलत्या काळाची मानसिकता.....

एखाद्या पिढीला समजून घेण्यासाठी तिच्या सवयींची यादी पुरेशी नसते;तिच्या काळाचा संदर्भ समजून घ्यावा लागतो.जेन-झी ही केवळ एका विशिष्ट वयोगजेन-झी : बदलत्या काळाची मानसिकता.....टाची ओळख नसून,तंत्रज्ञानाच्या अभूतपूर्व वेगात, जागतिकीकरणाच्या विस्तारात आणि सामाजिक मूल्यांच्या संक्रमणकाळात घडलेली मानसिकता आहे. त्यामुळे जेन-झीला समजून घेणे म्हणजे आजच्या बदलत्या समाजाचेच एक वाचन ठरते.

या पिढीचा जन्मच डिजिटल जगाच्या सावलीत झाला. इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया, स्ट्रीमिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही तिच्यासाठी बाहेरून आलेली साधने नाहीत; ती तिच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग आहेत. पूर्वी माहिती मिळवण्यासाठी शोध घ्यावा लागत असे; आज माहिती स्वतःहून स्क्रीनवर येते. या बदलाने केवळ माहिती मिळवण्याची पद्धत बदललेली नाही,तर लक्ष देण्याची, विचार करण्याची,संवाद साधण्याची आणि निर्णय घेण्याची पद्धतही बदलली आहे. माहितीचा अभाव ही समस्या राहिलेली नाही; उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहातून विश्वासार्ह ज्ञान निवडणे हे नवे आव्हान बनले आहे.

जेन-झीच्या भाषेत दिसणारी संमिश्रता याच डिजिटल संस्कृतीचे भाषिक प्रतिबिंब आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, इमोजी,



मीम्स आणि इंटरनेटवरील नवशब्द यांच्या मिश्रणातून ती स्वतःची संवादपद्धती निर्माण करते.पारंपरिक भाषाशुद्धतेच्या निकषांवर ती अपूर्ण वाटू शकते; परंतु भाषाविकासाच्या दृष्टीने पाहिल्यास ती भाषा बदलत्या जीवनानुभवाशी कशी जुळवून घेते, याचे जिवंत उदाहरण आहे.तिच्यासाठी भाषा केवळ संवादाचे माध्यम नाही; ती ओळख, विनोद, समूहभावना आणि स्वतःचे वेगळेपण व्यक्त करण्याचे साधन आहे.

मूल्यव्यवस्थेच्या पातळीवरही महत्त्वाचा बदल जाणवतो. अधिकार, परंपरा किंवा सामाजिक संकेत यांचा स्वीकार केवळ ते जुने आहेत म्हणून करण्याची मानसिकता कमी होत आहे. 'हे असेच का?' हा प्रश्न जेन-झीच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू आहे. करिअरमध्ये स्थैर्यापेक्षा अर्थपूर्णता, नात्यांमध्ये मालकीपेक्षा वैयक्तिक अवकाश आणि सामाजिक जीवनात दिखाव्यापेक्षा स्वतःची अस्सल ओळख यांना ती महत्त्व देताना दिसते. अर्थात, ही प्रवृत्ती सर्वच तरुणांना सारखी लागू होते असे मानणे चुकीचे ठरेल; तरीही व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्व-ओळखीचा आग्रह हा या पिढीचा लक्षणीय गुण आहे.

पण या स्वातंत्र्याची दुसरी बाजूही आहे. सोशल मीडियाने प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे सार्वजनिक रूप सादर करण्याची संधी दिली; त्याच वेळी सततची तुलना, लोकप्रियतेचे मोजमाप आणि 'परिपूर्ण' जीवनाची आभासी प्रतिमा यांचा दबावही निर्माण केला. परिणामी,'मी कोण आहे?' या प्रश्नाबरोबरच 'इतरांच्या नजरेत मी कसा दिसतो?'हा प्रश्नही महत्त्वाचा झाला आहे. स्व-अभिव्यक्ती आणि सामाजिक मान्यता यांच्यातील हा संघर्ष जेन-झीच्या मानसिकतेचा महत्त्वाचा पैलू आहे.

रोजगाराच्या क्षेत्रातही ही पिढी वेगळ्या वास्तवाला सामोरी जात आहे. पारंपरिक शिक्षण घेऊन एकाच संस्थेत दीर्घकाळ काम करण्याची संकल्पना बदलत आहे. गिग इकॉनॉमी, फ्रीलान्सिंग,क्रिएटर इकॉनॉमी, रिमोट वर्क आणि एआयमुळे बदलणारी कौशल्ये यामुळे 'करिअर'ची व्याख्याच विस्तारत आहे. त्यामुळे जेन-झीसमोर नोकरी मिळवण्याइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे, बदलत्या जगात सतत शिकत आणि स्वतःला नव्याने घडवत कसे राहायचे?

या पिढीचे सामाजिक भानही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. पर्यावरण, समानता, विविधता, वैयक्तिक अधिकार, मानसिक स्वास्थ्य, सामाजिक न्याय यांसारखे विषय तिच्या सार्वजनिक चर्चेचा भाग झाले आहेत. मात्र डिजिटल सक्रियता आणि प्रत्यक्ष सामाजिक सहभाग यांच्यातील अंतर ही तिच्यासमोरील एक गंभीर विसंगती आहे. पोस्ट,हॅशटॅग आणि ऑनलाइन समर्थनापलीकडे प्रत्यक्ष कृती किती घडते, हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे. म्हणून जेन-झीला 'मोबाइलमध्ये गुरफटलेली पिढी', 'बेपर्वा तरुणाई' किंवा 'नव्या ट्रेंड्सच्या मागे धावणारी पिढी' अशा सोप्या चौकटीत बंदिस्त करता येणार नाही. ती विरोधाभासांनी बनलेली पिढी आहे, जगाशी सर्वाधिक जोडलेली, तरीही कधी कधी आतून एकाकी; माहितीने समृद्ध, पण सत्य ओळखण्याच्या संघर्षात; स्वातंत्र्याची आकांक्षा असलेली, पण अपेक्षांच्या दबावाखाली; तंत्रज्ञानस्नेही, पण तंत्रज्ञानामुळे बदलणाऱ्या भवितव्याबद्दल साशंक.

जेन-झीला समजून घेणे म्हणजे तिच्यावर टीका करणे किंवा तिचे समर्थन करणे नव्हे. तिच्या प्रश्नांच्या मुळाशी जाणे, तिच्या निवडींमागचे बदलते वास्तव समजून घेणे आणि तिच्या अनुभवांना ऐतिहासिक संदर्भ देणे होय. कारण जेन-झी ही केवळ उद्याची पिढी नाही; ती आजच्या समाजाला उद्याचे संकेत देणारी पिढी आहे. तिच्या भाषेत, प्रश्नांत, अस्वस्थतेत आणि नवकल्पनांत भविष्यातील समाजाची बीजे दडलेली आहेत.

**श्रीपाद टेंबे**
मो.९१५८०८८०४२

# 'डीजे-डॉल्बी' बंदीचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह!

महाराष्ट्राला सण-उत्सवांची आणि समृद्ध संस्कृतीची मोठी परंपरा लाभलेली आहे. गणेशोत्सव, पोळा, नवरात्रोत्सव आणि दिवाळी यांसारखे सण आपल्या आयुष्यात उत्साह, आनंद व सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी असतात. परंतु, अलीकडच्या काळात सण साजरे करण्याच्या पद्धतीत मोठा बदल होऊन त्यात कर्णकर्कश डीजे, डॉल्बी आणि प्रखर लेझर लाईट्ससारख्या घातक गोष्टींचा शिरकाव झाला. या पार्श्वभूमीवर नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात आगामी सण-उत्सवांच्या काळात उच्च क्षमतेचे डॉल्बी, डीजे आणि प्रखर लेझर लाईट्सवर कडक प्रतिबंध घालण्यात येत आहेत, हा प्रशासनाचा निर्णय अत्यंत दूरदर्शी व नागरिकांच्या हिताचा आहे.

गेल्या काही वर्षांत उत्सवांच्या मिरवणुका म्हणजे जणू आवाजाची आणि विकृतीची स्पर्धाच बनली होती. 'बेस'च्या कर्णकर्कश दणदणाटामुळे घरातील ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि अभ्यास करणाऱ्या लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे, डीजेच्या तालावर वाजणारी अश्लील गाणी, त्यावर केले जाणारे विचित्र व असभ्य हावभाव आणि मद्यपान करून धिंगाणा घालणे, महिलांची छेड काढणे यांसारखे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेला हा असभ्य नाच आपल्या समृद्ध संस्कृतीचा अपमान करणारा आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारा आहे. अशा गोष्टींना कोणत्याही सुसंस्कृत समाजात स्थान असू शकत



नाही.

या बंदीचा दुसरा तितकाच गंभीर पैलू म्हणजे 'लेझर लाईट्स'चा विळखा. मिरवणुकीत सोडले जाणारे हे प्रखर लेझर बीम डोळ्यांच्या दृष्टीसाठी अत्यंत घातक ठरत आहेत. अनेकांच्या डोळ्यांना कायमची दुखापत झाल्याच्या किंवा डोळे दिपून अपघात झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. उत्साह साजरा करताना जर कोणाचे आयुष्य अंधारात जात असेल, तर तो आनंद उत्सव कसा म्हणता येईल?याचा अर्थ असा नव्हे की आपल्या उत्साहात कोणतीही कमतरता येईल. महाराष्ट्राची संस्कृती ही ढोल-ताशांचे पथक, पारंपरिक वाद्यांचा गजर, लेझीम आणि संदल यांवर आधारलेली आहे. डीजे आणि डॉल्बीशिवाय देखील आपले सण तितक्याच पारंपरिक जल्लोषात आणि शिस्तीत साजरे होऊ शकतात.कायद्याची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम असले, तरी एक सजग नागरिक म्हणून त्या नियमांचे पालन करणे आणि आपल्या संस्कृतीचे पावित्र्य टिकवणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. चला, यावर्षीचे सर्व सण विकृती आणि घातक साधनांपासून मुक्त ठेवून, संपूर्ण महाराष्ट्रात एका खऱ्या अर्थाने आरोग्यदायी व संस्कारक्षम वातावरणात पार पाडूया!

**वर्षा आवदे**
नागपूर

## संत सेना महाराज..!

महान अध्यात्मिक गुरू
म्हणून सेनाजींची ख्याती
प्रेम करूणा शांतीचा उपदेश
अनुयायांना पटवून देती..

अध्यात्मिक ज्ञानाविणा
मानवी जीवन अधुरे
सकारात्मक विचारांनीच
ईशकृपा होई हेच खरे..

ध्यान तपश्चर्येचा करावा
दिनचर्येत अंगीकार
सेवा मदतवृत्तीने,सेना म्हणे
जन्म सफल होणार..!



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
९४२१३९४३३९

### जागतिक भौतिकोपचार (फिजिओथेरपी) दिन

# तंदुरुस्त शरीर,आनंदी मन,फिजियोथेरेपीचे हेच धन!

जर आपल्या शरीराची हालचाल थांबली, तर आपले जीवन स्तब्ध होते. हेच थांबलेले जीवन पुन्हा गतिमान करण्याचे अद्भूत काम 'फिजिओथेरपिस्ट' करतात. झाडाला जगवण्यासाठी जशी पाण्याची गरज असते, तसेच मानवी शरीराला कार्यरत ठेवण्यासाठी हालचालींची गरज असते.'आधुनिक जीवनशैलीमध्ये वैद्यकीय क्षेत्राने मोठी प्रगती केली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी शाखा, औषधांशिवाय वेदनांवर मात करण्याची कला आणि जगण्याला नवा विश्वास देणारी थेरपी म्हणजे फिजिओथेरपी (भौतिकोपचार) 'शारीरिक उपचार पद्धती'. या क्षेत्राविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी ८ सप्टेंबर हा दिवस १९९६ पासून अधिकृतपणे साजरा करण्यास सुरुवात झाली

कोणत्याही औषधांशिवाय/ शस्त्रक्रियेशिवाय केवळ शारीरिक हालचाली, व्यायाम आणि आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने रुग्णाला बरे करणे, हे फिजिओथेरपीचे मुख्य वैशिष्ट्य. ही उपचार पद्धती विज्ञानावर आधारित आहे. फिजिओथेरपीचे विविध क्षेत्रांतील महत्त्व- १. हाडे आणि सांध्यांचे विकार :भौतिकोपचार हा - हाडे आणि हाडांशी निगडित म्हणजेच ऑर्थोपेडिक्स क्षेत्रांत. (पेशी, स्नायू, हाडे इत्यादी)- आजकाल पाठदुखी, कंबरदुखी, मानदुखी आणि गुडघेदुखी यांसारख्या गंभीर समस्या घरोघरी पाहायला मिळतात. अशा वेळी फिजिओथेरपी सांध्यांमधील ताठरता कमी करून स्नायूंना बळकटी देते.२. अर्धांगवायू/ पक्षाघात(स्ट्रोक/पॅरालायसिस), न्युरोलॉजी - सेरेब्रल पाल्सी,मेंदूशी संबंधित आजार/ दुखापत, स्त्रीरोग आणि त्याच्याशी निगडित अडचणी झालेल्या रुग्णांना पुन्हा चालते-बोलते करण्यासाठी फिजिओथेरपी हे एक वरदान आहे.३. क्रीडा क्षेत्र (स्पोर्ट्स): मैदानावर खेळाडूंना अनेकदा खेळांमध्ये दुखापती होतात . या दुखापतींमधून लवकर बरे होऊन पुन्हा मैदानात उतरण्यासाठी प्रत्येक क्रीडा संघात फिजिओथेरपिस्टची भूमिका महत्त्वाची असते.४. हृदय आणि फुफ्फुसांचे आरोग्य (कार्डिओपल्मनरी):



हृदयविकाराचा झटका / फुफ्फुसांच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी विशेष 'कार्डियाक फिजिओथेरपी' दिली जाते. या पद्धतीत वेदनाशामक (पेनकिलर्स) औषधांचा वापर टाळला जातो, ज्यामुळे औषधांचे दुष्परिणाम होत नाहीत.

**शारीरिक कार्यक्षमता वाढवणे स्वावलंबन**-शारीरिक अपंगत्व किंवा वृद्धत्वामुळे दुसऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना स्वावलंबी बनवण्याचे काम ही उपचार पद्धती करते.'चळवळीचे नाव जीवन' या उक्तीप्रमाणेङ मानवी शरीर नेहमी चालते-बोलते राहणे आवश्यक आहे.

**अपघातानंतरचो पुनर्वसन (रिहॅबिलीटेशन)**-गंभीर दुखापत किंवा हाड मोडल्यानंतर शरीराला पुन्हा पहिल्यासारखे कार्यक्षम बनवण्यासाठी हे अत्यंत गरजेचे आहे.भौतिकोपचार पद्धती आजकाल प्रचंड वेगाने वापरली जात आहे. प्रत्येक रुग्णालय, खाजगी दवाखाने येथे भौतिकोपचारांचा वापर केला जातो.

फिजिओथेरपिस्ट प्रामुख्याने शारीरिक गुणवत्ता राखण्याकडे लक्ष देतात. सध्याच्या काळात फिजिओथेरपीही सुपरस्पेशालिटी झालेली आहे.मॅट्रिक्स रिदम थेरपी मोटर कंट्रोल,न्यूरो कायनेटिक थेरपी, स्पाइन थेरपी, ॲक्वॅटिक थेरपी या प्रगत थेरपी वापरल्या जातात. डॉक्टर हे रुग्णाचा 'जीव' वाचवतात, पण फिजिओथेरपिस्ट त्या वाचलेल्या जिवामध्ये 'जीवन' फुंकतात, त्याला जगण्याची गती देतात/ जीवाला पुन्हा आनंदाने जगायला आणि चालायला शिकवतात.अशा या सर्व भौतिकोपचार तज्ज्ञांना आजच्या दिवशी आपण मानाचा मुजरा करूया.

**तारा व्दा. शर्मा**
अमरावती

# नागपूरची परंपराः काळी-पिवळी मारबत

पोळा हा सण विशेषत: विदर्भात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. श्रावण अमावस्येला पोळा सण असतो. हा शेतकऱ्यांचा सण. बैलां प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण शेतकरी उत्साहात साजरा करतात. पोळ्याचे दुसरे दिवशी तान्हा पोळा असतो. तान्हा पोळ्याची सुरुवात नागपूरतच पहिल्यांदा झाली.परंतु नागपूर मधील पोळ्याचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत आणि बडग्यांचा उत्सव असतो.काळी आणि पिवळी मारबत तसेच बडग्यांचे पुतळे बनवून त्याची संपूर्ण शहरातून मिरवणूक काढली जाते. समाजातील वाईट चालीरीती आणि रोगराई दूर करण्याचे साकडे मारबतीला घालण्यात येते.



राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्दे आणि स्थानिक समस्यांवर या मारबतीद्वारे भाष्य करणारे फलक असतात. जसे कोरोना काळात 'कोरोना घेऊन जा गे मारबत' याप्रमाणेच महागाई, युद्धस्थिती वगैरेंवर लिहिलेले फलक लोकांचे लक्ष वेधून घेतात.ही परंपरा साधारण १८८१ पासून सुरू झाली. हा जगातील एकमेव असा मिरवणूक प्रकार फक्त नागपुरातच आहे. ही मिरवणूक बघण्यासाठी लोकं प्रचंड गर्दी करतात.मारबत आणि बडग्या हे वाईट शक्तींचे प्रतीक मानले जातात. त्या वाईट शक्तींची धिंड काढून त्यांना शहराबाहेर दहन करण्याची आणि आपले शहर स्वच्छ, प्रदूषणमुक्त आणि समाज समस्या विहीन ठेवण्याचा उद्देश या उत्सवा मागे असावा असे वाटते. विशेषतः जुन्या नागपूर भागात ही परंपरा उत्साहाने जोपासली जाते.काळी मारबत साधारण १४० वर्षापासून चालू आहे. त्याचा संबंध महाभारत काळाशी जोडल्या जातो. पूतणा मावशीचे रूप धारण करून भगवान कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला आणि कृष्णाच्या हातून तिचा मृत्यू झाल्यानंतर गावकऱ्यांनी तिची धिंड अर्थात मारबत काढली आणि तिला जाळले. उद्देश हाच की गावावर पुन्हा कधीही समस्या, संकटे येऊ नयेत अशी आख्यायिका आहे. यासंदर्भात नागपुरात काळी-पिवळी मारबत काढून शहराच्या बाहेर जाळल्याने संकटे संपतात अशी धारणा आहे. यावर्षीची मारबत कशावर असेल याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

**राधा पिंपळापूरे**
उमरेड

# पातूर शहरात ८ ते ११ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा

## नागरिक त्रस्त ;आठवड्यातून दोन वेळा नियमित पाणी पुरवठ्याची मागणी

### एआयएमआयएमचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | पातूर ■

शहरातील अनेक भागांत मागील काही दिवसांपासून तब्बल ८ ते ११ दिवसांच्या अंतराने नळाद्वारे पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापरासाठीही नागरिकांना पाण्याची जुळवाजुळव करावी लागत असून, नगरपरिषद प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात एआयएमआयएम पातूर युनिटच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन साद केले. शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था तातडीने सुधारून नागरिकांना पुरेशा दाबाने आणि नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.



शहरातील अनेक भागांत आठ ते दहा दिवसांनी एकदा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी साठवून ठेवावे लागत आहे. अनियमित पाणीपुरवठ्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना विशेष त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पाण्याअभावी नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

#### आठवड्यातून किमान दोनदा पाणी द्या

शहरातील नागरिकांना आठवड्यातून किमान दोन वेळा नियमित, स्वच्छ आणि पिण्यायोग्य पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी एआयएमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर तातडीने ठोस उपाययोजना न झाल्यास नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आल्याचे सांगण्यात आले. शहराची वाढती लोकसंख्या आणि वाढती पाण्याची गरज लक्षात घेता नगरपरिषद प्रशासनाने उपलब्ध जलस्रोतांचे योग्य नियोजन करून नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

#### मोर्णा धरण असूनही पाण्यासाठी वणवण

पातूर शहराच्या जवळच मोर्णा धरण आहे. या धरणातून परिसरातील इतर गावांना पाणीपुरवठा केला जात असताना पातूर शहरातील नागरिकांना मात्र नियमित पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. मोर्णा धरणातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून पातूर शहराच्या पाणीपुरवठ्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

---

# पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी घेतले श्री राजराजेश्वराचे दर्शन

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे कामगार मंत्री तथा पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी श्रावण सोमवारी श्री राजराजेश्वर कावड पालखी उत्सवानिमित्त अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वराचे दर्शन घेतले व जलाभिषेक केला.

यावेळी त्यांनी कावड पालखी उत्सवात उपस्थित राहून मानाच्या श्री राजराजेश्वर शिवभक्त मंडळाच्या मानाच्या पालखीचे स्वागत केले. यावेळी आमदार रणधीर सावरकर, विजय अग्रवाल, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अनेक मान्यवर, कावड मंडळाचे सदस्य उपस्थित होते. अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर यांच्या जलाभिषेकाचा सोहळा अत्यंत



### कावड पालखी उत्सवात सहभाग

ऐतिहासिक असून यामध्ये संस्कृती, धर्म, विश्वास, भक्ती आणि मानवता यांचा अभूतपूर्व संगम पाहायला मिळतो. श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी ४८ तास अखंड चालणारा हा कावड जलाभिषेक सोहळा असतो. पालकमंत्र्यांनी श्री राजराजेश्वर मंदिरात दर्शन घेऊन जलाभिषेक केला. यावेळी त्यांनी संस्थानच्या कार्यालयालाही भेट दिली. संस्थान समितीतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जैन चौकातील स्वागतस्थळी उपस्थित राहून त्यांनी शाही स्वारी – मानाच्या पालखीचे स्वागत करत दर्शन घेतले.

---

# बाळापूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिल्प निदेशक पदासाठी अर्ज आमंत्रित

■ प्रतिनिधी | अकोला ■

आर्यभट्ट शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बाळापूर येथील सोलार टेक्निशियन शिल्पनिदेशकच्या एका पदासाठी ११ महिन्यांकरिता एकत्रित मानधनावर करार तत्वावर पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुकांनी संपूर्ण कागदपत्रासह आपले अर्ज १९ सप्टेंबरपर्यंत संस्थेला हस्तपोच करावे, असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

उमेदवारांनी मुलाखतीसाठी २२ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता बाळापूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपस्थित राहावे. या पदासाठी शैक्षणिक पात्रता इलेक्ट्रिकल/ इलेक्ट्रॉनिक्स मध्ये इंजिनिअरिंग पदवी किंवा डिप्लोमा तसेच एक वर्षाचा अनुभव किंवा आयटीआय / सीआयटीएस प्रमाणपत्रधारक सोलार टेक्निशियन ट्रेड व तीन वर्षाचा अनुभव याप्रमाणे असावी. तसेच यासोबत सीआयटीएस / क्राफ्ट इन्सट्रक्टर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व आवश्यक कागदपत्रे व रुपये २०० शुल्कासह उपरोक्त नमूद तारखेस मुलाखतीसाठी संस्थेत हजर राहावे, असे आवाहन बाळापूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे करण्यात आले आहे.

---

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम

## अनुपस्थित, स्थलांतरित, मृत, दुबार मतदार

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट करता आली नाहीत अशा (अनकलेक्टेबल ईएफ) गटातील मतदारांच्या नावांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून, संबंधितांनी नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाने दि.०१.१०.२०२६ या अर्हता दिनांकावर आधारीत घोषित केलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणचा (SIR) घोषीत केलेल्या कार्यमातील सुधारीत वेळा पत्रकानुसार प्रारुप यादीची प्रसिध्दी दिनांक ३१ ऑगस्ट रोजी करण्यात आलेली आहे.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रमाअंतर्गत घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरुन घेण्याचा कार्यक्रम दिनांक ३० जून ते दिनांक १७ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात आला. या कालावधीत अकोला जिल्हयातील गणना प्रपत्रे भरून परत न देणा-या २ लक्ष ७६ हजार ९९२ इतके मतदार ‘गणना प्रपत्र जमा न होणे (Uncollectable EF)’ या प्रवर्गात नोंदविण्यात आलेले आहेत. त्या मतदारांची नावे ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. यामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने प्रत्यक्ष गृहभेट दिल्यानंतर सापडु न शकलेले /गैरहजर (Absent), कायमस्वरुपी स्थलांतरीत (Permanently Shifted), ce=le (Dead), अन्यत्र नोंदणी केलेले (Already Enrolled) व इतर या गटातील मतदारांचा समावेश आहे.

त्यानुसार जिल्ह्यात आढळून न आलेले/गैरहजर ५१ हजार २६, कायमस्वरुपी स्थलांतरीत १ लक्ष ३४ हजार ५८९, मृत ४६ हजार २४७, अन्यत्र नोंदणी असलेले किंवा दुबार ४४ हजार ४४८, इतर ६८२ असे दोन लक्ष ७६ हजार ९९२ व्यक्ती आहेत.

ज्यांची नावे प्रारुप मतदार यादी मध्ये समाविष्ट करता आली नाहीत अशा (अनकलेक्टेबल ईएफ) गटातील मतदारांच्या नावांच्या याद्या उपजिल्हाधिकारी (महसुल) तथा मतदान नोंदणी अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, सर्व तहसिलदार तथा सहायक नोंदणी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला. सर्व पंचायत समिती, महानगरपालिका अकोला. सर्व नगर परिषद, नगर पंचायत या कार्यालयाचे सूचना फलकावर तसेच अकोला जिल्ह्याचे www.akola.gov.in या शासकीय संकेतस्थळावर विशेष सखोल पुनरिक्षण या टॅब वर अवलोकनास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल?हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

---

# राज्य बाल हक्क संरक्षण आयोग उद्या अकोल्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा दि. ९ सप्टेंबर रोजी अकोला येथे दौरा असून, बालकांच्या हक्कांचे संरक्षण, बाल संरक्षण व्यवस्थेची अंमलबजावणी तसेच बालगृहातील बालकांच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात महिला व बालविकास भवनात सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत बाल हक्कांशी संबंधित प्रकरणांची सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १२.३० ते २ वा.पर्यंत अकोला जिल्ह्यातील बालसंरक्षण विषयक कामकाजाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत जिल्ह्यातील बाल संरक्षणाशी संबंधित विविध बाबी, प्रलंबित प्रकरणे, बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच संबंधित यंत्रणांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, दुपारी ३ ते सायंकाळी ६ वा. दरम्यान आयोगाच्या वतीने बालगृहांना भेट देण्यात येणार आहे. बालगृहातील बालकांच्या निवास, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, आहार, समुपदेशन व पुनर्वसनाच्या व्यवस्थेची पाहणी करण्यात येणार असून बालकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेतला जाणार आहे.

---

# स्वाधार योजनेच्या अर्जांची त्रुटी पुर्ततेसाठी १० सप्टेंबरपर्यंत मुदत

■ प्रतिनिधी | अकोला ■

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकातील इयत्ता ११ वी १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणुन भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरिता शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केली आहे.

भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत सन २०२५-२०२६ या शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जांमध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत यापूर्वी वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत.मात्र काही विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत अर्जातील त्रुटीपूर्तता केलेली नाही.अशा विद्यार्थ्यांनी तात्काळ ऑनलाइन पद्धतीने अर्जातील त्रुटींची पूर्तता दि. १० सप्टेंबर २०२६ पर्यंत करुन त्याची प्रिंट ऑफलाइन पद्धतीने संबंधित कार्यालयात सादर करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त एम.जी.वाठ यांनी केले आहे.

---

# मारवाडी युवा मंचच्या ‘वॉकथॉन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद





■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मारवाडी युवा मंच, अकोला शाखा व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘वॉकथॉन ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वसंत देसाई स्टेडियम येथे संपन्न या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी सतीषचंद्र भट्ट, तसेच मारवाडी युवा मंचचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष निकेश गुप्ता, शाखा अध्यक्ष जितेंद्र बोरा, सचिव केतन गुप्ता, प्रांतीय संयुक्त मंत्री स्वप्निल जैन, कोषाध्यक्ष रितिक अग्रवाल, प्रकल्प प्रमुख नमन खंडेलवाल आदी उपस्थित होते.या वॉकथॉन मध्ये शहरातील सुमारे ८०० युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत निरोगी जीवनशैली, नियमित व्यायाम आणि क्रीडाप्रती जागरूकतेचा संदेश दिला.यावेळी मारवाडी युवा मंच अकोला शाखेचे अभिषेक अग्रवाल, अभिषेक सोनालावाला, स्नेह अग्रवाल, निर्मल समदडिया, प्रदीप रांदड, सुनील शर्मा, स्वप्निल जैन, ओम अग्रवाल, सर्वेश अग्रवाल आणि लवेश कागलीवाल यांच्यासह मंचाचे पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# आरएलटी विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

शिक्षक दिनानिमीत्त श्री रालतो विज्ञान महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे शिक्षक दिन कार्यक्रमाचे महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंद्रवंशी उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सर्व विभागातील विभाग प्रमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सोनाली गवांदे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. सुजाता ताडम आणि डॉ. विनोद देवतळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती आणि थोर तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला रासेयोच्या स्वयंसेवकांनी सर्व शिक्षकांचे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले आकर्षक हँडमेड ग्रीटिंग कार्ड्स आणि पुष्प देऊन स्वागत केले. डॉ. सोनाली गवांदे यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते व्यक्त केली. या दिनाचे महत्व विशद करतांना प्राध्यापकांनी जीवनमूल्ये, शिस्त आणि अभ्यासाचे महत्त्व सांगितले. या दिनी विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षक बनून वर्ग सांभाळणे स्व-शासन हा उपक्रम राबविला. या उपक्रमामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरीत करून सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंद्रवंशी यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना सत्य, परिश्रम, संघर्ष व रोजगारासाठी सतत प्रयत्नशिल राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमासाठी डॉ. शैलेंद्र मडावी, डॉ. सोनाली गवांदे यांचेसह रासेयो विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.

---

# सामाजिक न्याय विभागाकडून आवाहन

## मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया ’महाडीबीटी २.०’ (MahaDBT 2.0) या नवीन पोर्टलवर अधिकृतपणे सुरू झाली आहे. शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या आधार-संलग्न (Aadhaar Seedd) बँक खात्यात जमा होणार असल्याने सर्व विद्यार्थी, पालक व शैक्षणिक संस्थांनी अर्जात अचूक माहिती भरावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मारोती वाठ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

अर्ज https://mahadbt2.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा, असे समाजकल्याण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना :** सर्व विद्यार्थ्यांसाठी नवीन ’महाआयडी’ तयार करणे बंधनकारक आहे. मागील वर्षाचे आयडी व पासवर्ड आता चालणार नाहीत. विद्यार्थ्यांनी आधार क्रमांकाचा वापर करून नोंदणी करावी. आधार पोर्टलवर आपली वैयक्तिक माहिती, मोबाईल क्रमांक, ईमेल आणि बँक खाते अद्ययावत ठेवावे. जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र (Domicile) आणि शैक्षणिक गुणपत्रके स्पष्ट स्वरूपात अपलोड करावीत. नवीन आणि नूतनीकरण (Renewal) अशा दोन्ही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नवीन महाआयडी बनवावा लागेल.

---

### सरपंच पदाच्या आरक्षणाची १० सप्टेंबरला सोडत

■ प्रतिनिधी | अकोल ■

अकोला जिल्ह्यातील ७ तालुक्यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्गासाठी सरपंच पदाच्या आरक्षणासाठी सोडत १० सप्टेंबरला होणार आहे.ग्रामविकास विभागाच्या १३ जून २०२५, तसेच १२ ऑगस्ट २०२६ च्या अधिसुचनेनुसार निश्चित केलेल्या केवळ नागरिकांच्या मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग यांच्या आरक्षणामध्ये बदल होत असल्यामुळे शुद्धीपत्रकानुसार ही सोडत होईल.

---

# सार्वजनिक वीज व्यवस्था वाचवण्यासाठी देशव्यापी संघर्ष--कॉ सुभाष लांबा

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्र व राज्य सरकारे वीज क्षेत्रातील तथाकथित सुधारणांच्या नावाखाली सार्वजनिक वीज व्यवस्था कमकुवत करून खासगी कंपन्यांसाठी नफ्याचा मार्ग मोकळा करत आहेत.म्हणून या खाजगीकरणा विरोधात देशव्यापी आंदोलन उभारण्यात येत असून वीज कर्मचारी, अभियंते, शेतकरी, कामगार आणि ग्राहकांना या धोरणांविरोधात देशव्यापी संघर्ष तीव्र करण्याचे आवाहन इलेक्ट्रिसिटी एम्प्लॉईज फेडरेशन ऑफ इंडिया चे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुभाष लांबा यांनी केले.

मराठा मंडळ सभागृहात महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर युनियनच्या वतीने कामगार मेळाव्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी विद्युत कामगारांच्या प्रलंबित समस्यांच्या संदर्भात त्यांनी माहिती दिली.या पत्रकार परिषदेला युनियनचे राज्य अध्यक्ष पी. के. उके



कार्याध्यक्ष डी. बी. बोर्डे, महासचिव राजेश कठाले, उपमहासचिव सुनील, टी देशमुख, टी.एम.गवळी उपाध्यक्ष पी. आर. लोडम, विलास भारती आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र सरकारने १६ सर्कलचे फ्रँचायझीकरण करण्याचा निर्णय, १६०० मेगावॅट वीज निर्मिती बंद करण्याची प्रक्रिया आणि कर्मचारी व अभियंत्यांच्या मागण्यांचे निराकरण करण्या ऐवजी एस्मा लागू करण्याच्या निर्णयाचा त्यांनी तीव्र निषेध केला. तसेच, याविरोधात वीज कर्मचारी व अभियंत्यांनी १८ सप्टेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेतलेल्या आंदोलनाला त्यांनी जोरदार पाठिंबा दिला. वीज ही नफ्याची वस्तू नसून जनता, शेती आणि औद्योगिक विकासासाठीची मूलभूत सार्वजनिक सेवा आहे. वीज निर्मिती, पारेषण आणि वितरणाची सार्वजनिक व्यवस्था खासगी कंपन्यांच्या ताब्यात देणे हे ग्राहक आणि देशाच्या ऊर्जा सुरक्षेसाठी गंभीर धोका आहे.सबब राष्ट्रीय स्तरावरील संपूर्ण विद्युत विभागातील कर्मचारी हा अन्याय कदापि सहन करणार नसल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.खाजगीकरण विरोधात दि २९ सप्टेंबरला संपूर्ण राष्ट्रीय स्तरावर प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन राबवून ६ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे प्रचंड मोर्चा आयोजित करण्यात येणार आहे.या नंतर हिवाळी अधिवेशनात संसद व विधिमंडळावर लाखो विद्युत कामगारांचा मोर्चा जाणार असून ताकदीने खाजगीकरणाला विरोध करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर युनियनचे सरचिटणीस राजेश कठाळे यांनीही युनियनच्या एकंदर आंदोलनात्मक बाबीची माहिती दिली. या पत्रकार परिषदेस स्वाभिमानी विद्युत वर्कर युनियनचे बहुसंख्य पदाधिकारी व कामगार नेते उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com



# घंटागाडी गायब; आष्टी शहरात कचऱ्याचे साम्राज्य

## वर्षभरापासून कचरा संकलनाचा बोजवारा; आठवडी बाजारानंतर रस्त्यावरच कचऱ्याचे ढिगारे

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी काही वर्षांपूर्वी नियमित फिरणाऱ्या घंटागाड्या आता शहरातून गायब झाल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षभरापासून शहरातील अनेक भागांत कचरा संकलनाची व्यवस्था विस्कळीत झाली असून, जागोजागी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आष्टी शहरात दर रविवारी आठवडी बाजार भरतो. बाजार संपल्यानंतर भाजीपाला, प्लास्टिक, कागद, कुजलेले अन्नपदार्थ आणि अन्य कचरा रस्त्याच्या कडेला तसेच बाजार परिसरातच पडून राहतो. सोमवारी सकाळी बाजार परिसरात सर्वत्र कचऱ्याचे ढिगारे दिसून येतात. विशेष म्हणजे याच परिसरात नगरपंचायतीचे कार्यालय आहे. नगरपंचायत कार्यालयाच्या परिसरातच अस्वच्छतेचे साम्राज्य दिसत असल्याने शहरातील अन्य भागांच्या स्वच्छतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या परिसरात शाळा आणि महाविद्यालयेदेखील आहेत.सकाळच्या वेळी विद्यार्थी, शिक्षक आणि प्राध्यापकांना कचऱ्याच्या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. दुर्गंधीमुळे अनेक नागरिक नाकावर रुमाल बांधून मार्गक्रमण करताना दिसतात. खडकपुरा परिसरात तर गेल्या वर्षभरापासून घंटागाडी नियमित येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे घराघरातून निर्माण होणारा कचरा कुठे टाकायचा, असा प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे. परिणामी काही ठिकाणी मोकळ्या जागा आणि रस्त्यांच्या कडेला कचरा टाकला जात आहे.

पोलीस कर्मचारी वसाहतीतही अशीच परिस्थिती असल्याचे सांगण्यात येते. येथेही कचरा संकलनाची घंटागाडी नियमित येत नसल्याने कचरा साचत असल्याची पोलिस कर्मचाऱ्यांची तोंडी तक्रार आहे.

**कचऱ्यामुळे आरोग्याचा धोका**

साचलेल्या कचऱ्यातून दुर्गंधी पसरत असून, मोकाट जनावरे आणि कुत्र्यांचा वावर वाढला आहे. पावसाळ्यात कचरा कुजल्याने डास व इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

**नगरपंचायत कार्यालयाच्या दारातच कचऱ्याचा प्रश्न**

शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी असलेल्या नगरपंचायतीच्या कार्यालयाच्या परिसरातच कचऱ्याचे ढिगारे दिसत असतील, तर स्वच्छता व्यवस्थेचे नियोजन नेमके कुठे आहे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. घंटागाड्या नियमित का फिरत नाहीत कचरा संकलनाची पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नाही? संबंधित यंत्रणा याकडे दुर्लक्ष का करीत आहे, असे प्रश्नही उपस्थित होत आहेत. या संदर्भात आष्टी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, फोनला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे नगरपंचायतीची अधिकृत भूमिका समोर येऊ शकली नाही.

शहर स्वच्छतेच्या घोषणा आणि विविध स्वच्छता अभियानांच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षात रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे दिसत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. घंटागाड्या तातडीने नियमित सुरू कराव्यात, साचलेला कचरा त्वरित उचलावा आणि शहराची स्वच्छता व्यवस्था पूर्वपदावर आणावी, अशी मागणी आष्टीकरांकडून होत आहे.



# कंत्राटदार फरार, कामगार कंगाल; पालिका प्रशासन मात्र सुस्त

## कंत्राटी कामगारांच्या वेतनासह पीएफची कोट्यवधींची रक्कम बुडाल्याचा आरोप

### नगरसेवक यशवंत झाडेंची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**वर्धा/जनमाध्यम**

शहर स्वच्छ ठेवणाऱ्या कामगारांच्या घामाचा पैसा कुठे जातोय वर्षानुवर्षे कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या शेकडो कामगारांच्या वेतन आणि भविष्य निर्वाह निधीच्या रकमेत मोठा गैरप्रकार होत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. अनेक कंत्राटदारांनी कामगारांचे चार ते सहा महिन्यांचे वेतन थकवून तसेच पीएफची रक्कम जमा न करताच कंत्राट सोडले आणि ते गायब झाल्याचा आरोप नगरसेवक यशवंत झाडे यांनी केला आहे. या प्रकारामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून, पालिका प्रशासनाच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वर्धा नगरपालिकेच्या सफाई, सुरक्षा, घंटागाडी, कचरा डेपो, ट्रॅक्टर, विद्युत, अग्निशमन यांसह विविध विभागांत शेकडो महिला-पुरुष कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार कंत्राटदारांना पालिकेकडून निधी दिला जातो. मात्र प्रत्यक्षात कामगारांना पूर्ण वेतन न देता कागदोपत्री वेतन दाखवून त्यातील काही रक्कम रोखीने परत घेतली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**पीएफच्या पैशांचाही 'खेळ'**

कामगारांच्या वेतनातून ईपीएफची रक्कम कपात केली जाते. नियमानुसार नियोक्त्याचा हिस्सा जोडून ती रक्कम पीएफ खात्यात जमा होणे अपेक्षित आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून काही कंत्राटदारांनी पीएफची रक्कम संबंधित विभागाकडे जमा केली नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे कामगारांच्या भविष्यासाठी असलेली रक्कमही धोक्यात आली आहे.

कंत्राटाची मुदत संपण्याच्या काळात कामगारांकडून अखेरपर्यंत काम करून घेतले जाते. मात्र वेतनाची अनेक महिन्यांची थकबाकी ठेवून कंत्राटदार निघून जात असल्याचे चित्र असल्याचा आरोप आहे. परिणामी कामगारांना आंदोलन, उपोषण आणि कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो. कचरा उचलण्याचे काम बंद पडले की त्याचा थेट फटका शहरवासीयांना बसतो.

**कंत्राटदाराचे कामगार' म्हणून पालिकेची हात झटकण्याची भूमिका**

कामगारांनी थकीत वेतनासाठी पालिका प्रशासनाकडे धाव घेतल्यानंतर 'तुम्ही कंत्राटदाराचे कर्मचारी आहात, आमचा संबंध नाही', अशी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे पालिकेकडे कंत्राटी कामगारांची अद्ययावत यादीच नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

नगरसेवक यशवंत झाडे यांनी पालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर थेट प्रश्न उपस्थित केला आहे. कंत्राटदाराचे बिल मंजूर करण्यापूर्वी कामगारांना वेतन दिल्याचे बँक स्टेटमेंट, पीएफ जमा केल्याचा पुरावा आणि संबंधित कागदपत्रे तपासणे आवश्यक आहे. मात्र हे पुरावे नसतानाही बिले पुढे पाठविली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**बिल काढताना डोळे बंद का**

कंत्राटदाराची बिले संबंधित विभागाकडून लेखा विभागाकडे पाठविली जातात आणि त्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने देयके अदा केली जातात मग कामगारांचे वेतन आणि पीएफ प्रत्यक्ष जमा झाले की नाही,याची खातरजमा कोण करणार? असा सवाल झाडे यांनी उपस्थित केला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यात काही आर्थिक हितसंबंध आहेत का, याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव; कारवाईकडे लक्ष**

या गंभीर प्रकरणाची चौकशी करून कामगारांचे वेतन व पीएफची रक्कम बुडविणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी यशवंत झाडे यांनी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. कंत्राटदाराची बिले मंजूर करण्यापूर्वी प्रत्येक कामगाराच्या बँक खात्यात वेतन जमा झाल्याचा तसेच पीएफची रक्कम भरल्याचा पुरावा बंधनकारक करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

निवेदनाच्या प्रती पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, विभागीय आयुक्त नागपूर, मुख्य सचिव तसेच वर्धा नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

आता प्रश्न एकच कामगारांच्या घामाचा पैसा बुडविणाऱ्यांवर कारवाई होणार की कंत्राटदारांच्या गैरव्यवहारावर पालिका प्रशासनाची 'मेहरबानी' कायम राहणार जिल्हा प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते,याकडे कामगारांसह संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## ग्राहक आयोगाचा टाटा कॅपिटलला दणका

# सेवेतील त्रुटीप्रकरणी तक्रारदाराला व्याजासह रक्कम परत करण्याचे आदेश

**वर्धा/जनमाध्यम**

गृहकर्जाच्या व्यवहारात सेवेतील त्रुटी व अनुचित व्यापारी प्रथा केल्याप्रकरणी वर्धा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने टाटा कॅपिटल हाउसिंग फायनान्स लिमिटेडला दणका दिला. आयोगाने तक्रारदाराला बेकायदेशीररीत्या वजा केलेली ३० हजार २८४ रुपयांची रक्कम नऊ टक्के वार्षिक व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. लखन लालचंद आहुजा व इतरांनी गृहकर्जासाठी कंपनीशी संपर्क साधला होता. ३१ डिसेंबर २०२१ रोजी १५ टक्के फ्लोटिंग व्याजदराने २३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. मात्र, तारणमुक्ती प्रमाणपत्र वेळेत न मिळाल्याने कर्ज रद्द करण्यात आले. त्यानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता खात्यातून ३० हजार २८६ रुपये वजा करण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला. याप्रकरणी आयोगाने कंपनीची सेवा सदोष ठरवत मानसिक व शारीरिक त्रासापोटी १० हजार रुपये आणि तक्रारीच्या खर्चापोटी पाच हजार रुपये देण्याचे आदेश दिले. आयोगाच्या अध्यक्षा वैशाली गडभिये व सदस्य संजय एम. थुल यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यात ॲड. विशाल व्ही. तिबडेवाल यांनी जोरदार युक्तिवाद केला.

# बोगस डॉक्टरवर कारवाई; तीन दिवसांची पोलीस कोठडी

## वर्धमनेरी येथे अनधिकृत दवाखान्यावर छापा; ॲलोपॅथी औषधांचा साठा जप्त

**आर्वी/जनमाध्यम**

तालुक्यातील मौजा वर्धमनेरी येथे वैध वैद्यकीय पदवी व नोंदणी प्रमाणपत्र नसताना अनधिकृतपणे वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टरवर तळेगाव पोलिसांनी कारवाई केली. आरोपीला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या आदेशानुसार बोगस डॉक्टरांविरोधात कारवाई करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या तालुकास्तरीय समिती आणि तळेगाव पोलिसांच्या संयुक्त पथकाने ४ सप्टेंबर रोजी ही कारवाई केली. वर्धमनेरी येथे मागील दोन महिन्यांपासून रंजनकुमार नालिनी मंडल वय ५२ रा. पश्चिम बंगाल, ह.मु. विठ्ठल वॉर्ड, आर्वी हा 'साईराम' नावाने अनधिकृत दवाखाना चालवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने दवाखान्याची झडती घेतली. झडतीदरम्यान दवाखान्यात ॲलोपॅथी औषधांचा साठा आढळून आला. तसेच आरोपीकडे वैद्यकीय शिक्षणाची कोणतीही वैध पदवी किंवा महाराष्ट्रात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचे तपासणीत समोर आले. दवाखान्यावर स्वतःच्या नावापुढे 'डॉक्टर' असा उल्लेख असलेला फलकही लावण्यात आला होता. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उषा कवरासे यांच्या तक्रारीवरून तळेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६५/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१९ (२), २७८ तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३३(१),(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार मंगेश भोयर तपास करीत असून आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले व तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली. गटविकास अधिकारी शिवशंकर इंगोले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उषा कवरासे यांच्यासह आरोग्य विभाग व पोलिस पथक सहभागी होते.

# सुनेने सासुला बकेट मारून केले जखमी

**हिंगणघाट** - घरघुती कारणावरून झालेल्या वादातून सुनेने सासुला बकेट मारून जखमी केले. ही घटना शहरातील कलोडे भवन परिसरात ५ सप्टेंबर रोजी घडली. पुष्पा वैरागडे (६०) असे जखमी महिलेचे नाव आहे. पूजा वैरागडे असे मारहाण करणाऱ्या सुनेचे नाव आहे.शहरातील कलोडे भवन परिसरात पुष्पा वैरागडे हया राहतात. त्यांच्या पतीचे निधन झाले आहे. घराच्या तीन खोल्यात त्या व दुसऱ्या तीन खोल्यात मुलगा मनोज, सुन पूजा हे दोघे राहतात. घर खाली करण्याचे कारणावरून दोघेही त्यांच्याशी नेहमीच भांडण करतात. ५ सप्टेंबर रोजी खराटयाने आंगण झाडण्याचे कारणावरून सासु व सुनेत वाद झाला होता. यातच सुन पूजाने सासु पुष्पा वैरागडे यांना बकेट मारून जखमी केले.

# महाराजांच्या चरणी स्वच्छतेची सेवा; लहानू परिवाराचा अनोखा आदर्श



**टाकरखेडा/जनमाध्यम**

भक्ती केवळ देवदर्शनापुरती मर्यादित न ठेवता ती सेवेतूनही व्यक्त करता येते, याचा प्रत्यय टाकरखेडा येथे आला. श्री संत लहानुजी महाराजांच्या ५५ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित महोत्सवानंतर लहानु परिवाराच्या २५ सेवेकऱ्यांनी मंदिर परिसराची स्वच्छता करून आपली सेवा महाराजांच्या चरणी अर्पण केली.

स्वच्छता मोहिमेदरम्यान मंदिर परिसराची झाडलोट करण्यात आली. प्लास्टिक कचरा, धूळ, डिस्पोजेबल साहित्य तसेच इतर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. भाविकांना स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण मिळावे, यासाठी परिसरातील विविध ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली.

महोत्सव काळात मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती असल्याने प्रसादालयातही मोठ्या प्रमाणात कचरा आणि धूळ जमा झाली होती. सेवेकऱ्यांनी प्रसादालयातील फरशी, भिंती तसेच वापराच्या जागा धुऊन व घासून स्वच्छ केल्या.'स्वच्छता हीच सेवा आणि सेवा हीच साधना' या भावनेतून लहानु परिवाराचा हा उपक्रम दरवर्षी सुरू आहे.

धार्मिक कार्यक्रमानंतर परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्वतःहून स्वीकारत सेवाभावाचा आदर्श निर्माण केला जात आहे. संस्थानच्या वतीने सेवेकऱ्यांच्या या निस्वार्थ कार्याचे कौतुक करण्यात आले. त्यांच्या सेवेमुळे मंदिर परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न दिसून आला.

## ग्राहकांना नियम, कर्मचाऱ्यांना मोकळीक; केळझर बँकेचा कारभार चव्हाट्यावर

# महिला कर्मचाऱ्याच्या अरेरावीने ग्राहक त्रस्त



**सेलू/जनमाध्यम**

केळझर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत ग्राहकसेवेचा बोजवारा उडाल्याचा आरोप होत असून, काही कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे सामान्य नागरिक, शेतकरी आणि वृद्ध ग्राहक हैराण झाले आहेत. तब्बल १५ गावांचा कारभार सांभाळणाऱ्या या शाखेत ग्राहकांची नेहमीच गर्दी असते. मात्र, त्यातच एका महिला कर्मचाऱ्याच्या कथित अरेरावीमुळे ग्राहकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

पासबुक प्रिंटिंगसारख्या दैनंदिन कामासाठीही ग्राहकांना ठरावीक वेळेची सक्ती केली जात असल्याची तक्रार आहे. '१० ते ११ वाजेपर्यंतच या, अन्यथा पासबुक प्रिंट मिळणार नाही', अशा पद्धतीने ग्राहकांना सुनावले जात असल्याचा आरोप आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या वृद्ध, महिला आणि शेतकऱ्यांना त्यामुळे पुन्हा बँकेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

विशेष म्हणजे संबंधित कर्मचाऱ्यांच्या येण्या-जाण्याच्या वेळांबाबतही ग्राहकांमध्ये नाराजी आहे. कर्मचारी उशिरा येत असताना ग्राहकांना मात्र वेळेचे धडे दिले जात असल्याचा आरोप होत आहे. पासबुक प्रिंटसाठी केवळ खातेदारच उपस्थित असावा, अशी जाचक अटही लादली जात असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. शाखेत वारंवार रोख रकमेचा तुटवडा जाणवत असल्याने शेतकरी आणि गरजू ग्राहकांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे. एकीकडे व्यवस्थापक अमोल ढबाले आणि क्लर्क संकेत काळे ग्राहकांना सहकार्य करीत असल्याचे नागरिक सांगतात. मात्र, काही कर्मचाऱ्यांच्या कथित मुजोरीमुळे संपूर्ण शाखेच्या प्रतिमेला धक्का बसत असल्याची भावना आहे.

ग्राहकांच्या कष्टाच्या पैशांशी संबंधित व्यवहार करणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकेत ग्राहकांना अपमानास्पद वागणूक मिळत असेल तर ही बाब गंभीर आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे.

# ग्रामगीतेच्या संस्कारांची जपणूक; पल्लवी निकम प्रथम

## वरखेड येथे ग्रामगीता पाठांतर स्पर्धा

**वर्धा/जनमाध्यम**

भारतीय संस्कृती, ग्रामजीवन आणि सामाजिक मूल्यांचा संदेश देणाऱ्या ग्रामगीतेचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने श्रीक्षेत्र वरखेड येथे आयोजित ग्रामगीता पाठांतर स्पर्धेत गुरुकुंज मोझरी येथील पल्लवी राजेश निकम हिने प्रथम क्रमांक पटकावला. अमरावती येथील पूर्वा सुरेशराव गहुकर हिने द्वितीय, तर नांदगाव खंडेश्वर येथील मंजिरी बोके हिने तृतीय क्रमांक मिळविला.

गोकुळाष्टमीच्या पर्वावर ग्रामगीतेचे संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारे ग्रामगीताचार्य रामकृष्णदादा बेलूरकर यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.प्रथम क्रमांकासाठी ३ हजार १ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २ हजार १ रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी १ हजार १ रुपये व प्रमाणपत्र देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

माजी सभापती रोशनी मुकुंद पुनसे, केशव कृष्णराव ठाकरे व मनीष विजयराव कुबडे यांच्या सहकार्याने स्पर्धा पार पडली. डॉ. कोमल ठाकरे, छायाताई दंडाळे, ॲड. दिलीप कोहळे, दिलीप मोहेकर व सुरेंद्र बेलूरकर यांनी परीक्षक म्हणून सहकार्य केले. सार्वजनिक माणिक वाचनालय व ग्रामगीताचार्य रामकृष्णदादा जयंती महोत्सव समितीने आयोजन केले.




# वर्धा येथे टेबल टेनिसचा राज्यस्तरीय जल्लोष

## ४ थ्या महाराष्ट्र राज्य मानांकन स्पर्धेचा समारोप; सौरभ दुबेच्या उपस्थितीने रंगत, विजेत्यांचा गौरव

**वर्धा/जनमाध्यम**

वेगवान चेंडू, रॅकेटचा अचूक फटका आणि विजयासाठीची अखेरपर्यंतची झुंज... अशा रोमांचक वातावरणात वर्ध्यातील ४ थ्या महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेची सांगता झाली. जिल्हा क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये पाच दिवस रंगलेल्या या स्पर्धेच्या समारोप सोहळ्यात विजेत्या खेळाडूंचा उत्साहात गौरव करण्यात आला.

राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण सोहळा पार पडला.भारतीय क्रिकेटपटू आणि आयपीएल खेळाडू सौरभ दुबे यांच्या विशेष उपस्थितीने खेळाडू आणि क्रीडाप्रेमींमध्ये उत्साह संचारला.

अंतिम सामन्यांमध्ये राज्यभरातील खेळाडूंनी कौशल्याची झलक दाखवत पदकांसाठी जोरदार संघर्ष केला.१५ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रतीक तुलसानीने, तर मुलींच्या गटात आद्या बाहेतीने विजेतपद पटकावले.१३ वर्षांखालील गटात राजवर्धन तिवारी आणि नीरज नांदेडे यांनी बाजी मारली. ११ वर्षांखालील गटातही राजवर्धन तिवारीने विजेतेपद मिळविले, तर मुलींच्या गटात शारन्या पाटवर्धन विजेती ठरली

वर्ध्यात प्रथमच झालेल्या राज्य मानांकन स्पर्धेमुळे जिल्ह्याच्या टेबल टेनिसला राज्याच्या क्रीडा नकाशावर नवी झळाळी मिळाली आहे. भविष्यात आणखी मोठ्या राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धा वर्ध्यात घेण्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# पीलियाच्या आजाराने युवकाचा मृत्यू

**पुलगाव**-युवकास नियमित दारू पिण्याचे व्यसन असल्याने पीलियाचा आजार झाला होता. असे असूनही त्याने दारू पीने सोडले नाही. यातचा आजारी झाल्याने त्याचा उपचाराचे दरम्यान मृत्यू झाला. मृणाल तेलतुंबडे (३६) असे मृतकाचे नाव आहे. त्यास दारू पिण्याचे व्यसन होते. यामुळे त्यास पीलियाचा आजार झाला होता. परंतु, त्याने दारू पीने न सोडल्याने आजारी पडला होता. यामुळे त्यास पुलगांव येथील रूग्णालयात नेण्यात आले होते. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यास मृत घोषित केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २८२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# प्रा. मनोहर कवीश्वरांचे 'गीत गोविंद' पुनरुज्जीवित रूपात ११ सप्टेंबरला अमरावतीत!

**अमरावती -** येथील उच्च दर्जाचे संगीतगुरू , गीतकार व संगीतकार अमरावतीभूषण कै.प्रा.मनोहर कवीश्वर यांची सर्वाधिक गाजलेली संहिता 'गीतगोविंद' आल्हाद व आलोक आळशी या मूळच्या अमरावती व सध्या पुणे येथे आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या दोन गायक बंधूंनी 'कलावधान आर्टस् पुणे ' या संस्थेच्या माध्यमातून पुनरुज्जिवित केली असून पश्चिम महाराष्ट्रातील यशस्वी प्रयोगांनंतर प्रा.कवीश्वर यांच्या जन्म व कर्मभूमीत म्हणजेच अमरावती येथे 'गीत गोविंद' चे 'गीत मनोहर' या शीर्षकाखाली नव्याने सादरीकरण होणार आहे. येत्या शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी सायं.६.३० वाजता पीडीएमसी कॉलेजच्या आवारातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सदर कार्यक्रम गायक व वाद्य वृंदासह सादर होणार आहे. कलेच्या विश्वात रमणाऱ्या कलाकारावर विश्वनिर्मिती करणाऱ्या शक्तीचाच हात असावा लागतो, पण तेवढं असून भागत नाही.आपल्याला मिळालेल्या कुठल्याही कलेची आयुष्यभर, प्रसंगी हाल सोसून कास धरणारे आणि ती कला आपल्या प्राणपणाने जपून, वाढवून, अधिक खोल, व्यापक व समृद्ध करून मांडणारे कलाकार विरळच. अशा महान विद्वद्जनांमध्ये अमरावतीभूषण कै. प्रा. मनोहरराव कवीश्वरांचे नाव अढळ आहे. मराठी सांस्कृतिक, भाषिक, सांगीतिक आणि नाट्यक्षेत्रांमधील त्यांचा लीलया वावर, अभ्यास आणि अधिकार लक्षात घेता प्रा. मनोहर कवीश्वरांना एक 'संपूर्ण कलाकार' म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. त्यांनी लिहिलेल्या व सादर केलेल्या अनेक दर्जेदार संहितांपैकी सर्वाधिक गाजलेली, सादर झालेली सांगीतिका म्हणजेच योगेश्वर श्रीकृष्णाचे अलौकिक चरित्र सांगणारे 'गीत गोविंद'.या संहितेने जशी १९६० पासून जनमानसाला भुरळ घातली, तशीच तिने ५-६ दशकांनंतर मूळच्या अमरावतीकर गायकांनाही भुरळ घातली. 'गीत गोविंद' एका मोठ्या कालखंडानंतर पुनरुज्जीवित करून आता नव्या दमाने 'कलावधान आर्टस', पुणे निर्मित 'गीत मनोहर' या नावाने सादर करण्यात येत आहे. 'गीत मनोहर'चा सातवा प्रयोग खास अमरावतीकरांसाठी सादर केला जात आहे. शुक्रवारी ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता श्री. शिवाजी महाराज सभागृह ,पीडीएमसी , पंचवटी अमरावती येथे हा प्रयोग सर्वांसाठी खुला आहे. ह्यातील तीन कलाकार आल्हाद आळशी, आलोक आळशी, (श्री. विजय आळशी व प्रा.सौ. मीरा कुळकर्णी-आळशी यांचे सुपुत्र) आणि सृजना मुळे-कथलकर (श्री. प्रमोद मुळे आणि सौ. प्रज्ञा मुळे यांची कन्या) हे मूळ अमरावतीचेच. अमरावतीच्या सांस्कृतिक वर्तुळांमध्ये रमताना त्यांच्यावर मनोहर कवीश्वर (बाबा) यांचा प्रभाव कायमचा कोरला गेला.तिघांनीही त्यांच्या शालेय वयातच (२०००-२००१ च्या दरम्यान) बाबा कवीश्वरांचा 'गीत गोविंद'चा प्रयोग पाहिला, आणि तेव्हा त्याचा झालेला सुप्त संस्कार आज पंचवीस वर्षांनी मूर्त स्वरूपात आला. प्रा. कवीश्वरांसोबतच अमरावतीच्या सांगीतिक वर्तुळातील एक आदरणीय व्यक्ती म्हणजे कुमुदताई हिरूरकर. कुमुदताई या केवळ 'गीत गोविंद' च्या पहिल्या प्रयोगातील एक गायिका नव्हत्या, तर त्यांनी या संहितेचा जन्मच बघितला होता.काव्य, संगीत, आणि कथानकं कशी उभी राहिली त्याच्या साक्षी असलेल्या कुमुदताईंनी 'गीत गोविंद'चे प्रयोग बाबा कवीश्वरांसोबत जवळजवळ २० वर्षे सादर केले. २००८ पासून शाळकरी वयातच आल्हाद व आलोक कुमुद ताईंकडे गाण्याचे धडे घ्यायला जाऊ लागले. रागदारी व बंदिशींचा सिलसिला सुरु असताना एके दिवशी कुमुदताईंनी सहजच 'गीत गोविंद' मधली एक रचना ऐकवली, आणि तिथेच आळशीबंधू या कलाकृतीने प्रभावित झाले . यथावकाश तालमींदरम्यान कुमुदताईंनी आल्हाद व आलोक यांना 'गीत गोविंद' मधली चार गाणी अत्यंत प्रेमाने शिकवली. त्यांचा स्वतःचा 'गीत गोविंद' वर एवढा जीव होता, की ती उत्कटता या गाण्यांमधून आल्हाद, आलोक पर्यंत ही पोहोचली. बाबा कवीश्वरांचे निधन झाले होते आणि पुढे 'गीत गोविंद'चे प्रयोग करणारे कोणी दृष्टीक्षेपात नव्हते. गीतगोविंद ही रचना जिवंत ठेवण्याच्या भावनिक आवाहनामुळे दोघांमध्ये हे कोरलं गेलं होतं ,की जेव्हा संधी मिळेल, तेव्हा 'गीत गोविंद' लोकांसमोर आणायचं.

२०१५ साली 'संस्कारभारती' तर्फे अमरावतीमध्ये झालेल्या 'पाडवा पहाट' मध्ये आल्हाद, आलोक व प्रा. डॉ. जयश्री वैष्णव ह्यांनी पुढाकार घेऊन बाबांच्या 'गीत गोविंद' मधील 'चिंधी' हा प्रवेश गायन-वादन, नाट्य व नृत्यासहित सादर केला. या सादरीकरणाचे तेव्हा सर्वांकडून उदंड कौतुक झाले. कामानिमित्त आल्हाद, आलोक पुण्याला स्थायिक झाल्यावर समविचारी कलाकारांशी ओळख,



सांगीतिक देवाणघेवाण, मैत्री झाली आणि त्या ओघात कालांतराने 'गीत गोविंद'चा पुन्हा विषय पुनर्जिवित झाला. सौ. वीणाताई कवीश्वर यांच्याकडून अलीकडे प्रकाशित झालेली गीतगोविंदची आवृत्ती मिळाली. अमरावती नगरवाचनालयात झालेल्या बाबा कवीश्वरांच्या आवाजातल्या काही चित्रफिती, काही ध्वनिफिती मिळाल्या.त्यात काही कडवी मिळाली, काही भाग मात्र ध्वनिमुद्रणातील त्रुटींमुळे मुळे अपुरा होता. त्यामुळे इतकं करूनही ३-४ गाण्यांची काही कडवी राहिली होती. ही उणीव प्रा. डॉ. जयश्री वैष्णव यांच्या प्रा.मनोहर कवीश्वरांवरील शोधनिबंधातून भरून निघाली.त्यात या कडव्यांच्या नोटेशन्स मिळाल्या व आळशीबंधूंनी गीतगोविंदचे शिवधनुष्य पेलायला घेतले. या पुनरूज्जीवन प्रकल्पातील एक महत्वाचे नाव सौमित्र क्षीरसागर. हार्मोनिअम वादक असलेला सौमित्र हा डॉ. अरविंद थत्ते व डॉ. चैतन्य कुंटे यांचा शिष्य. त्याने सांगीतिक दृष्ट्या गाण्यांचा अभ्यास करून गाणी कुठल्या क्रमाने व कशी अभ्यासली असता संपूर्ण संहिता समजणे सुलभ होईल असा विचार मांडून ही प्रक्रिया अव्याहत ठेवली. सौमित्र यांच्या मते गीतगोविंदच्या प्रत्येक गाण्याचा वेगळा बाज, त्याला असलेला स्वरसाज, गाण्याचा ढाचा, त्याची गुंफण... सगळंच अचंबित करणारं आहे.आव्हान पेलण्याचा आनंद, आणि आता ते समर्थपणे पेलून ११ कलाकारांसोबत ६ यशस्वी प्रयोग केल्याचाही आनंद त्यांनी बोलून दाखविला.यातील हार्मोनिअम व तबल्याचे सर्व तुकडे जसेच्या तसे वाजवायची जबाबदारी चोख बजावणारे अनुक्रमे सौमित्र क्षीरसागर आणि पार्थ ताराबादकर या दोघांचीही पुनरुज्जीवनाच्या कामात महत्वाची भूमिका होती. सर्व कलाकारांनी एक वर्षाहून अधिक काळ प्रयत्नपूर्वक गीतगोविंदला मूळस्वरूपात पण नव्याने उभे केले आहे. बाबा कवीश्वरांच्या कन्या सौ. वीणा कवीश्वर-सत्यनाथन यांनी देखील सर्व बारकावे तपासून दिलखुलासपणे परवानगी दिली. मार्च २०२४ मध्ये ३०० पेक्षा अधिक रसिकांच्या उपस्थितीत पुनरुज्जीवित 'गीत मनोहर'चा प्रयोग पुणे येथे उत्स्फूर्त प्रतिसादाने पार पडला, आणि इतिहासजमा होऊ लागलेल्या एका अद्वितीय प्रतिभेचे लेणे असलेल्या या संहितेला संजीवनी मिळाली. त्यानंतर ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या नागपूरच्या प्रयोगाला कवीश्वरांच्या तीनही कन्या - वीणाताई, वर्षाताई आणि मुक्ताताई सहपरिवार उपस्थिती राहिल्या व त्यांनी या कार्यक्रमाचे भरभरून कौतुक करून सर्व कलाकारांना आशीर्वाद दिले. आजपर्यंत सहा प्रयोगांमध्ये २००० हून अधिक रसिकांनी 'गीत मनोहर'ला अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे. अनेक 'वन्स मोअर' मिळालेला हा कार्यक्रम प्रा. मनोहर कवीश्वरांच्या कर्मभूमी अमरावती मध्ये पहिल्यांदाच सादर होत आहे. सर्व अमरावतीच्या रसिकांना सर्व कलाकारांकडून या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सादरकर्त्या कलाकारांमध्ये आल्हाद आळशी, आलोक आळशी, मृण्मयी जोशी (गायक), अश्विन चितळे, सृजना मुळे-कथलकर (सूत्रधार), सौमित्र क्षीरसागर (हार्मोनिअम), पार्थ ताराबादकर (तबला), आदित्य आपटे (तालवाद्य), वेधा पोळ, सिद्धी देशपांडे (व्हायोलिन), रिया पितळे (व्हीओला) यांचा सहभाग आहे.यातील सृजनाने पंडित प्रा.मनोहर कवीश्वर यांच्याकडून संगीताचे धडे घेतले असून त्यांच्यासोबत संगीतनाट्यात काम करण्याचे भाग्य तिला लाभले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे तेव्हा आपण आपल्या मित्रमंडळी व परिवारातील सर्वांसमवेत जरूर अनुभवावा असे नम्र निवेदन सर्व कलाकारांनी अमरावतीकर रसिकांना व कै.प्रा.मनोहर कवीश्वर यांच्यावर श्रद्धा असणाऱ्या संगीतप्रेमींना केले आहे.

---

**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**
**Admission Notice**

**Admission Notification for Institute Level Round for First Year B.Tech. & Direct Second Year B.Tech Course**

Additional Round for vacant seats against CAP round for **First Year B.Tech. & Direct Second Year B.Tech (Chemical Technology) (1) Food Technology (2) Oil & Paint Technology (3) Pulp & Paper Technology (4) Petrochemical Technology** course, for Academic Session 2026-27 will be made as per State CET Cell admission rules by counseling. Eligible candidates having Maharashtra State General Merit Number should submit their application on plain paper with necessary documents on or before the schedule date & time mentioned as follows. The admission will be made as per the state level merit of State CET Cell wherever applicable as per following schedule. Candidates should remain present at the time of admission with original documents and fees.

| S. N. | Course | Date of Institute level round | Venue |
|---|---|---|---|
| 1. | 1st Year B.Tech (Chem.Tech.) | 11.09.2026 at 1 p.m. | Chemical Technology Department SGB Amravati University |
| 2. | Direct Year B.Tech.(Chem. | 11.09.2026 at 1 p.m. | |

**Registrar**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५६२/२०२६ ने.ता.१९.१०.२०२६

**अर्जदार -**
१. मुनिजाबी अब्बास शाह, वय ८४ वर्षे
२. हनिफ अब्बास शाह, वय ५५ वर्षे
रा.असिर कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती
३. असलाम अब्बास शाह, वय ४३ वर्षे
रा.वार्ड नं.३, सावरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. रामिजा बानो राफिक शाह, वय ३९ वर्षे
रा.उसमानशाह नुरशाह साठी नगर बाजर चौक, वडगांव, ता.जि.अमरावती
५. तमिझा बी करीम शाह वय ४६ वर्षे
रा.नयसाबपुरा पठाण चौकाजवळ, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. **मयत अब्बास शाह सिलेमान शाह** हे अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ५ चे वडील आहेत. अर्जदार नं.२ व ३ हे मयत अब्बास शह सिलेमान शाह यांची मुले असून अर्जदार नं.४ व ५ या मयत अब्बास शाह सिलेमान शाह यांच्या विवाहित मुली आहेत.मयत अब्बास शाह सिलेमान शाह यांचा मृत्यू दिनांक ०२.०२.२०२५ रोजी सावरखेडा, ता.मोशी, जि.अमरावती येथे झालेला आहे. मयत अब्बास शाह सिलेमान शाह यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २१.०८.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५९५/२०२६ ने.ता.०६.१०.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.नामदेव महादेवराव साबु, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
२. बेबी महादेवराव साबु, वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम
दोघेही रा.तळणी, पो.पिंपळखुटा (मोठा) ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **महादेव छगनमल साबु** हे दिनांक ०८.०७.२०१३ रोजी तळणी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत.तसेच अर्जदाराची आई नामे **रामला महादेव साबु** ही दिनांक **०२.०५.२००५ रोजी** तळणी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०४.०९.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८३७/२०२६
**सुरेखा सुरेशराव डोरले अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१७.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Surekha Sureshrao Dorle, Age about 68 Yrs. Occu.: Household
R/o Near Ram Mandir, Chhangani Nagar Galli No.2, Amravati
2. Siddhi Ajinkya Marodkar, (Before Marriage Siddhi Sureshrao Dorle)
Age about 27 Yrs. Occu.: Household
R/o Ballaleshwar Apartment, Parvati Nagar, Ukali, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Deceased Sureshrao Manoharpant Dorle हे दिनांक 13.03.2023 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Surekha Sureshrao Dorle+1 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Surekha Sureshrao Dorle+1 - Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०९.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर सुचना

सर्वत्र आम जनतेस सुचित करण्यात येत आहे की, माझे पक्षकार नामे **१) आरती वैभव देशमुख, २) मेघा अमित देशमुख**, रा.इंद्रपुरी लेआऊट, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी **आशाबाई भीमराव पायताळे** यांचेकडून खालील वर्णनातील स्थावर मिळकत विकत घेण्याचा सौदा केला आहे. वर्णन येणेप्रमाणे-

मौजे म्हैसांग, ता.जि.अकोला, येथील शेत गट नं.६८१ मधील ४९-आर व ३-आर पोटखराब एकुण ५२ आर, आकार रु.३.७४ पैसे, भो.वर्ग-१, खाते नं.७९८ याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे--

पुर्वेस - विकास राठोड यांचे शेत
पश्चिमेस - विश्वास राठोड यांचे शेत
उत्तरेस - अरविंद गावंडे यांचे शेत
दक्षिणेस - अकोला ते म्हैसांग रस्ता

येणेप्रमाणे वर्णन असलेली स्थावर मिळकतीवर कोणाचाही ताबा, हक्क, गहाण, बोझा, वारसाची भानगड, हितसंबंध, न्यायालयीन वाद इत्यादी असल्यास जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा, तथापी विहीत मुदतीनंतर कोणाचाही उजर ऐकल्या जाणार नाही. माझे पक्षकार उपरोक्त वर्णनातील स्थावर मिळकतीचे खरेदीखत करुन घेण्यास स्वतंत्र राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक ०७.०९.२०२६
अमरावती

पक्षकारातर्फे अधिवक्ता,
(ॲड.राधिका आर.नालट)
कांता नगर, कॅम्प रोड, अमरावती
मो.७३८७७६४८३९

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८२०/२०२६
**कोकीळा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.३०.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kokila Gajendra Mohod, Age 45 Yrs. Occu.: Household
R/o Darga Pura, Shirala, Tq. Dist. Amravati.
2. Ashwini Nitesh Athwale, Age 27 Yrs. Occu.: Household
R/o At Khirala, Po.Anjangaon Surji, Tq.Anjangaon Surji, Dist.Amravati
3. Reena Gajendra Mohod, Age 25 Yrs. Occu.: Education
R/o Buddha Pura, Shirala Tq. Dist. Amravati
4. Suraj Gajendra Mohod, Age 21 Yrs. Occu.: Education
R/o At Po. Shirala, Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Gajendra Rangaroji Mohod हे दिनांक 27.11.2025 रोजी **शिराळा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kokila Gajendra Mohod+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kokila Gajendra Mohod+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०९.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **यांनी श्री.राजेश रविशंकर गुप्ता**, रा.भुतेश्श्वर चौक, शिलांगण रोड, अमरावती यांच्याकडून त्यांचे एकमेव मालकी व ताब्यातील दुकानाची खरेदी करण्याचा सौदा करार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन -** नोंदणी पोटतुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व महानगरपालिका अमरावतीच्या हद्दीतील मौजे-गावठाण, अमरावती, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नझुल शिट नं.५८-ए, मधील प्लॉट नं.८ एकुण क्षेत्रफळ ११०.०७ चौ.मी. आहे. यावर बांधलेले एक दुकान याचे एकुण क्षेत्रफळ १४.९६ चौ.मी. (१६१ चौ.फुट) व त्यावरील टेरेस याचे एकुण क्षेत्रफळ १४.९६ चौ.मी. (१६१ चौ.फुट) बांधकाम आरसीसी कॉलम पध्दतीचे वर छत स्लॅबचे असलेल्या यात असलेल्या इलेक्ट्रिक फिटींग मिटरसह दुकान व टेरेस जमीनीवर आकाशापर्यंत यात असलेल्या तदंगभूत वस्तुसह आहे. याची चतुःसिमा--

पुर्वेस - गोपाल किराणा दुकान
पश्चिमेस - लालचंद परतमल यांचे दुकान
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - बलराम वाईन्स यांची मालमत्ता

सदरच्या मिळकतीचे खरेदीखत आमचे पक्षकार ठरल्याप्रमाणे लवकरच करुन घेणार आहेत. या जाहीर सुचनेद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, सदरच्या मिळकतीवर कोणाचाही हक्क, अधिकार, ताबा, गहाण, बोजा, जप्ती किंवा इतर कुठलाही अधिकार असल्यास लेखी पुराव्यासह सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर कळवावे. तसे न केल्यास आमचे पक्षकार खरेदी घेण्यास मोकळे राहतील व पुढे कोणताही उजर चालणार नाही, कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

Raja S.Z.Ali
Advocate
SABA Khare Layout,
Lal Bunglow Road, Camp,
Amravati
M.9890902806

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री.वकार अहेमद अब्दुल सत्तार कुरेशी,** काहेकाशा कॉलनी, वलगांव रोड, अमरावती यांनी **श्री.राजेश रविशंकर गुप्ता, रा.**भुतेश्श्वर चौक, शिलांगण रोड, अमरावती यांच्याकडून त्यांचे एकमेव मालकी व ताब्यातील दुकानाची खरेदी करण्याचा सौदा करार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन -** नोंदणी पोटतुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व महानगरपालिका अमरावतीच्या हद्दीतील मौजे-गावठाण, अमरावती येथील इतवारा बाजार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील मनपा नवीन मालमत्ता नं.२११३, जुना मालमत्ता नं.९०३ असून ओटा नं.९०३ याची साईज १० बाय २० ह २०० चौ.फुट दुकान असून या जागेवर विटा सिमेंट चौफर भिंती व डप्पर टीनामध्ये यामध्ये पुर्व बाजूस लोखंडी शटर मिळकतीची चतुःसिमा खालीलप्रमाणे --

पुर्वेस -पूजा किराणा दुकान, पश्चिमेस - रस्ता गल्ली, उत्तरेस -सुभाष पटेरिया गोडाऊन, दक्षिणेस - रोड

सदरच्या मिळकतीचे खरेदीखत आमचे पक्षकार ठरल्याप्रमाणे लवकरच करुन घेणार आहेत. या जाहीर सुचनेद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, सदरच्या मिळकतीवर कोणाचाही हक्क, अधिकार, ताबा, गहाण, बोजा, जप्ती किंवा इतर कुठलाही अधिकार असल्यास लेखी पुराव्यासह सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर कळवावे. तसे न केल्यास आमचे पक्षकार खरेदी घेण्यास मोकळे राहतील व पुढे कोणताही उजर चालणार नाही, कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

Raja S.Z.Ali
Advocate
SABA Khare Layout,
Lal Bunglow Road, Camp,
Amravati
M.9890902806

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३०२/२०२६
**सीमा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Seema Pravin Ghawale, Age 43 Yrs. Occu.: Service
R/o Flat No.37-B, Devi Residency Shegaon Rahatgaon Road, Near Jawarkar Lawn, Amravati
2. Sarthak Pravin Ghawale, Age 16 Yrs. Occu.: Nil
R/o Flat No.37-B, Devi Residency Shegaon Rahatgaon Road, Near Jawarkar Lawn, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रविण मधुकर घवळे** हे दिनांक 15.05.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सीमा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सीमा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७५५/२०२६
**सतीश व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Satish Rameshrao Kale, Age 44 Yrs. Occu.: Pvt. Job
2. Mangesh Rameshrao Kale, Age 38 Yrs. Occu.: Labour
No.1 & 2 R/o Naya Akola, Tq. Dist. Amravati.
3. Jaya Satishrao Kene, Age 44 Yrs. Occu.: Household
R/o Karajgaon Po.Dawargaon, Tq. dist. Amravati.
4. Nilima Sachinrao Wankhade, Age 40 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.2, Po.Kavthal, Tq. Morshi, Dist.Amravati.
5. Sunanda Ramesh Kale, Age 65 Yrs. Occu.: Household
R/o Naya Akola, Tq. Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रमेशराव रामकृष्ण काळे** हे दिनांक 17.08.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सतीश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सतीश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७१८/२०२६
**पद्मा -वि- निरंक**
पुढील ता.२१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Padma Sunil Mehankar,
Age 46 Yrs. Occu.: Nil
R/o At Po. Palash Line, Gadge Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Dnyaneshwar Sunil Mehankar हे दिनांक 18.05.2026 रोजी **आष्टी, ता.आष्टी, जि.वर्धा** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Padma Sunil Mehankar यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Padma Sunil Mehankar वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२५.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७८१/२०२६
**संध्या विजय मालधुरे अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१३.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sandhya Vijay Maldhure, Age 68 Yrs. Occu.: Housewife
2. Radha Vijay Maldhure, Age 43 Yrs. Occu.: Job
Both R/o 8, Shanti Vihar Colony Kanta Nagar, Amravati
q
3. Swati Vijay Maldhure, Age 46 Yrs. Occu.: Housewife
R/o C-601, Water Green Society, Sanson Layout, Plot No.1234, Kalyan Nagar, Near Old Octroi Chock Hingna Road, Nagpur (Urban) Po.Jaitala, Dist.Nagpur
4. Shradha Niraj Takalkheda, Age 36 Yrs. Occu.: Housewife
R/o 163, Ram Mandir Road, Ayodhya Nagar, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Vijay Bapurao Maldhure हे दिनांक 23.04.2026 रोजी Nagpur येथे मयत झाले. अर्जदार Sandhya Vijay Maldhure+3 -Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sandhya Vijay Maldhure+3 -Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०९.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्यूज ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि. च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वे पुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ०५**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2017-2020

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@ymail.com


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### दुर्गा एम.एस.प्रायमरी स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव व शिक्षक दिन

**शिराळा**-येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक दिनानिमित्त गोपालकाला दंहीहांडी फोडून साजरा केला.सर्व प्रथम माजी राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांनी दंहीहांडी फोडली.सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रविण कोंडे,राजेश भोवाळु,सागर ठाकरे,राहुल सोलव मुख्याध्यापक प्रवीण मोहरे, शिक्षिका अर्चना नागे,अंकिता घोंगडे,ऋतुजा राहटे,प्राची माकोडे, ऋषिकेश इंगळे निकिता उके, शालीनी कडु तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विद्यापीठात क्रांतिवीर राजे उमाजी नाईक जयंती साजरी

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (आस्थापना) मंगेश वरखेडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संचालन व राजे उमाजी नाईक यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



### गांधी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**अंजनगाव बारी**-गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त 'स्वयंशासित शाळा' उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून दिवसभर विविध वर्गांमध्ये अध्यापनाची जबाबदारी सांभाळली. स्वयंशासित शाळेच्या मुख्याध्यापिका आरुषी सावंत, उपमुख्याध्यापिका वैष्णवी कडव व पर्यवेक्षिका अनन्या चांदेकर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी प्राचार्य विनोद चिंचोळकर व पर्यवेक्षक दिगंबर करडे उपस्थित होते.उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांचे कार्य, जबाबदाऱ्या व अध्यापनातील आव्हानांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी भाषणे व मनोगते व्यक्त करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.उपक्रमाचे आयोजन अनिश बडगुजर यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### आयुक्तालयात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक जयंती

**अमरावती**- आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त



अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. अपर आयुक्त (महसूल) आनिल खंडागळे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांनी ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारून रामोशी समाजाच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवली. ७ सप्टेंबर हा त्यांचा जयंतीदिन. त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि बलिदानाचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचा संकल्प यावेळी केला.याप्रसंगी अपर आयुक्त (न्याय शाखा) सुभाष बोरकर, अपर आयुक्त (विकास योजना) शालिनी कडू, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### तरुणाचा गळफासाने मृत्यू

**अंजनगाव बारी**-बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगाव



बारी येथे योगेश सुरेश बाणासुर (२८) याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी समोर आली. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. योगेशने हे टोकाचे पाऊल नेमक्या कोणत्या कारणातून उचलले, याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आत्महत्या की घातपात याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू आहे.

### उदय गुलालकरी यांचे निधन

**अंजनगाव बारी**-येथील नेहरू चौकातील प्रतिष्ठित नागरिक व



ज्येष्ठ किराणा व्यावसायिक उदय सुंदरसा गुलालकरी (७४) यांचे अल्पशा आजाराने रविवारी ६सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता निधन झाले. गुलालकरी यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून, त्यांच्या सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील योगदानाच्या आठवणींना उजाळा मिळाला.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन भाऊ, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.अंजनगाव बारी येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार तसेच नागरिकांनी अंत्यदर्शन घेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# पाईपलाईनच्या भोवती खड्ड्यांचे साम्राज्य, जीवघेण्या खड्ड्याने नागरिकांचा जीव टांगणीला!

## रस्त्यावर नगरपरिषदेच्या निष्काळजीपणाचा फटका; अपघाताची वाट पाहताय का? नागरिकांचा संतप्त सवाल

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या प्रमुख रस्त्यावर नगरपरिषद चांदूर रेल्वेच्या पाणीपुरवठा यंत्रणेतील मुख्य पाइपलाइन आणि कॉकच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून निर्माण झालेल्या या खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांसह पादचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.चांदूर रेल्वे शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य पाइपलाइन याच रस्त्यावरून जाते. पाणीपुरवठा नियंत्रित करण्यासाठी पाइपलाइनमध्ये कॉकची व्यवस्थाही करण्यात आली आहे. मात्र, या यंत्रणेच्या आजूबाजूचा रस्ता खड्ड्यांनी अक्षरशः पोखरला असून, रस्त्यावर नेमका खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता आहे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

या मार्गावरून दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू



असते. दुचाकीस्वार, चारचाकी चालक तसेच पादचाऱ्यांना या खड्ड्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी खड्डा स्पष्ट दिसत नसल्याने अपघाताचा धोका अधिकच वाढला आहे. एखादे वाहन खड्ड्यात आदळून मोठा अपघात होण्याची किंवा एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

'एखाद्याचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित विभागांनी एकमेकांकडे जबाबदारी ढकलण्याऐवजी तातडीने संयुक्त पाहणी करून हा खड्डा बुजवावा आणि रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

आता नगरपरिषद चांदूर रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या जीवघेण्या खड्ड्याची दखल घेऊन कोणती ठोस पावले उचलणार? की एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### नागरिकांच्या संतापाचा उद्रेक!

गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रश्न कायम असतानाही संबंधित यंत्रणेकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रस्त्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असली, तरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा पाइपलाइन आणि कॉकच्या परिसरात निर्माण झालेल्या या धोकादायक परिस्थितीकडे नगरपरिषदेनेही गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.




# विद्यापीठाच्या सीएमडीआरला विदेशी शिष्टमंडळाची भेट



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अँड रिसर्च (सी.एम.डी.आर.) ला विदेशी संशोधन तज्ज्ञ आणि आरोग्यशास्त्रज्ञांच्या एका प्रतिष्ठित शिष्टमंडळाने सदिच्छा भेट दिली. या शिष्टमंडळामध्ये मिस एस्टर गेरेन्डास (नर्सिंग स्पेशालिस्ट, बोस्टन), ग्रेस मे (एमडी ट्यूटर), जॅस्मिन सुंग (सिल्व्हर स्प्रिंग एमडी) आणि मेरी प्रभूदास (सिल्व्हर स्प्रिंग एमडी) यांचा समावेश होता. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, डॉ. के.सी. मोरे, सी.एम.डी.आर. चे संचालक डॉ. प्रशांत ठाकरे आणि उपसंचालक डॉ. नीरज घनवटे उपस्थित होते.

दौऱ्यादरम्यान पाहुण्यांनी विद्यापीठाच्या अत्याधुनिक सुविधांची पाहणी करुन प्राध्यापक व संशोधकांशी संवाद साधला. यावेळी संचालक डॉ. प्रशांत ठाकरे यांनी सी.एम.डी.आर. केंद्राच्यावतीने सुरु असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. तसेच कोरोना महामारीच्या काळात प्रयोगशाळेने समाजाला सेवा देवून कशी मोलाची कामगिरी बजावली, याचे सादरीकरण केले. भेटीदरम्यान शिष्टमंडळाने कोविड - १९ साथीच्या उच्चांकाच्या काळात विद्यापीठाने बजावलेल्या धाडसी आणि निर्णायक आघाडीच्या भूमिकेबद्दल गौरवोद्गार काढून सार्वजनिक आरोग्य यंत्रणेवर अभूतपूर्व ताण असताना, या सी.एम.डी.आर. केंद्राने प्रादेशिक नागरिकांसाठी आणलेली आण्विक निदान चाचणी यंत्रणा अत्यंत प्रभावी ठरल्याचे याप्रसंगी नमूद केले.भेटीदरम्यान संशोधन अभ्यासक मिस पूजा मांडविया, मिस रेणुका येंदे आणि विद्यार्थ्यांनीही विदेशी तज्ज्ञांशी संवाद साधला. दौऱ्यादरम्यान भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त संशोधन आणि सहकार्य वाढवण्यावर भर देण्याचे ठरले. स्थानिक पातळीवरील साथीच्या रोगांच्या व्यवस्थापनातील अनुभवांचा फायदा जागतिक स्तरावर वैज्ञानिक संशोधनासाठी कसा घेता येईल, यावर विद्यापीठ अधिकाऱ्यांनी आशावाद व्यक्त केला.

# शिक्षक दिनानिमित्त अंध विद्यालयात 'कृतज्ञता सन्मान सोहळा'

**अमरावती/का.प्र.**

दि ब्लाईंड वेल्फेअर असोसिएशन, अमरावती द्वारा संचलित डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय व आश्रित अंध कर्मशाळा अमरावती चा हीरक महोत्सव साजरा करण्यात आला.शिक्षक दिनाचे औचित्य साधून 'कृतज्ञता सन्मान सोहळा' अतिशय उत्साहात आणि भावूक वातावरणात पार पडला.

संस्थेच्या ६० वर्षांच्या गौरवशाली वाटचालीत ज्या माजी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ सेवा देऊन आपल्या ज्ञानाने, कर्तृत्वाने, सेवाभावाने आणि समर्पणाने मोलाचे योगदान दिले, अशा ६० कर्मचाऱ्यांचा मार्गदर्शकांचा यावेळी कृतज्ञतापूर्वक सन्मान व सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनेश



गायकवाड, प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर उर्फ नाना आमले,विशेष अतिथी मिथिलेश तिवारी या सर्व प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून अंध विद्यालयाच्या हीरक महोत्सवी वाटचालीचे कौतुक केले आणि शिक्षकांच्या निस्वार्थ सेवेला सलाम केला. संस्थेचे प्रवीणजी मालपाणी, सुनील सरोदे, राजेशजी डागा, ॲड प्रदीपजी श्रीवास्तव,एन. एस. इंगोले, कार्यकारिणी सदस्य धनंजय नाकील, आर. टी. देशमुख, उर्मिला शहा, प्रभा झंवर,मनोज साबू, प्रणित सोनी, रामराव अमृते आणिपंकज मुदगल व दत्ता राऊत यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनाथ इंगोले, संचालन योगीता राऊत व योगेश चौधरी यांनी केले आणि आभार संस्था प्रभारी सचिव धनंजय नाकील यांनी केले. समस्त कर्मचारीवृंद, विद्यार्थी व उपस्थितांच्या भरभरून प्रतिसादामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळून हा सोहळा अत्यंत संस्मरणीय ठरला.

# भूमिका अभिनयात पुरोगामी विद्यालय अव्वल

**अमरावती/प्रतिनिधी**

केंद्र सरकार व NCERT यांच्या दिशानिर्देशानुसार लोकसंख्या शिक्षण विभागाच्या वतीने तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), अमरावती यांच्या अंतर्गत तालुकास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन शिक्षण विभाग,पंचायत समिती भातकुली यांच्या वतीने करण्यात आले.

या स्पर्धेत भूमिका अभिनय आणि समूह लोकनृत्य अशा दोन गटांचा समावेश होता. भूमिका अभिनय स्पर्धेत पुरोगामी विद्यालय,आसरा यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर समूह लोकनृत्य स्पर्धेत श्रीराम हायस्कूल, टाकरखेडा यांनी प्रथम क्रमांक मिळवित बाजी मारली. दोन्ही गटांतील प्रथम क्रमांकाच्या शाळांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी



निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गोपाल वडतकर होते. प्रमुख अतिथी म्हणून केंद्रप्रमुख प्रशांत शेंदूरकर, पंचायत समिती भातकुलीचे विषय समन्वयक सतीश वानखडे, जिल्हा गणित मंडळाचे सचिव संजय गेडाम तसेच श्रीराम हायस्कूल, टाकरखेडा येथील मुख्याध्यापक सोलव उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून बोबडे, सुनील ढोणे आणि उमाकांत उके यांनी जबाबदारी पार पाडली. तालुक्यातील विविध माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण विभाग, पंचायत समिती भातकुली तसेच पुरोगामी विद्यालय, आसरा येथील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# पी.आर.पोटे पाटील आर्किटेक्चर कॉलेज येथे 'वास्तुशास्त्र संवाद व शिक्षक दिन

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार, व्यावसायिक दृष्टिकोन आणि वास्तुकलेविषयीची जिज्ञासा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने 'वास्तुशास्त्र संवाद व शिक्षक दिन' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य संजय देशमूख यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते



म्हणून आकि. 'प्रमोद चौगुले (सांगली), आकि.प्रवीण माळी आणि आकि.'मिलिंद कुलकर्णी उपस्थित होते. मुख्य वक्ते आर्कि प्रमोद चौगुले यांनी आपल्या संवादात सांगितले की वास्तूशास्त्र ही एक व्यापक कला असून शिक्षणा सोबत कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन प्रात्यक्षिक दृष्टीने विचार करणे होय.

आर्कि प्रवीण माळी यांनी सांगितले की प्रत्येकाला गुरु असावा जेणेकरून आपले ध्येय पूर्ण करण्यास मदत होईल.आर्कि मिलिंद कुलकर्णी यांनी संवाद साधतांना सांगितले की संयम व धैर्य ही वास्तूकला निर्माण क्षेत्रातील मुख्य बाब आहे, मानसिक शांतता संवेदना व आनंद याच क्षेत्रात मिळू शकते असे या प्रसंगी सांगितले.

कार्यक्रमास प्रा. राम विघे, आकि. 'प्रणय कांबे, आकि. 'अंशुल अग्रवाल आणि आकि. 'शैलेंद्र देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वरी कडू आणि भाविका ठवकर यांनी केले, तर यामिनी इखे हिने आभार प्रदर्शन केले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच त्यांना वास्तुकलेतील अनुभवी व्यावसायिकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने 'वास्तुशास्त्र संवाद व शिक्षक दिन' हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात झाला. या कार्यक्रमास प्राचार्य यांचे समवेत प्रा. अमित गाडगे, प्रा स्नेहल विघळे, प्रा राम विघे, प्रा पलाश अग्रवाल, प्रा तृप्ती भामकर, प्रा अंकुश खंडारे, प्रा भूपेंद्र जैस्वाल,प्रा किर्ती हिंगे,उदय खोंडे,प्रा हरीश पळसोकर,गिरीश कुरळकर,रवींद्र जोशी व सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी उपस्थित होते.

# वाघाला जेरबंद करण्यासाठी वनविभागाचे पथक सक्रिय

## नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील सोनेरी, ता. चांदूर बाजार परिसरात रविवार,६ सप्टेंबर रोजी वाघाच्या हल्ल्यात एका चिमुकल्या मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या गंभीर घटनेनंतर वनविभाग पूर्णपणे अलर्ट मोडवर आला असून, वाघाला जेरबंद करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी वनविभागाचे पथक सक्रिय झाले आहे. वाघाच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहून वनविभागाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

वनविभागाने वाघाच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी कॅमेरा ट्रॅप, थर्मल ड्रोन आणि प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी सुरू केली आहे. तज्ज्ञ पशूवैद्यकीय अधिकारी व



प्रशिक्षित पथकांच्या मदतीने वाघाचे ठिकाण निश्चित करून त्याला बेशुद्ध करून सुरक्षितरीत्या ताब्यात घेण्याची कार्यवाही वेगाने सुरू आहे. या संदर्भात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी संपर्क साधून वनविभागाची पुण्यावरून आणखी चमू अमरावतीमध्ये पाठवण्याची विनंती केली आहे.

सोनेरी, रिद्धपूर, ब्राह्मणवाडा, बहिरम, देऊरवाडा, मालूर पुनर्वसन आणि परिसरातील गावांमधील नागरिकांनी काही दिवस विशेष खबरदारी बाळगावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यात सध्याच्या परिस्थितीत शेतीच्या कामासाठी शेतात जाणे किंवा गुरे चरण्यासाठी जंगलालगतच्या भागात नेणे पूर्णपणे टाळावे. पहाटे, सायंकाळी आणि रात्रीच्या वेळी एकट्याने घराबाहेर पडू नये. दाट झुडपे, नाले, नदीकाठ आणि जंगलालगतच्या परिसरात जाणे टाळावे. वाघ दिसल्यास आरडाओरड करू नये, त्याचा पाठलाग करू नये अथवा फोटो, व्हिडिओ काढण्यासाठी जवळ जाऊ नये. सोशल मीडियावरील कोणत्याही अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये. वाघाला जेरबंद करताना नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करू नये, ज्यामुळे वाघाची हालचाल अनिश्चित होऊन रेस्क्यू ऑपरेशनमध्ये अडथळा निर्माण होईल. वाघ किंवा इतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात पशूधनाचे नुकसान झाल्यास शासनाच्या नियमानुसार भरपाई देण्यात येईल. तसेच अशी घटना घडल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांची सुरक्षितता ही वनविभागाची प्राथमिकता असून, सध्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी वनविभागाच्या 'हॅलो फॉरेस्ट' १९२६ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा स्थानिक वन अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक अर्जुना के. आर. यांनी केले आहे.

### तनिष्का खंडारकर जीएसपदी विराजमान




**लेहेगाव**-लोकशाही केवळ पाठयपुस्तकातील एक प्रकरणच नव्हे तर ती जगण्याला बळ देणारी संस्कृती असते. मतदानाचा अधिकार निवडीचे स्वातंत्र्य, मतभिन्नतेचा आदर आणि स्विकारलेली जबाबदारी यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनां घेता आला, तर त्यातून उद्याच्या सजग आणि जबाबदार नागरिक घडतो. ह्याच प्रगल्भ जाणिवेतून श्रीविवेकानंद कन्या विद्यालयात विद्यार्थी प्रतिनिधी जीएस पदा करिता निवडणूक पार पडली. प्रीती सावरकर यांच्या मार्गदर्शनातून आणि योगेंद्र तट्टे, आडे यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेली ही निवडणूक म्हणजे विद्यार्थिनी-साठी लोकशाही प्रक्रियेची जणू छोटीशी प्रयोगशाळाच ठरली. उमेदवारीपासून प्रचार, मतदान, मतमोजणी आणि निकालापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने अनुभवली.

निवडणूक चुरशीची होती. शाळेच्या चार भिंतींच्या आत घडणाऱ्या या निवडणूका भविष्यातील लोकशाहीचा पाया भक्कम करतात. त्यांना मतदानाचे महत्व, सांगितले. तिच्या निवडीचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंजुषा देशमुख, योगेंद्र तट्टे, आडे, सीताराम कुरवाडे, पंकज कडू, प्रीती सावरकर, पुष्पा सावरकर विद्यार्थिनीं यांनी तनिष्काचे अभिनंदन करित शुभेच्छा दिल्यात.

# शहरात पुन्हा रक्तरंजित रात्र

## हैदरपुरात तरुणाची हत्या



### तलवारीने वार केल्याची प्राथमिक माहिती; खोलापुरी गेट पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधी::** शहरातील गुन्हेगारीचा आलेख पुन्हा चिंताजनक बनला असून, खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हैदरपुरा परिसरात सोमवारी रात्री एका २२ वर्षीय तरुणाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. शेख राहिल शेख फारूक (२२, रा. रहमतनगर) असे मृत तरुणाचे



नाव असल्याची प्राथमिक माहिती आहे. सरकारी रुग्णालयाजवळील मैदान परिसरात हा प्रकार घडल्याचे समोर येत असून, तलवारीने वार करून हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. रात्रीच्या वेळी घडलेल्या या रक्तरंजित घटनेनंतर हैदरपुरा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन खोलापुरी गेट पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. हत्या झाल्याची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच सुयश हॉस्पिटल परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत तपासाला सुरुवात केली. दरम्यान, हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पूर्ववैमनस्य, (पान २ वर)

# जिल्ह्यातील २,३९९ मंडळांमध्ये विराजणार विघ्नहर्ता

## गणेश उत्सवासाठी प्रशासन आणि पोलीस अलर्ट

**अमरावती/प्रतिनिधी:** - अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवासाठी जिल्ह्यात जय्यत तयारी सुरू झाली आहे. प्रशासन आणि पोलिस यंत्रणाही अलर्ट मोडवर आली आहे. यंदा जिल्ह्यात तब्बल २,३९९ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची स्थापना होण्याची शक्यता आहे. यात विशेष म्हणजे ३८७ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेला प्रोत्साहन दिले जात आहे. पोलिस विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शहरातील ९ पोलिस ठाण्याच्या हद्दीत यंदा ५८५ सार्वजनिक मंडळे असतील. या मध्ये सर्वाधिक मंडळे गाडगेनगर ठाणे हद्दीत १२२ आहेत. त्या पाठोपाठ राजापेठ येथे ७७, बडनेरा येथे ७७, खोलापुरी गेट येथे ७०, शहर कोतवालीत ३२, भातकुली २३, नागपुरी गेट २३, वलगाव ५६, फ्रेजरपुरा ६१ आणि नांदगावपेठमध्ये ६० मंडळांचा समावेश आहे. तर ग्रामीण भागातील २१ पोलिस ठाण्याच्या हद्दीत १,८१४ मंडळे असणार आहेत. ग्रामीण मध्ये धारणी तालुका आघाडीवर असून त्यानंतर मोर्शीत १०६ आणि अंजनगाव सुर्जीमध्ये ९६ मंडळे आहेत. ग्रामीण भागातील ३८७ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविली जात असून तालुका मुख्यालयात सुमारे ४०६ गावांमध्ये ५४० सार्वजनिक मंडळे असतील.



गणेशोत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसां समोर मोठे आव्हान असते. स्थापने पासून ते विसर्जनापर्यंत शहर आणि ग्रामीण भागात मोठा पोलिस बंदोबस्त लावला जाणार आहे. या काळात सुमारे ८० टक्के पोलिस बळ बंदोबस्तासाठी व्यस्त असते. मंडळांमधील वाद, वाहतूक, गर्दीचे व्यवस्थापन आणि विसर्जनादरम्यान कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष नियोजन करण्यात (पान २ वर)

# अवैध रेतीसाठ्याला कारवाई ऐवजी 'संरक्षण'चा आरोप..!

## जिल्हाधिकाऱ्यांना बोरेले यांची कायदेशीर नोटीस

**यवतमाळ/प्रतिनिधी:** - यवतमाळ जिल्ह्यातील अवैध रेतीसाठ्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, व्हिसलब्लोअर व आरटीआय कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांनी जिल्हाधिकारी विकास मिना यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. अवैध रेती वर कारवाई करण्याऐवजी प्रशासनाकडून अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात असल्याचा गंभीर आरोप नोटी समधून करण्यात आला आहे. ही नोटीस ७ सप्टेंबर रोजी पोस्टाने पाठविण्यात आल्याचे बोरेले यांनी नमूद केले आहे. नोटीसमध्ये झरी-जामणी तालुक्यातील मौजा सतपल्ली येथे सुमारे ८ ते १० हजार ब्रास अवैध रेतीचा साठा असल्याचा दावा करण्यात आला आहे. या साठ्याची पूर्वीच तक्रार करून तो चोरीला जाऊ नये म्हणून पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही वनटेन मशीनच्या सहाय्याने हायवा वाहनांमध्ये रेती भरून खुलेआम वाहतूक होत असल्याचे व्हिडिओ व छायाचित्रे नागरिकांनी पाठविल्याचा दावा नोटीस मध्ये करण्यात आला आहे.



दरम्यान, आर्णी तालुक्यातील जलांद्री येथील २० हजार ब्रास रेतीसाठ्यापैकी केवळ ३ हजार ब्रास साठा दाखवून २ कोटी ३८ लाख ४१ हजार ८४० रुपयांचा दंड आकारण्यात आल्याचा गंभीर आरोप बोरेले यांनी केला आहे. प्रत्यक्ष साठ्याप्रमाणे दंड आकारल्यास तो १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक होऊ शकतो, असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तपासणी व मोजणी करताना तक्रारदाराला उपस्थित न ठेवणे, साठा कमी दाखविणे आणि संबंधित गैर अर्जदाराचे नाव स्पष्ट न करणे, असे प्रश्नही नोटीस मधून उपस्थित करण्यात आले आहेत. नोटीस मिळाल्यापासून २४ तासांत खुलासा करावा, तसेच तपास पूर्ण होईपर्यंत सतपल्ली व जलांद्री येथील रेतीसाठा जशास तसा सुरक्षित ठेवावा, (पान २ वर)

# आयएनएसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर विलास अरुण मराठे यांची बिनविरोध निवड

### अध्यक्षपदी करण दर्डा, डेप्युटी प्रेसिडेंट पदावर तन्मय माहेश्वरी तर उपाध्यक्ष पदी हर्ष मॅथ्यू

**नवी दिल्ली /प्रतिनिधी:-** देशातील वृत्तपत्रे, नियतकालिके आणि मासिकांच्या प्रकाशकांचे प्रतिनिधित्व करणारी सर्वोच्च संस्था असलेल्या 'द इंडियन न्यूजपेपर सोसायटी'च्या (आयएनएस) अध्यक्षपदी 'लोकमत'चे करण राजेंद्र दर्डा यांची २०२६-२७ या वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर अमरावती येथील दैनिक 'हिंदुस्थान'चे प्रबंध संपादक व महाव्यवस्थापक विलास अरुण मराठे यांची आयएनएसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या या प्रतिष्ठेच्या निवडीमुळे दैनिक 'हिंदुस्थान'सह अमरावती आणि संपूर्ण विदर्भाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



आयएनएसची ८७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून पार पडली. या सभेत २०२६-२७ या वर्षासाठी नवीन पदाधिकारी तसेच राष्ट्रीय कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली. करण राजेंद्र दर्डा हे मावळते अध्यक्ष विवेक गुप्ता (ज्ञानमार्ग) यांच्याकडून अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारतील. संस्थेच्या उपाध्यक्षपदी 'अमर उजाला'चे तन्मय माहेश्वरी आणि 'वनिता'चे हर्ष मॅथ्यू यांची निवड करण्यात आली. 'गृहशोभिका'चे अनंत नाथ यांची मानद कोषाध्यक्षपदी निवड झाली असून, मेरी पॉल या संस्थेच्या सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत.

**मराठे यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल**

पत्रकारिता, संपादन, वृत्तपत्र व्यवस्थापन, मुद्रण तंत्रज्ञान, विपणन आणि प्रशासन या क्षेत्रांतील विलास अरुण मराठे यांच्या चार (पान २ वर)

# चिमुकल्या बहीण-भावाला मण्यारचा दंश

### सहा वर्षीय आराध्याची प्रकृती चिंताजनक; आठ वर्षीय पवनवर आयसीयूमध्ये उपचार

**अमरावती/प्रतिनिधी::** घरात शिरलेल्या विषारी सापाने जमिनीवर झोपलेल्या दोन चिमुकल्या बहीण-भावाला दंश केल्याची धक्कादायक घटना वाघोली येथे रविवार, ६ सप्टेंबरच्या मध्यरात्री घडली. सर्पदंशानंतर दोन्ही मुलांना तातडीने अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. सहा वर्षीय मुलीची प्रकृती गंभीर असून, तिच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

आराध्या अरुण चव्हाण (६) आणि पवन अरुण चव्हाण (८), अशी सर्पदंश झालेल्या बहीण-भावाची नावे आहेत. त्यांचे वडील अरुण चव्हाण हे जेसीबी चालक असून, मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

रविवारी रात्री कुटुंबातील सदस्यांसह दोन्ही मुले घरात जमिनीवर अंथरूण टाकून झोपली होती. मध्यरात्रीच्या सुमारास अचानक दोन्ही मुलांनी रडण्यास सुरुवात केली. आवाज ऐकून कुटुंबीय जागे झाले असता, घरात साप असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे (पान २ वर)

# तीन दिवसांच्या शोधानंतर तरुणाचा विहिरीत मृतदेह

### आजारपणाला कंटाळून टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज; मृत्यूचे कारण तपासानंतर स्पष्ट होणार

**अंजनसिंगी/प्रतिनिधी:** : तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या १८ वर्षीय तरुणाचा मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आल्याने अंजनसिंगी परिसरात खळबळ उडाली. आकाश गजानन सहारे असे मृत तरुणाचे नाव आहे.



कान्होजी महाराज देवस्थानाच्या मागील बाजूस असलेल्या ठाणेकर यांच्या शेतातील विहिरीत रविवारी त्याचा मृतदेह आढळला. आकाश मागील काही दिवसांपासून आजारी होता. त्याला शुगरचा त्रास असल्याची माहिती कुटुंबीयांकडून देण्यात आली. आजारपणाला कंटाळून त्याने आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिसांच्या तपासानंतरच या घटनेमागील सत्य समोर येणार आहे. आकाश हा मागील तीन दिवसांपासून अचानक बेपत्ता झाला होता. तो घरी न परतल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्र तसेच परिसरात त्याचा शोध सुरू केला होता. विविध ठिकाणी (पान २ वर)

# ट्रान्सफॉर्मर चोरीचा छडा नेवाशात 'मास्टरमाईंड' पोलिसांच्या जाळ्यात

### ५० किलो कॉपर कॉईल जप्त; तळेगाव दशासर पोलिसांची आंतरजिल्हा कारवाई

**अमरावती /प्रतिनिधी::** ट्रान्सफॉर्मर फोडून त्यातील तांब्याची कॉपर कॉईल लंपास करणाऱ्या टोळीचा तळेगाव दशासर पोलिसांनी छडा लावला आहे. गुन्ह्यानंतर जिल्हा बदलून पसार झालेल्या आंतरजिल्हा सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी नेवासा, जि. अहिल्यानगर येथून अटक केली. जितेंद्रसिंग संतोषसिंग टाक (३४, रा. अलाना गेवराई, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून ५० किलो वजनाची सुमारे ७५ हजार रुपये किमतीची कॉपर कॉईल जप्त करण्यात आली. पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा येथील राजेश अशोक चांडक (४१) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हे प्रकरण उघडकीस आले. त्यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या 'साई मोहिनी क्वॉट्स वर्ल्ड' या जिनिंग फॅक्टरीला वीजपुरवठा करण्यासाठी फॅक्टरीच्या आवारात ६३० केव्ही क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला होता.



१७ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंतच्या काळात चोरट्यांनी हा ट्रान्सफॉर्मर फोडला. आतील तांब्याची कॉपर कॉईल काढून ती लंपास करण्यात आली. या प्रकरणी २२ ऑगस्ट रोजी तळेगाव दशासर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी चोरीच्या पद्धतीचा आणि आरोपींच्या हालचालींचा माग काढण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या (पान २ वर)

# पिता-पुत्राने तरूणावर केला जीवघेणा हल्ला

### विलास नगर परिसरातील घटना

**अमरावती /प्रतिनिधी:-** गाडगे नगर ठाणा ठाणे हद्दीत येणाऱ्या विलास नगर परिसरात शिवीगाळ करण्यापासून रोखल्याच्या क्षुल्लक कारणावरून पिता-पुत्राने एका तरूणावर लाठी आणि लोखंडी पाईपने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात तरूणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी गाडगे नगर पोलिसांनी आरोपी पिता-पुत्रा विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार विजय भीमराव थोरात (४०, रा. विलास नगर) जखमी आहे. तक्रारीनुसार, शनिवार ५ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास विजय थोरात जेवणानंतर घराबाहेर हात धुवत होते.त्याचवेळी त्यांच्या घराजवळ राहणारा आदित्य गणेश ताथोड हा मोठ्याने शिवीगाळ करत होता. विजय यांनी त्याला शिवीगाळ करण्यापासून (पान २ वर)

# राष्ट्रीय स्वच्छ हवा पुरस्कारात महाराष्ट्राचा गौरव

### शहरांमध्ये अमरावती मनपा आणि नाशिक मनपा वॉर्ड क्रमांक सात देशात तृतीय

**नवी दिल्ली /प्रतिनिधी:-** शहरांमधील वायू प्रदूषणाला आळा घालून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या प्रभावी उपाययोजनांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६' अंतर्गत महाराष्ट्रातील अमरावती शहराला तृतीय क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार, तर नाशिक महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ७ ला वॉर्डस्तरीय सर्वेक्षणात तृतीय क्रमांक मिळाला आहे. अमरावतीला २५ लाख रुपये, तर नाशिकच्या वॉर्ड क्रमांक ७ ला ३० लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली येथील इंदिरा पर्यावरण भवनातील गंगा सभागृहात आयोजित राष्ट्रीय स्वच्छ हवा पुरस्कार सोहळ्यात हा गौरव करण्यात आला. राष्ट्रीय हरित अधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमास हवा



गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाचे अध्यक्ष राजेश वर्मा, पर्यावरण सचिव तन्मय कुमार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष डॉ. अमनदीप गर्ग यांच्यासह केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**अमरावती मनपाची उल्लेखनीय कामगिरी-** हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ३ ते १० लाख लोकसंख्या गटात अमरावती शहराने राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावला. यासाठी शहराला २५ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात (पान २ वर)

# 'पैसे पडले'चा बनाव करून वृद्धाला १.२० लाखांचा गंडा

### - पोटे कॉलेज मार्गावरील घटना

अमरावती - परतवाडा येथून बँकेतून पैसे काढून अमरावती कडे येणाऱ्या एका ७२ वर्षीय वृध्दला पोटे कॉलेज रोडवर शातिर चोरट्यांनी पैसे खाली पडल्याचा झांसा देऊन १ लाख २० हजार रुपयांनी लुटल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.भर दिवसा घडलेल्या या वारदातीने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. माहितीनुसार सुरेश लवनकर ( ७२, रा. जिजाऊ नगर) यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अचलपूर शाखेतून १.२० लाख रुपये काढले आणि संपूर्ण रक्कम सुरक्षितपणे जवळ ठेवून ते अमरावती कडे रवाना झाले होते. लवनकर हे पोटे कॉलेज मार्गावरून जात असताना, वाटेत दबा धरून बसलेल्या दोन अज्ञात बदमाशांनी त्यांना हाक मारून थांबवले. बदमाशांनी मोठ्या चलाखीने सांगितले की, रस्त्यावर २०० रुपयांच्या नोटा पडल्या आहेत आणि त्या तुमच्या आहेत का ते बघा. खाली पडलेले पैसे पाहून बुजुर्ग (पान २ वर)

## संजय पकडे यांना मातृशोक

**नांदगाव पेठ /प्रतिनिधी:** - येथील समृद्ध शेतकरी तथा वृत्तपत्र विक्रेते संजय पकडे यांच्या मातोश्री शकुंतला किसनराव पकडे (७५) यांचे सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने पकडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, नातेवाईक, आप्तेष्ट व परिचितांकडून शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच कुटुंबीय, नातेवाईक व परिचितांनी दुःख व्यक्त केले.त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नांदगाव पेठ येथील स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



# अखेर त्या अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

### महिलेला दिली होती धडक

**तिवसा /प्रतिनिधी:-** ३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी तहसील कार्यालयात कामानिमित्त जात असलेल्या महिलेला अज्ञात वाहनचालकाने जबर धडक दिली. या अपघातात गुंफाबाई भिमरावजी राऊत (वय ६५ वर्ष रा.तिवसा)ह्या गंभीर जखमी झाल्या होत्या.ही घटना राष्ट्रीय महामार्गावर तिवसा येथील पेट्रोल पंप चौकात घडली. प्राप्त माहितीनुसार गुंफाबाई राऊत या तिवसा तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रात जात होत्या.त्या पेट्रोल पंप चौकात येताच अमरावती वरुन नागपूर कडे जात असलेल्या एमएच -४९-बिआर-९७१९ क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांना मागुन धडक दिली.व घटनास्थळावरून पसार होण्याचा प्रयत्न केला असता तिवसा पोलिसांनी कारचा पाठलाग करुन कार चालकाला ताब्यात घेतले होते.मात्र तक्रार नसल्याने कारवाई झाली नव्हती. यामधे महिलेला गंभीर दुखापत झाल्याने (पान २ वर)

## जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना फायर, इलेक्ट्रिकल ऑडिट बंधनकारक

### आरोग्य यंत्रणेची उच्चस्तरीय बैठकः

अमरावती - जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षितता बळकट करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या डॉ. पंजाबराव सभागृहात उच्चस्तरीय बैठक पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी या बैठकीत महत्वाचे निर्देश दिले. बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षिरसागर, कार्यकारी अभियंता (विद्युत) आणि जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. बैठकीत रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत, जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांचे फायर ऑडिट आणि इलेक्ट्रिकल ऑडिट तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गांधी यांनी दिले. यासाठी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. तसेच केवळ कागदोपत्री पूर्तता न करता प्रत्यक्ष आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने उपाययोजना करता याव्यात, (पान २ वर)

# मलशुद्धीकरण केंद्रातून चोरी करणारा अल्पवयीन ताब्यात

### नागपुरी गेट पोलिसांची कारवाई



**अमरावती /प्रतिनिधी:-** - नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या बिस्मिल्ला नगर येथील मलशुद्धीकरण केंद्रातून चोरीला गेलेला मुद्देमाल नागपुरी गेट गुन्हे प्रकटीकरण (डीबी) पथकाने जप्त केला आहे. या प्रकरणी एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. माहितीनुसार स्वप्नील विजयराव कपीले (४१, रा. मलशुद्धीकरण केंद्र, बिस्मिल्लानगर) यांनी नागपुरी गेट पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती, कि कोणीतरी अज्ञात चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा (पान २ वर)